सोलापूर तरुण भारत
आसमंत



# विकासनीतीचा विजय

प्रासंगिक
**प्रतिनिधी**

बिहारमध्ये सहसा वादळे येत नाहीत, पण नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीनंतर जाहीर झालेले निकाल पाहता, त्या राज्याला 'एनडीए'च्या लोकप्रियतेच्या झंझावाताने झपाटल्याचे दिसते. या निवडणुकीने बिहारमध्ये नवे विक्रम प्रस्थापित केले असून अक्षरशः 'न भूतो न भविष्यति' असा विजय 'एनडीए'च्या पदरात टाकला आहे. या विजयाचे वर्णन करण्यास कोणतेही विशेषण कमीच पडेल. मुख्यमंत्री नितीशकुमार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी या दोन नेत्यांच्या धमाकेदार विकासकामांमुळे या 'डबल इंजिन' सरकारचा विजय निश्चित मानला जात होता, पण त्या विजयाचा आवाका इतका अभूतपूर्व असेल, अशी कल्पना कोणालाच आली नव्हती. या झंझावातात राजद-काँग्रेस व अन्य पक्षांचे कथित महागठबंधन मतदारांनी पालापाचोळ्यासारखे भिरकावून लावले.

निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या तब्येतीवरून राजदने त्यांची भरपूर कुचेष्टा केली. काँग्रेसनेही निकालानंतर भाजप त्यांना या पदावर ठेवणार नाही, असा प्रचार करीत भाजप-जदयुमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न केला. पण, यांपैकी कशालाही न जुमानता मतदारांनी या दोन पक्षांच्या पारड्यात भरभरून मते टाकली. 'एनडीए'चे 'डबल इंजिन' सरकारच आपल्या राज्याचा विकास करू शकते आणि आपल्या जीवनात सुधारणा करू शकते, अशी पक्की खूणगाठ मतदारांनी बांधली होती. 'मोदी हैं तो मुमकिन हैं' हा मंत्र बिहारी मतदारांच्या मनात गुंजत होता. राजदचे प्रमुख लालूप्रसाद यादव यांची १५ वर्षांची 'जंगलराज' राजवट आजही बिहारी मतदारांच्या अंगावर काटा उभा करते. निवडणुकीपूर्वी राजद नेत्यांनी सरकारी अधिकार्यांना दिलेल्या धमया पाहता, हा पक्ष सत्तेवर नसताना इतकी दमनशाहीची भाषा करू शकतो, तर सत्तेवर आल्यास राज्यात पुन्हा 'जंगलराज'च निर्माण होईल, अशी साधार भीती मतदारांना वाटली आणि गेली पाच वर्षे राज्यात सुरू असलेल्या विकासकामांमध्ये अडथळा येऊ नये, यासाठी त्यांनी 'सुशासनबाबू' असलेल्या नितीशकुमारांनाच भाजपसह निवडले. एनडीए युती पुन्हा सत्तेवर येईल, असे भाकीत बहुतेक राजकीय विश्लेषकांनी केले होते. पण, त्या विजयाचा आवाका इतका प्रचंड असेल, याची कल्पना बहुदा भाजप-जदयुलाही आली नाही.

**काही समाज आणि जाती हे आपले खासगी कुरण आहे, हे गृहीत धरण्याचा काळ संपल्याचे कालच्या बिहार विधानसभा निवडणुकीच्या निकालांनी दाखवून दिले. तसेच मतचोरीच्या 'फेक नॅरेटिव्ह'पेक्षा, जो पक्ष विकासाची कास धरेल आणि आपले जीवनमान उंचावेल, अशाच पक्षाला सत्तेवर आणण्याइतके बिहारचे मतदार प्रगल्भ झाले आहेत, हाच या निकालाचा अन्वयार्थ!**

'एनडीए'च्या विजयाची कारणे अनेक आहेत. त्यांपैकी प्रमुख म्हणजे राज्यातील कायदा-सुव्यवस्थेत झालेली लक्षणीय सुधारणा, महिलांना वाटणारी सुरक्षितता, त्यांच्या सक्षमीकरणासाठी नितीश सरकारने राबविलेल्या योजना आणि दिलेली आर्थिक मदत, राज्यात वेगाने आकार घेत असलेले विकासप्रकल्प आणि त्यामुळे निर्माण होत असलेल्या रोजगाराच्या संधी, केंद्र सरकारकडून मिळणारे भक्कम पाठबळ ही प्रमुख कारणे सांगता येतील. तसेच राजद-काँग्रेसच्या नेत्यांच्या हेतूंविषयी आणि कार्यशैलीबद्दल असलेला अविश्वासही या पक्षांच्या पराभवास कारण ठरला. निवडणुकीपूर्वी बिहारमधील प्रत्येक कुटुंबात एकाला सरकारी नोकरी देण्याचे आश्वासन हे केवळ मृगजळ आहे, हे समजण्याइतपत बिहारी मतदार आता सुज्ञ झाले आहेत. जे आश्वासन पूर्ण करता येणार नाही, त्याचे प्रलोभन दाखवून मते मिळविण्याचे दिवस संपले आहेत. म्हणूनच ज्या 'जेन-झी'ची माथी भडकाविण्याचे प्रयत्न महागठबंधनकडून सुरु होते, त्याच 'जेन-झी'ने राहुल आणि तेजस्वीला धूळ चारली आहे. या निकालांनी आणखी का वास्तवाला प्रकर्षाने सामोरे आणले असून त्यामुळे राजद-काँग्रेस यांसारख्या पक्षांचा राजकीय पायाच नष्ट होणार आहे. बिहारमधील सीमांचल प्रदेश, म्हणजे बंगालच्या सीमेलगतचा प्रदेश, हा मुस्लीम बहुसंख्येचा. तसेच राज्यात यादव समाजाची लोकसंख्या १८ टक्के आहे. हे दोन मतदारगट आपल्याच मागे खंबीरपणे उभे राहतील, या भ्रमात महागठबंधनचे नेते होते. पण, या दोन समाजांमध्येही गेल्या पाच वर्षांत बर्यापैकी जागृती झाली असून, हे दोन पक्ष केवळ आपल्या नेत्यांच्या लाभासाठी आपल्या मतांचा वापर करतात, ही गोष्ट यादव व मुस्लीम मतदारांच्या लक्षात आली होती. 'एनडीए'चे सरकार भलेही आपल्या विचारसरणीशी अनुरूप नसेल, पण त्या सरकारच्या राजवटीतच बिहारचा विकास शय आहे, हे या मतदारांना कळून चुकले होते. राज्याचा विकास झाला, तर आपोआपच आपलेही जीवनमान उंचावेल, हे न कळण्याइतके आजचे मतदार दूधखुळे राहिलेले नाहीत. त्यामुळे मुस्लीम आणि यादव मतदार बहुसंख्य असलेल्या अनेक मतदारसंघांमध्ये 'एनडीए'च्या उमेदवारांनी विजय मिळविला आहे. त्याला महिला मतदारांच्या पाठिंब्याची जोड मिळाल्याने आजचा युगप्रवर्तक निकाल लागला आहे. हा आघात सहन करणे राजदसाठी अवघड जाईल.

विरोधी पक्षांच्या कथित महागठबंधनात राजद, काँग्रेस, तीन डावे पक्ष, मुकेश सैनी यांचा व्हीआयपी असे पक्ष होते. यापैकी १४५ जागांवर एकटा राजद लढत होता, तर ६० जागांवर काँग्रेस. तरीही या सर्व पक्षांना विधानसभेतील २४३ पैकी जेमतेम ३५ जागा जिंकता आल्या आहेत. त्यातही या महागठबंधानत सहभागी करून घेण्याची असदुद्दीन ओवेसी यांच्या 'एमआयएम' या (पान ४ वर)

# अमेरिकी 'शटडाऊन'चा जगाला धडा

लक्ष्यवेध
**संजीव ओक**

**अमेरिकेत चाललेला ऐतिहासिक ४० दिवसांचा 'शटडाऊन' हा केवळ सरकारी यंत्रणा ठप्प पडण्याचा मुद्दा नाही, तर राजकीय ध्रुवीकरणाने आर्थिक शक्तीलाही कसे नमवले जाते, याचे हे धक्कादायक उदाहरण आहे. या अस्थिरतेचे परिणाम जगासह भारतावरही होणार आहेत. त्याविषयी...**

अमेरिकेच्या इतिहासातील सर्वांत मोठा 'शटडाऊन' म्हणून सध्याच्या घटनेची नोंद होईल. अमेरिकेत सुरू झालेल्या 'शटडाऊन'ला ४० दिवस पूर्ण झाले. 'जागतिक महासत्ता' असा बिरुद जो देश मिरवतो, त्या महासत्तेवर आलेली ही नामुष्कीची वेळ संपूर्ण जगाला आर्थिक शिस्तीचा धडा देणारी ठरली आहे. 'शटडाऊन'ने सहाव्या आठवड्यात प्रवेश केल्याने, अमेरिकेत वाढती अस्वस्थता आहे. आता यातून तोडगा काढण्यासाठी अमेरिकी सिनेट प्रयत्नशील असली, तरी तो प्रत्यक्षात येण्यासाठी आणखी कित्येक दिवसांचा कालावधी लागू शकतो. अमेरिकी सिनेटने 'शटडाऊन' संपुष्टात यावा, यासाठी महत्त्वाचे विधेयक मंजूर केले आहे. त्याचदरम्यान, येणार्‍या सुटीच्या कालावधीत प्रवासात अनागोंदी माजेल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. त्याचबरोबर, चौथ्या तिमाहीच्या आर्थिक वाढीवर याचा नकारात्मक परिणाम होण्याची भीती वाढली आहे. या 'शटडाऊन'मुळे लाखो कर्मचारी सक्तीच्या रजेवर असून, अमेरिकेतील मुख्य सरकारी सेवा अंशतः बंद आहेत. मुख्यत्वे विमान वाहतूक प्रभावित झाली असल्याने, हजारो उड्डाणांना त्याचा थेट फटका बसत आहे.




अमेरिका म्हणजे जगातील आर्थिक संपन्न असा देश आणि तंत्रज्ञानात्मक महासत्ता. अशा महासत्तेची सरकारी यंत्रणा थांबते, सरकारी कर्मचार्‍यांचे पगार रोखले जातात, अनेक सेवा बंद कराव्या लागतात, या घटना अतर्क्य वाटत असल्या, तरी त्या प्रत्यक्षात घडून येत आहेत. ४० दिवसांच्या 'शटडाऊन'ने जगाला हे दाखवून दिले की, महासत्तासुद्धा राजकीय संघर्षात बळी पडू शकते. अमेरिकेतील या सर्व घटनांचा जागतिक बाजारावर नेमका काय परिणाम झाला आणि भारतासाठी यात कोणता धडा आहे, हे समजून घेणे आवश्यक असेच आहे.

अमेरिकेत सरकार चालण्यासाठी प्रत्येक वष काँग्रेसला बजेट मंजूर करावे लागते. ते मंजूर न झाल्यास निधीच्या अभावामुळे अनेक विभागांचे काम थांबवतात. यालाच 'शटडाऊन' असे संबोधले जाते. त्याचा तत्काळ परिणाम असा होती की, लाखो फेडरल कर्मचार्यांना वेतनाशिवाय काम करावे लागते किंवा त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवले जाते. विमान सेवांपासून सीमासुरक्षेपर्यंत अनेक महत्त्वाच्या सेवा मंदावतात. संशोधन, आरोग्य, पर्यावरण, कृषीसारख्या विभागांचे कामकाज थांबते. सार्वजनिक खर्चात कपात झाल्याने, संपूर्ण अर्थव्यवस्था मंदावते. अमेरिकी अर्थव्यवस्थेचा आकार मोठा असल्याने, ती मंदावली की त्याचा थेट फटका जागतिक अर्थव्यवस्थेला बसतो. यावेळी हा 'शटडाऊन' दीड महिन्यांपर्यंत लांबला. याला अनेक कारणे आहेत. यात मुख्यत्वे फेडरल आरोग्य विमा सबसिडी संदर्भातील तडजोड न होणे, सरकारी खर्च, सामाजिक कल्याण योजना आणि सीमा सुरक्षा यांवर सत्ताधारी रिपब्लिकन व विरोधी डेमोक्रॅट यांच्यात मतभेद असणे यांचा समावेश आहे. अखेरीस, अमेरिकी सिनेटने तडजोडीचा मार्ग काढत, सर्व सेवा पुन्हा सुरू ठेवण्यासाठी आवश्यक निधीला परवानगी दिली आहे. तथापि, हा मिळालेला तात्पुरता दिलासा आहे. कामकाज सुरळीत होण्यासाठी कित्येक दिवसांचा कालावधी जावा लागणार आहे. या काळात यशस्वी तोडगा न निघाल्यास, पुन्हा अशीच परिस्थिती ओढावू शकते.

अमेरिकेचा इतिहास तपासून पाहिला, तर लांबलेल्या 'शटडाऊन'मुळे 'जीडीपी'वाढीत ०.५ ते एक टक्क्यांपर्यंत थेट नुकसान झालेले दिसून येते. शासकीय कर्मचार्‍यांचा पगार रोखला गेल्याने त्यांचे घरगुती खर्च कमी होतात. त्यामुळे ग्राहक खर्चात कपात होते. परिणामी, अमेरिकेतील रिटेल, सेवा, पर्यटन क्षेत्र यांच्यावर दबाव येतो. विमानतळांवरील सुरक्षा कर्मचारी, सीमाशुल्क कर्मचारी, हवामान विभागातील तज्ज्ञ यांच्यावरील कामाजा बोजा वाढतो. याचा परिणाम जागतिक व्यापारावर होतो. अमेरिकेची अर्थव्यवस्था स्थिर असली पाहिजे, ही जगाची मानसिकता आहे. 'शटडाऊन'सारख्या घटनांनी या तथाकथित स्थैर्याच्या प्रतिमेला धक्का बसतो. त्यामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास कमी होतो, गुंतवणूक कमी होते. शेअर बाजारातील अस्थिरता वाढीस लागते आणि सोने-कच्चे तेल यांच्या किमतीत चढ-उतार दिसून येतात. 'नासा', वैद्यकीय संशोधन संस्था, नव्या तंत्रज्ञानाच्या प्रकल्पांवरचे काम थांबवले जाते. त्यामुळे नुकसान हे दीर्घकालीन असेच असते. अमेरिका हा भारताच्या आयटी सेवा, औषधउद्योग, अभियांत्रिकी उत्पादनांचा प्रमुख ग्राहक असल्याने, तेथे घरगुती खर्च कमी झाला की भारताची निर्यातही घसरते. अमेरिका मंदावली, तर जगातील विविध उत्पादन उद्योग पर्यायी बाजारपेठा शोधतात. भारत अशा परिस्थितीत आपल्याकडे गुंतवणूक यावी, यासाठी सुयोग्य स्थितीत आहे. चीनवर अवलंबित्व कमी करण्यासाठी भारतात गुंतवणुकीचा प्रवाह यापूर्वच सुरू झाला आहे. अमेरिकेतील अस्थिरतेमुळे कंपन्या राजकीय स्थिरता, उत्पादनासाठी मिळणार्या सवलती, प्रशिक्षित मनुष्यबळ, मोठा ग्राहकवर्ग असलेल्या देशांचा शोध घेत आहेत आणि भारत या तिन्ही बाबतीत पुरेसा सक्षम आहे, ही मोठी जमेची बाजू आहे. (पान ४ वर)



# समाजवादी की दहशतवादी?



**एकीकडे देशभरात दिल्लीतील बॉम्बस्फोटानंतर सर्वत्र संतापाचे वातावरण असताना, दुसरीकडे समाजवादी पार्टी आणि काँग्रेसच्या नेत्यांकडून दहशतवादाच्या आरोपाखाली अटक केलेल्यांना पाठीशी घालण्याचा निर्लज्जपणाचा प्रकार पाहायला मिळाला. समाजवादी पक्षाचे वाचाळ नेते आणि महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष अबू आझमी यांनी 'निर्दोषांना शिक्षा नको' अशी बांग ठोकली. एवढेच नव्हे, तर दिल्लीच्या बॉम्बस्फोटाची तुलना २००६च्या मुंबई लोकलमधील स्फोटाशी करुन, तेव्हाही निर्दोषांना पोलिसांनी अशीच अटक केली होती आणि नंतर न्यायालयाने त्यांना निर्दोष मुक्त केले, अशी मल्लिनाथी आझमींनी केली.**

वेधक
**विजय कुलकर्णी**

एकूणच काय तर आतापर्यंत तपास यंत्रणांनी अटक केलेल्या त्या सगळ्या मुस्लीम 'डॉक्टरांना' थेट निर्दोषत्वाचे प्रमाणपत्रच बहाल करुन आझमी मोकळे झाले. पण, अखिलेश यादवांच्या नेतृत्वातील समाजवाद्यांकडून अशाप्रकारे या विशिष्ट धमयांची, त्यांच्या कौमची पाठराखण करण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. यापूवही समाजवाद्यांनी दहशतवाद्यांची अशीच तळी उचलली होती.

२००७च्या गोरखपूर बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी आणि 'हरकत- उल- जिहाद- अल-इस्लामी' या 'अल-कायदा' आणि तालिबानशी संलग्न दहशतवादी संघटनेच्या तारिक कासीमवरील आरोपही तत्कालीन अखिलेश सरकारने मागे घेतले होते.

२०१२च्या उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीपूव जाहीरनाम्यातही सत्तेत आल्यास, निर्दोष मुस्लिमांवरील दहशतवादाशी संबंधित खटले रद्दबातल ठरविण्याचे आश्वासनच सपाने दिले होते. मग काय, सत्तेत आल्यानंतर अखिलेश सरकारने असे १४ खटले मागे घेण्याचा निर्णयदेखील घेतला. पण, अलाहाबाद उच्च न्यायालयात अखिलेश सरकारच्या या निर्णयाविरोधात याचिका दाखल करण्यात आली आणि या निर्णयाला स्थगिती मिळाली. अशाप्रकारे निष्पापांचे बळी घेणार्यांना पंखाखाली घेण्याचे एकमेव कारण म्हणजे, बळी घेणारेही त्याच कौमचे, ज्यांच्यावर सपाची मदार, मग ते उत्तर प्रदेश असो वा महाराष्ट्र! अल्पसंख्याकांची ही हक्काची मतपेढी शाबूत ठेवण्याचा मार्ग अशा दहशतवाद्यांच्या समर्थनातून गेला तरी चालेल, असे हे प्रसंगी राष्ट्रीय सुरक्षेलाही नख लावणारे तुष्टीकरणाचे तुच्छ राजकारण! म्हणूनच मग दहशतवाद्यांना समर्थन देणार्या अशा समाजवाद्यांना कुणी दहशतवादी का म्हणू नये, हाच खरा प्रश्न!

दहशतवाद्यांचा कळवळा...

डॉ. मोहम्मद उमर, डॉ. मुजम्मिल, डॉ. आदिल अहमद, डॉ. शाहीन शाहिद, डॉ. उमर नबी... दिल्ली बॉम्बस्फोटानंतरच्या कारवाईत चर्चेत असलेली ही पाच नावे. ही पाचही नावे वाचून यांचा धर्म कोणता, हे वेगळे सांगण्याची मुळी गरजच नाही. परंतु, तरीही दहशतवादी हे मुस्लीम असू शकत नाही, अशी सारवासारव जर कोणी करीत असेल, तर ते निव्वळ 'धर्मांध' नव्हे, तर त्यांना 'देशद्रोही'च संबोधणे उचित ठरावे. विशेष म्हणजे, हे अकलेचे तारे तोडणारे गृहस्थ म्हणजे काँग्रेसशासित कर्नाटकचे अल्पसंख्याक मंत्री बी. झेड. जमीर अहमद खान! दहशतवादाची इस्लाममध्ये परवानगी नाही. त्यामुळे दहशतवादी हे मुस्लीम असूच शकत नाही, असा जावईशोधही या खानांनी लावला. तसे असेल तर 'जिहाद'च्या नावाखाली भारतातच नाही, तर अख्ख्या जगाविरोधात इस्लामने छेडलेल्या धर्मयुद्धाला, दहशतवाद नाही तर काय म्हणावे? आतापर्यंत भारतात झालेल्या सर्व दहशतवादी हल्ल्यांचा कट रचणारे षड्यंत्रकारी आणि त्याची क्रूरपणे अंमलबजावणी करणार्‍या नराधमांचा धर्म तरी कोणता होता? हे खान यांना ठावूक नाही, असे अजिबात नाही. त्यामुळे 'दहशतवादाला धर्म नसतो' या थोतांडापलीकडे जाऊन आता 'दहशतवादी हे मुस्लीम असूच शकत नाही' या भ्रामक धारणेला जनमानसात पेरण्याचा हा फुटकळ प्रयत्न! आणि याच खान महाशयांना 'उमर', 'गनी', 'अहमद', 'सईद' ही आडनावेच मुळी (पान ४ वर)

विश्वसंचार

**मल्हार कृष्ण गोखले**

# साम्राज्ये कशी बरे कोसळतात?

**उत्थान आणि पतन हा सृष्टीचा नियम आहे. एखादी व्यक्ती लहानाची मोठी होत असतानाच आपल्या भावी कर्तबगारीची चुणूक दाखवते. मोठी होत होत कळसाला पोचते. मग काही काळाने वयोमानानुसार थकत जाते आणि अखेर संपते. व्यक्तींप्रमाणेच साम्राज्ये किंवा आधुनिक काळात राजकीय पक्ष, सामाजिक संस्था अशा सर्वांनाच हा नियम अटळपणे लागू होताना दिसतो. साम्यवादी सोव्हिएत रशियन साम्राज्य ७० वर्षे चालू राहून अखेर कोसळले. अमेरिकन साम्राज्य त्याच मार्गावर आहे का?**

गुजरातमध्ये खंभातच्या आखातात भावनगरपासून जवळ वलभीपूर नावाचे एक छोटे शहर आहे. आज त्याला व्यापारीदृष्ट्या काहीही महत्त्व उरलेले नाही, पण इसवी सनाच्या ५व्या शतकापासून पुढची किमान ५०० वर्षे ते एकमहत्त्वपूर्ण व्यापारी बंदर होते. त्याचा व्यापार थेट अरबस्तानपर्यंत होता. त्यावेळी त्याला म्हणायचे वल्लभी किंवा वल्लभीपूर. वल्लभीचे नालंदासारखेच प्रख्यात होते. वल्लभी विद्यापीठात वैदिक धर्माबरोबरच बौद्ध आणि जैन दर्शनांचेही अध्ययन-अध्यापन फार मोठ्या प्रमाणावर चालत होते.

वल्लभीचे मैत्रक घराण्याचे राजे स्वतः जैन संप्रदायी होते. एकदा असे घडले की, वल्लभीचा नगरशेट अरबस्तानात व्यापारासाठी जाऊन आला. येताना त्याने आपल्या लाडक्या मुलीसाठी एक अत्यंत सुंदर अशी बसरा मोत्यांची माळ आणली. नगरशेटची मुलगी आणि राजाची मुलगी मैत्रिणी होत्या. राजकन्येने बापाजवळ हट्ट धरला की, मला ती माळ हवी. राजाने नगरशेटजवळ योग्य ती किंमत देऊन माळ विकत देण्याची मागणी केली. नगरशेट म्हणाला, ही माळ देण्याऐवजी अगदी अशीच दुसरी माळ बसऱ्याहून मागवून घेतो आणि तुम्हाला देतो. खरे म्हणजे हे म्हणणे योग्य होते. पण राजकन्येने हट्ट धरला, मला हीच माळ पाहिजे. राजाने बालहट्टासमोर मान झुकवली. जबरदस्तीने नगरशेटच्या मुलीच्या गळ्यातून माळ काढून आपल्या मुलीला दिली.

या अन्यायाने संतापलेल्या नगरशेटने काय करावे? तो सरळ दिल्लीच्या सुलतानासमोर जाऊन उभा राहिला. त्याने सुलतानाला वल्लभीवर स्वारी करण्याचे आमंत्रण दिले. मोहिमेचा संपूर्ण खर्च नगरशेटने करायचा या अटीवर सुलतानाने वल्लभीवर स्वारी केली. राजाप्रमाणे सैनिकसुद्धा जैन सांप्रदायिक होते. अहिंसेच्या अतिरेकमुळे सैनिक म्हणे लढण्याची कलाच विसरून गेले होते. साहजिकच सुलतानी सैन्याने गवत कापावे तसे वल्लभीचे सैन्य छाटून टाकले. अखेर राजा आणि नगरशेट यांनाही ठार मारले. अफाट लूट, असंख्य स्त्रिया आणि हो, ती मूर्ख राजकन्या आणि ती नगरशेटची मुलगी सगळ्यांनाच बगलेत मारून सुलतान दिल्लीला निघून गेला. जाताना वल्लभी नगरी आणि वल्लभी विद्यापीठ उद्ध्वस्त करायला तो विसरला नाही.

कुणी म्हणतात, ही घटना १३ व्या शतकात घडली आणि तो सुलताना म्हणजे अल्लाउद्दीन खिलजी किंवा गियासुद्दिन तुघलख असावा. दुसरे कुणी म्हणतात की, ही घटना ८व्या९व्या शतकातच घडली. नगरशेटचे संबंध समुद्रमार्गे थेट अरबस्तानपर्यंत असल्यामुळे त्याने पैसे देऊन अरबांच्या आरमारी सैन्याकरवी वल्लभीवर स्वारी करवली. आक्रमक कुणीही असो, हिंदूंच्या मूर्ख अहंकारापोटी एक हिंदू राज्य, हिंदू विद्यापीठ उद्ध्वस्त करायला परकीय अरबांना संधी मिळाली.



अमेरिका हा जगातल्या अन्य देशांच्या तुलनेत नवा देश आहे. सन १७७६ मध्ये अमेरिकेने आपण ब्रिटनची वसाहत नसून स्वतंत्र देश आहोत, असे घोषित केले. मग क्रांतियुद्ध झाले. असंख्य राजकीय घडामोडी झाल्या. अखेर १७८९ साली जॉर्ज वॉशिंग्टनने पहिला राष्ट्राध्यक्ष म्हणून शपथ ग्रहण केली. म्हणजे एक स्वतंत्र, सार्वभौम राष्ट्र म्हणून अमेरिकेचे राजकीय जीवन हे गेल्या जेमतेम २३५ वर्षांचे आहे.

दुसरे महायुद्ध ही एक अशी थारेपालटी घटना घडली की, तिने ब्रिटन, फ्रान्स, इटली, जर्मनी, जपान यांची साम्राज्ये मोडीत काढली. सोव्हिएत रशियन साम्राज्य विस्तारत होतेच, त्याला आणखी बळ दिले. त्याचप्रमाणे अमेरिकेलाही महासत्ता बनवूनच सोडले. अमेरिकेने मोठ्या चतुराईने साम्राज्यविस्तारचा नवाच मार्ग शोधून काढला. एखादा देश प्रत्यक्ष ताब्यात ठेवणे फार महाग पडते. त्यापेक्षा त्या देशातील सत्ताधारी पक्ष, तिथला व्यापार, तिथले अर्थकारण आपल्या ताब्यात ठेवायचे. त्या देशाचे व्यापारी शोषण तर करायचेच, पण त्याहीपेक्षा सुखासीन जीवनाची लालूच दाखवून तिथले मनुष्यबळ आपल्याकडे खेचायचे. देशोदेशींचे बुद्धिमान लोक अशा तऱ्हेने अमेरिकेचे दास बनले. पण जगात शेराला सव्वा शेर भेटतच असतो.

अमेरिकेला तर दोन सव्वाशेर भेटले आहेत. एक चीन आणि दुसरे मुसलमान. चीन अमेरिकेचीच आर्थिक वर्चस्व स्थापन करण्याची युक्ती वापरून तिच्यावर मात करू पहातोय. तर मुसलमान आतून अमेरिकेला पोखरून काढू पहातायत, या प्रयत्नात त्यांना वल्लभीपूरच्या नगरशेटसारखा आपल्याच सरकारवर संतापलेला एक भिडू भेटलाय तो म्हणजे डेमोक्रॅटिक पक्ष. अमेरिकन राजकारणात रिपब्लिकन आणि डेमोक्रेटिक असे दोनच प्रमुख प्रतिस्पर्धी पक्ष आहेत. रिपब्लिकन पक्ष हा थोडा उजव्या विचारांचा म्हणजे नैतिक मूल्ये इत्यादी मानणारा पक्ष आहे तर डेमोक्रेटिक पक्ष हा मुक्त, उदारमतवादी विचारांचा आहे. समाजात 'लिव्ह-इन' नातेसंबंध, मुक्त लैंगिक स्वातंत्र्य असावे, शस्त्रास्त्र बंदी असावी, अमली पदार्थांवर बंदी नसावी, चीन आणि रशियाशी व्यापार बंदी नसावी, गर्भपात करावा की न करावा याचा निर्णय शासनाने न घेता संबंधित महिलेने घ्यावा, अशा त्यांच्या उदार राजकीय कल्पना आहेत.

सोव्हिएत रशिया संपल्यामुळे निराधार झालेले साम्यवादी उदारमतवादी डेमोक्रेटिक पक्षात घुसून त्यांनी तो पक्ष ताब्यात घेतलाय की काय, अशी शंका येण्याइतपत डेमोक्रेटिक पक्षाची धोरणे अतिरेकी डावी होत चालली आहेत.

वोकिझम या नावाने बोकाळू पाहणारा उदारमतवादी म्हणजे सांस्कृतिक साम्यवाद असून ही वाळवी अमेरिकन समाजाला आतून पोखरून काढते आहे. पण रिपब्लिकन पक्षाच्या आणि विशेषतः ट्रम्प यांच्या द्वेषाने आंधळे होऊन डेमोक्रेटिक नेते देशविघातक कृत्यांना उत्तेजन देत आहेत की काय, अशी शंका वाटण्यासारखी स्थिती आहे. मुसलमान हे अशिक्षित आणि गरीब असल्यामुळे ते गुन्हेगार किंवा अतिरेकी बनतात, असा जगभरच्या सगळ्या उदारमतवाद्यांचा लाडका सिद्धांत असतो. तसाच तो अमेरिकन डेमोक्रेटिक नेत्यांचाही असावा.

खरे तर ११ सप्टेंबर २००१ या दिवशी हा सिद्धांत नुसता कोसळलाच नव्हे, तर भस्मसात झाला. कारण न्यू यॉर्क वर्ल्ड ट्रेड सेंटरचे जुळे मनोरे उद्ध्वस्त



करणारे मुसलमान अतिरेकी उच्चशिक्षित आणि श्रीमंतही होते. अमेरिकन अर्थव्यवस्था उद्ध्वस्त करण्यासाठीच त्यांनी हा कट अतिशय योजनाबद्धपणे आखला होता, हे सगळ्या जगाला कळले. यानंतर प्रचंड आणि वेगवान घटना घडत राहिल्या.

अमेरिकेने प्रथम अफगाणिस्तानवर हल्ला केला. मग इराकवर हल्ला केला. सतत १० वर्षे प्रयत्न करून अखेर ओसामासारखा जबरदस्त वैरी खतम केला. पण देशाच्या बाहेर हे सगळं घडत असताना देशाच्या आत सांस्कृतिक साम्यवादी आणि मुसलमान शांतपणे एकत्र होत होते. याचा परिणाम म्हणजे डेमोक्रॅटिक पक्षाने न्यू यॉर्क या देशाच्या आर्थिक राजधानीच्या महापौर पदासाठी झोहरान ममदानी या मुसलमान उमेदवाराला तिकीट दिले. त्यापुढचा भाग म्हणजे परवाच या निवडणुकीचा निकाल लागून हा उमेदवार चक्क निवडून आला आहे.

झोहरान ममदानीची आई म्हणजे 'सलाम बॉम्बे' या चित्रपटाची दिग्दर्शिका मीरा नय्यर. या बाई पंजाबी, हिंदू, उदारमतवादी. त्यांनी महमूद ममदानी यांच्याशी लग्न केले. हे ममदानी मूळचे गुजराती खोजा मुसलमान. ते प्रथम युगांडात स्थायिक झाले. झोहरानचा जन्म युगांडाची राजधानी कंपुला शहरात झाला. आता हे सगळे कुटुंब अमेरिकेत स्थायिक झाले आहे.

न्यूयॉर्क शहर हे नेहमीच डेमोक्रेटिक पक्षाच्या बाजूने राहिलेले आहे. म्हणजे न्यू यॉर्कच्या मतदारांनी झोहरान ममदानीला व्यक्ती म्हणून मत दिलेले नसून डेमोक्रेटिक उमेदवार म्हणून दिलेले आहे. यात अमेरिकन रिपब्लिकन पक्षाच्या सरकारवर राग हेही एक महत्त्वाचे कारण आहे. सरकारी आर्थिक प्रक्रिया या किचकटच असतात. पण प्रशासनाला या किचकटपणातून मार्ग न काढता आल्यामुळे १ ऑक्टोबर २०२५ पासून सर्व सरकारी कामे ठप्प आहेत. मुख्य म्हणजे सरकारी कर्मचाऱ्यांना पगारच मिळालेला नाही. याचा राग व्यक्त करताना मतदारांनी ट्रम्प यांच्या विरोधातील डेमोक्रेटिक पक्षाला मतदान केले. परिणामी ममदानी महापौर झाला. (लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)

---

# कॉर्पोरेट



सुखात्म

**डॉ. अविनाश मोहरील**

आपल्या देशात विविध क्षेत्रांचा विचार करता उद्योग जगतातील खाजगी क्षेत्र ज्याला आपण सामान्यपणे कॉर्पोरेट सेक्टर म्हणून ओळखतो ते एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. सार्वजनिक व सरकारी क्षेत्रात कार्य करणाऱ्या अनेकांना या कॉर्पोरेट जगताविषयी एका वेगळ्या प्रकारचे कुतुहल आहे. मुळात त्याबद्दल माहिती नसल्याने किंवा या क्षेत्रात सहजगत्या प्रवेश मिळत नसल्याने या क्षेत्राबद्दल एक प्रकारची गूढता वाटत राहते. प्रचंड पैसा व प्रचंड काम अशा स्वरूपात वावरणारे हे सारे लोक आपल्या कार्यामध्ये फार जास्त व्यग्र असल्याने सामाजिक व्यवस्थांमध्ये त्यांचा वावर कमी असतो. ही सारी मंडळी आपल्या वर्तुळात वावरत असतात, ज्या वर्तुळात सामान्य माणसाला प्रवेश करणे जरा दुरापास्त असते.

प्रचंड काम असल्याने एक तर या मंडळींकडे वेळ नसतो; त्यासोबतच प्रचंड पैसा मिळत असल्याने त्यांची जीवन जगण्याची शैली फारच वेगळी असते. ब्रॅन्डेड वस्तू वापरणे, ब्रॅन्डेड दुकानांमध्ये जाणे, पैसा भरपूर असल्याने त्याच्या अनुरूप सर्व बाबींची आवड जोपासणे, वरचेवर परदेशात जाणे या सर्व गोष्टीमुळे त्यांचे जीवनसमाजातील वरच्या स्तरामध्ये असते व त्याची सवय झाल्याने त्यांना इतर स्तरांमध्ये वावरणे अवघड जाते. सोबतच या क्षेत्रात अतिशय जास्त स्पर्धा असल्याने व स्वतःला सिद्ध केले तरच टिकाव लागणार असल्याने यांचे लक्ष काम, व्यवसाय, नफा, त्याचे फायदे या सर्व बाबींकडे जास्त असते. काहीही झाले तरी नफा मिळायलाच हवा अशा पद्धतीची मानसिकता या कॉर्पोरेट जगतातील प्रत्येकाच्या मनात जाणीवपूर्वक रुजविल्यामुळे हे सर्व लोक त्या व्यवस्थेनुरूप वागायला लागतात; जी अत्यंत स्वाभाविक बाब आहे.

सार्वजनिक क्षेत्रात कर्मचाऱ्याने कसेही काम केले, तरी सर्वात कठीण गोष्ट म्हणजे त्या कर्मचाऱ्याला नोकरीवरून काढणे. परंतु कॉर्पोरेट सेक्टरमध्ये कितीही काम केले तरी सर्वात सोपी गोष्ट असते ती म्हणजे कर्मचाऱ्याला नोकरीवरून काढणे. या गोष्टीमुळे 'परफॉर्म ऑर पेरीश' (सिद्ध करा किंवा नष्ट व्हा) हा कायदा या क्षेत्रात लागू असतो व पाळलाही जातो. म्हणूनच येथे कार्य करणाऱ्या प्रत्येकासाठी नफा सर्वोच्च स्थानी असतो. या क्षेत्राचे वर्णन करणारा 'कॉर्पोरेट' नावाचाच एक चित्रपट प्रसिद्ध दिग्दर्शक मधूर भंडारकर यांनी बनविला होता. वास्तववादी चित्रीकरण व कथावस्तूमुळे हा चित्रपट चर्चेत राहिला होता. असले चित्रपट किंवा या कॉर्पोरेट जगतातील गूढता यामुळे या जगताबद्दल सामान्य माणसाच्या मनात काही भावना तयार होतात. सर्वात महत्त्वाची भावना म्हणजे कॉर्पोरेट जगत हे भावनांचा किंवा मनाच्या संवेदनशीलतेचा विचार अजिबात करीत नाही; किंबहुना भावनिक असणे ही कॉर्पोरेट जगताला न परवडणारी गोष्ट आहे. येथे केवळ आणि केवळ व्यवहार बघितला जातो व संपूर्णतया व्यावहारिक प्रवृत्ती येथे जोपासली जाते. मनाचा तरलपणा, संवेदनशीलता, इतरांना भावनिक पातळीवर समजून घेणे वगैरे सारख्या बाबी येथे टिकू शकत नाही किंवा अशा मनोवृत्तीच्या व्यक्ती या जगतात टिकत नाही, असा समज सामान्यतः सार्वजनिक किंवा इतर क्षेत्रांत कार्य करणाऱ्या लोकांचा असतो. दुसरी भावना म्हणजे या मंडळींजवळ अमाप पैसा असतो व त्यामुळे पैशाच्या बळावर काहीही करता येते, ही या सर्व मंडळींची भावना असते. पैसा आहे त्यामुळे तो वाटेल तसा खर्च करणे व मजा करणे हे जीवनाचे सूत्र यांनी स्वीकारले असल्याने या मंडळींच्या सामाजिक जाणिवा बोथट झालेल्या असतात, असाही एक समज कॉर्पोरेट क्षेत्राच्या बाहेरील लोकांचा असतो. प्रामुख्याने रूढ झालेल्या या दोन्ही समजांमध्ये फार तथ्य आहे असे नाही. खरे तर एका वेगळ्या कार्यप्रणालीला समर्पित असलेले व कामाच्या व्यस्ततेमुळे पावलोपावली सामाजिक दृष्टीने उपलब्ध नसल्याने या सर्व मंडळींबद्दल झालेले हे पूर्वग्रहदूषित मत आहे. कॉर्पोरेट जगतामध्ये कार्य करीत असताना सामाजिक जाणिवा जीवित ठेवून प्रचंड मोठ्या प्रमाणात समाजाभिमुख कार्य केलेल्या अनेक लोकांची माहिती आपल्याला मिळू शकते. सामाजिक कामांसाठी त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या मर्यादित काळामध्ये हे लोक कधी कधी खूप मोठे काम करतात.

असेच एक मोठे काम मला नुकतेच ऐकायला मिळते. सामाजिक जाणिवा अत्यंत सजीव असलेल्या एका मोठ्या कंपनीच्या मॅनेजिंग डायरेक्टरने त्याच्या कंपनीत कार्य करणाऱ्या ३०० इंजिनीअर मंडळींकडून करून घेतलेल्या एका अभूतपूर्व कामासंबंधी मला माहिती मिळाली. समाजातील दिव्यांग मुलामुलींबाबत व त्यांच्यासाठी काहीतरी केले पाहिजे या विचाराने प्रेरित असलेल्या डायरेक्टर साहेबांनी त्यांच्या संपर्कातील काही दिव्यांगांच्या शाळांना भेटी दिल्या. तेथील मुलामुलींना शिक्षण घेताना काय अडचणी निर्माण होतात याबाबत त्यांनी माहिती घेतली. त्यानंतर त्यांनी तेथील व महाराष्ट्राच्या विविध भागातील अशा शाळांमधील अंध मुलामुलींसाठी एक अतिशय कल्पक उपक्रम त्यांच्या कंपनीतील इंजिनीअर्सच्या मदतीने करून घ्यायचा ठरविले.

मुजुमदार साहेबांनी अतिशय प्रामाणिक भावनेतून मांडलेली भावना त्यांच्या सहकाऱ्यांनी मनापासून उचलून धरली आणि त्यानंतर सुरू झाला कॉर्पोरेट जगतातल्या कल्पक लोकांचा एक अफाट उपक्रम. ३०० इंजिनीअर्सचे वेगवेगळे गट निर्माण करण्यात आले. त्यापैकी साधारण २० ते ३० लोकांनी वेगवेगळ्या रविवारी सुटीच्या दिवशी कंपनीमध्ये चार ते पाच तास येण्याचे कबूल केले. कंपनीमध्ये साऊंडप्रुफ असलेल्या केबीन्सचा वापर एका वेगळ्या सामाजिक कामासाठी केला गेला. तीन तीन लोकांची चमू तयार करण्यात आली.

एक व्यक्ती बोलणारा, एक ऐकणारा व एक तंत्रज्ञ म्हणून काम बघणारा. काम सुरू झाले... काय होते ते काम? या सर्व कॉर्पोरेट जगातील इंजिनीअर्स लोकांनी सहा महिन्यात अंध मुलांसाठी आठवी, नववी व दहाव्या वर्गाचा सर्व अभ्यासक्रम रेकॉर्ड करून उपलब्ध करून दिला. संपूर्ण अभ्यासक्रम महाराष्ट्रातील सर्व अंध विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध झाला. इतकेच नाही, तर त्यांना समजतील अशा प्रकारे त्याचे स्पष्टीकरणदेखील त्यांनी सोबत रेकॉर्ड केले. एक अभूतपूर्व काम; अर्थात हे केवळ रेकॉर्डिंग नव्हते तर अंध मुलांना कळेल असे स्पष्टीकरण त्याच द्यायचे होते.

**(पान ६ वर)**

---

संस्कारांच्या देशा

**रमा गोळवलकर**

# विवाह - २
# कन्यादान



गेल्या काही दशकांत सनातनी विवाहात करण्यात येणाऱ्या विधींवर टीकेची झोड उठवण्यात येते आहे. हे सगळे विधी स्त्री-पुरुष समानतेच्या विरोधात असल्याचं रंगवण्याच्या विविध स्पर्धांच या सगळ्या पुरोगामी म्हणवणाऱ्या छुप्या कम्युनिस्टांत लागलेल्या आहेत. त्यामुळे नव्या पिढीच्या मंडळींनी त्याचा विरोध करायला सुरुवात केलेली आहे. अर्थात हे सगळे विधी ज्या काळात योजण्यात आले आहेत, ते त्या कालानुरूप आहेत. त्यांना त्या काळच्या नीतिमत्तेच्या चौकटी लागू होतात, हे सगळ्यात आधी लक्षात घेतलं पाहिजे. मानवी उत्क्रांतीची दुसरी लाट म्हणवल्या गेलेल्या कृषिप्रधान समाजव्यवस्थेत माणूस गेली कित्येक सहस्रकं नांदत होता.

गेल्या तीन शतकांत आधी औद्योगिकीकरण, यंत्र-तंत्रज्ञान प्रधानता आणि आता डिजिटल क्रांतीच्या लाटांवर हा समाज स्वार झालेला आहे. समाजाचं अर्थकारण बदलत गेलं, तशा तशा समाजाच्या गरजा बदलल्या. त्यानुसार विचारसरणी बदलत गेली. कृषिप्रधानतेत मानवी आणि पाशवी श्रमावर सगळी कामं होत होती. हस्तकौशल्याला महत्त्व होतं. मानवी हातांनी घडवलेल्या मर्यादित संख्येच्या वस्तू समाजाच्या

गरजा भागवण्यास अपुऱ्या होत्या. मागणी जास्त आणि पुरवठा त्या तुलनेत कमी अशी परिस्थिती होती. त्यामुळे सगळ्याच चर आणि अचर गोष्टींची वज होती. आज 'वज' हा शब्ददेखील समजेनासा झालेला आहे. वज असणे म्हणजे एखाद्या वस्तूचं, गोष्टीचं, नात्याचं महत्त्व समजून ती जास्तीत जास्त टिकावी म्हणून ती योग्य प्रकारे जपून सांभाळून वापरणे.

आजकाल या 'वज' असणे वा नसणे ऐवजी 'किंमत' असणे किंवा नसणे असा शब्दप्रयोग होऊ लागला आहे. कारण आहे विकासाची दुसरी लाट औद्योगिकीकरण. मोठमोठाले कारखाने चालवायचे तर त्यांची आर्थिक घडी व्यवस्थित चालायला हवी. त्यांना दिवसाचे २४ तास आणि वर्षाचे ३६५ दिवस ती अवजड यंत्र चालत राहायला हवीत. त्यातून निर्माण होणारं उत्पादन विकलं जाणं आवश्यक आहे. त्यासाठी बाजारपेठ तयार करावी लागते. मग हे उत्पादन वापरल्यास तुमच्या आयुष्यात काय काय बदल घडवून येतील, याची जाहिरात करावी लागते. त्यातल्या बहुतेक जाहिरातींत अमुक एक वस्तू आम्ही सर्वात कमी किमतीत देतो, हे ठासून सांगितलं जातं.

उत्पादनाला जशी किमतीची चिठ्ठी (प्राईस टॅग) असते, तशीच आता नात्यांना लावण्यात येऊ लागली आहे. हे चांगलं का वाईट हे ज्याचं त्याचं ज्यानं त्यानं ठरवावं. पण आजच्या विचारांच्या चौकटीत कृषिप्रधान समाज व्यवस्थेत निर्माण झालेल्या विधींची चिरफाड करणं खरं तर असयुक्तिक आहे. कारण त्याची संदर्भ चौकटच वेगळी आहे.

सनातनी विवाह विधी गेली किमान १४ हजार वर्षं (राम-सीता विवाह) आणि त्याही आधीपासून या भूमीत करण्यात येत आहेत. त्यातले अनिवार्य असलेले विधी म्हणजे कन्यादान, लाजाहोम आणि सप्तपदी. यापैकी सध्या कन्यादानावर हलकल्लोळ माजवण्यात येत आहे. कन्यादान नाही, कन्यामान करा, मुलगी ही दान करण्यासाठी काय वस्तू आहे का वगैरेसारखे संदेश प्रसृत करण्यात येत आहेत. ज्यांना संस्कृत भाषेचा गंध नाही, सनातन धर्माचं ज्ञान नाही आणि आपल्या संस्कृतीची जाण नाही अशा हवशा-नवशांचा बुद्धिभेद होण्यास एवढं निमित्त पुरेसं आहे. कन्यादान या विधीविषयी जाणून घेण्यासाठी

**'तुका म्हणे येथे पाहिजे जातीचे ।**
**येरा गबाळ्याचे काम नोहे ।।'**

सर्वप्रथम 'दान' हाच शब्द पाहू या. छांदोग्य उपनिषदात एक कथा येते.

देव दानव आणि मानव निर्माण केल्यानंतर तिन्ही प्रजातींसाठी प्रजापिता ब्रह्मदेवानं एकच अक्षर उच्चारलं 'द.' त्यातून कोणी काय अर्थ काढला, हे विचारल्यानंतर देव म्हणले दमन अर्थात इंद्रिय दमन करण्याचा उपदेश केला आहे. दानवांनी द पासून दया असा अर्थ घेतला आणि मानवानं मात्र द पासून दान असा अर्थ घेतला. त्यामुळे मानवांनी दान करावं असा प्रघात आहे.

दान करणं म्हणजे देणं हा लौकिक अर्थ असला, तरी दान देणाऱ्याला काही नियम पाळावे लागतात. ज्याला दान करायचं तो ते स्वीकारण्यास योग्य असायला हवा (सत्पात्री दान). ज्याचं दान द्यायचं ते मूर्त किंवा अमूर्त असलं, तरीही दात्याकडे उपलब्ध असलेल्यापैकी सर्वोत्तम आणि अतिप्रिय असावं. दान देण्यामागचा हेतू शुद्ध आणि उदात्त असावा. एकदा का दान दिलं की त्याविषयीचे सगळे स्नेहबंध, मोह सोडून निर्लिप्त व्हायचे.

कन्यादान विधीत कन्येचे मातापिता कन्येनं वरलेल्या वराला आपली पोटची पोर देताना हे सगळे नियम पाळतात. त्यात मुख्य तीन उद्देश असतात. वधू-वरांच्या सहजीवनात त्यांची अभिवृद्धी व्हावी. त्यात माहेरच्या कोणाचीही ढवळाढवळ नसेल. वधुपित्याच्या बारा आणि वधुमातेच्या बारा पिढ्यांना जिथे सदा निरातिशय आनंदाची अनुभूती होते अशा ब्रह्मलोकाची प्राप्ती व्हावी, वधूच्या मातापित्याला लक्ष्मी-नारायणाचं प्रिय होता यावं म्हणून हे कन्यादान करण्यात येतं.


कन्या आणि वर दोघांच्याही वंशांची वृद्धी व्हावी म्हणून ही सुसंस्कारित, सुविद्य आणि लाडकी कन्या समर्पित करण्यात येते. यात तिला वस्तू किंवा आजच्या भाषेत कमोडिटी म्हणून देऊन टाकणे हा भाव किंवा उद्देश निश्चितच नाही. माता झाल्याशिवाय स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वाला पूर्णत्व येत नाही, हा निसर्गाचा नियम आहे. आई होण्यासाठी तिला अनेक स्थित्यंतरं पार करावी लागतात.

सुप्रजा निर्माण व्हावी म्हणून उत्तम वंशाच्या सद्गुणी पुरुषाच्या शुक्राणूंची आवश्यकता असतेच; शिवाय माता आणि बाळाला सर्वप्रकारची सुरक्षा आणि आधार मिळावा, ही मातापित्याची आंतरिक इच्छादेखील असते. म्हणूनच कन्यादान विधीच्या शेवटी वधुपिता वराला म्हणतो की, धर्म अर्थ आणि काम म्हणजे कर्तव्यपूर्ती, धन आणि साधनांचा विनियोग तसंच विविध इच्छा-आकांक्षा पूर्ण करत सुखोपभोग घेताना माझ्या मुलीला डावलणार नाही, असं वचन तू मला दे. त्याप्रमाणे वर त्यांना 'नातिचरामि' मी (तिला) डावलणार नाही.

तिच्या संमतीनंच सारं करेन, असं वचन देतो. विवाह संस्काराचा पुढचा विधी पुढच्या लेखात, तोवर उत्तमोत्तम सनातन संस्कारांचा अंगीकार करू या.

उगवतीचे रंग
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

# सुखी जीवनासाठी नवीन एबीसीडी... भाग दोन



A TO E पर्यंतची मुळाक्षरे सुखी जीवनासाठीच्या कोणत्या गोष्टींचे प्रतिनिधित्व करतात हे आपण मागील पहिल्या भागात पाहिले. तो लेख वाचल्यानंतर अनेक वाचकांनी इच्छा व्यक्त केली की ही एबीसीडी... म्हणजेच- A TO E पर्यंतची वर्णमाला पूर्ण करावी. त्यातूनच हा आजचा लेख आपल्यासमोर येत आहे. या वर्णमालेतील पुढील अक्षरे कोणत्या मौल्यवान गोष्टी आपल्याला सांगतात हे जाणून घेऊया...

**F- Friend (मित्र) आणि Faith (श्रद्धा)**

आपल्या जीवनात सत्ता आणि संपत्ती यापेक्षाही अधिक महत्त्व मित्रांचे असते ज्याला खरे मित्र लाभले तो खरोखर भाग्यवान! मन:स्वास्थ्य टिकवण्यासाठी खरे, सच्चे मित्र हे मानसिक टॉनिकसारखे असतात. संवाद, आधार आणि प्रसन्नता यांचं मूळ मैत्रीत दडलेलं असतं.

तसंच F हे अक्षर Faith म्हणजे श्रद्धा या एका अत्यंत महत्त्वाच्या जीवनमूल्याचे देखील प्रतिनिधित्व करते. स्वत:वर, जीवनावर आणि एका सकारात्मक शक्तीवर असलेली श्रद्धा मनाला आधार देते, जीवन जगण्याची ऊर्जा देते.

**G- Gratirvde (कृतज्ञता) आणि Goal (ध्येय)**

दररोज कृतज्ञता व्यक्त करणं म्हणजे मानसिक स्वच्छताच. कृतज्ञता मनाला डिटॉक्स (शुद्ध) करण्याचं काम करते. त्यामुळे आपल्याला जीवन जगण्यासाठी ज्या- ज्या व्यक्तींची आणि गोष्टींची मदत होत असते त्यांच्याबद्दल कृतज्ञ राहणे आपले कर्तव्य असते. तसेच जीवनात कोणतं तरी ध्येय (Goal) असलं पाहिजे. त्यामुळे आपल्या मार्ग भरकटत नाही. आपण गोंधळात हरवत नाही. 'ध्येय' म्हणजेच जीवनाला दिशा. ध्येयहीन जीवन म्हणजे दिशाहीन किंवा निरर्थक जीवन जगणे.

**H- Habirt (सवयी) आणि Hsmou (हास्यविनोद)**

दैनंदिन सवयीच आपलं आरोग्य घडवतात- उठण्यापासून झोपेपर्यंत. लहानपणापासूनच चांगल्या सवयी जोपासणं अतिशय महत्त्वाचं. आणि हास्य? ते तर मनाचं औषध! खरं तर ते अनेक आजारांवरील विनामूल्य असलेले औषध आहे. मन:स्वास्थ्यासाठी रोज खळखळून हसणं ही खरी योगसाधना.

**I- Inriration (प्रेरणा) आणि Inner Peabe (आंतरिक शांती)**

जीवनात प्रेरणा मिळणं ही उर्जा आहे. जीवनात कुठलेही काम करायचे असेल किंवा यशस्वी व्हायचे असेल तर प्रेरणा (inriration) ही अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. तर आंतरिक शांती टिकवणं ही शक्ती. सुखी, शांत आणि निरामय जीवनासाठी आंतरिक शांती अतिशय महत्त्वाची आहे. प्रेरणा आणि आंतरिक शांती या दोन्हींचा संगम आरोग्याच्या वाटचालीस बळ देतो.

**J- Joy (आनंद), Jorunaling (दैनंदिनी लेखन)**

आनंदी राहणं ही वृत्ती आहे. ही फुलांकडूनही शिकता येते आणि मुलांकडूनही शिकता येते. गुलाब काट्यावर फुलतो परंतु कोणतेही दु:ख त्याचे फुलण्यात आपल्याला दिसत नाही. लहान मुले एखादी गोष्ट हवी असेल किंवा त्यांना बरे नसेल तर तेवढ्यापुरते रडतात परंतु लगेच ते दु:ख विसरून हसायला लागतात. त्याच्याकडे पाहिल्यानंतर आपल्याला प्रसन्न वाटते.आनंदाची जाणीव ठेवणं म्हणजेच आयुष्याशी आपला संबंध जिवंत ठेवणं.

दिवसातले अनुभव, भावना, निरीक्षणं लिहून ठेवणं. यामुळे आत्मचिंतनाचं सुंदर साधन मिळतं.

**K- Kinner (दयाळूपणा) आणि Knowledge (ज्ञान)**

दया आणि करुणा ही सहृदय व्यक्तीच्या स्वभावाची लक्षणे आहेत. क्षमा हे वीराचे भूषण आहे असे आपण म्हणतो.

तर knowledge म्हणजे ज्ञान हे जीवनातील सर्व क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी पहिली महत्त्वाची गोष्ट आहे.

**L- Laughter (हास्य), Love (प्रेम) AmU Leirrue (फुरसतीचे क्षण)**

हे तीनही घटक मनाला तरतरीत ठेवतात. प्रेम आणि हसू म्हणजे मनासाठी अमृत. तर निवांत क्षण म्हणजे मनाला स्वत:शी जोडणारा सेतू.

**M- Mental Health (मानसिक आरोग्य), Mruib (संगीत) आणि Money (अर्थनीती)**

मनाचं आरोग्य राखणं आजच्या काळात अत्यावश्यक. संगीत हे मनाचं टॉनिक. आणि पैसा - तो साधन आहे, साध्य नव्हे, हे लक्षात ठेवलं तरच 'मन:शांती' टिकते.

**N- Nrrvition (पोषण) आणि Narrve (निसर्ग)**

चांगलं अन्न म्हणजे उत्तम आरोग्याचं पायाभूत साधन. तर निसर्गाशी असलेली जवळीक- ती म्हणजे मनाचं विश्रांतीस्थळ.

**O- Otimirm (आशावाद) आणि Owygen (प्राणवायू)**

आशावाद म्हणजेच अंतर्मनाचा उजेड. आणि शुद्ध हवा, मोकळं श्वसन- याचं आरोग्याशी थेट नातं आहे. ध्यान, प्राणायाम यामुळे शुद्ध प्राणवायू मिळतो.

**P- Poritive Thinking (सकारात्मक विचार), Prabtibe (सराव) आणि Perrirtenbe (सातत्य)**

सकारात्मक विचार मानवी जीवनाला एक वेगळी दिशा आणि शक्ती देतात परिस्थिती कोणतीही असो निराश व्हायचे नाही हे सकारात्मक विचार आपल्याला शिकवतात. सकारात्मकता, नियमित सराव, आणि सातत्य ही आरोग्य टिकवण्यासाठीची त्रिसूत्री आहे.

**Q - Quiervde (शांतता)**

स्वत:शी संवाद साधण्यासाठी, मनाच्या खोल पातळीवर पोहोचण्यासाठी, शांतता आवश्यक आहे. रोजच्या धावपळीतून थोडा तरी वेळ स्वत: साठी काढा हा स्वसंवाद आपल्याला मानसिक शक्ती देईल.

**R - Rert (विश्रांती), Reading (वाचन) आणि Reflebtion (मनन)**

काम जसं गरजेचं, तशी विश्रांतीही. चांगलं वाचन मनाला समृद्ध करतं, आणि मननातून जीवन अधिक स्पष्ट होतं.

**S- Sleep (झोप), Sobial Servibe (समाजसेवा), Self-dirbiline (स्वशिस्त)**

झोप हीच खरी पुनर्निर्मिती. शरीराची झालेली झीज झोपेमुळे भरून निघते. समाजासाठी काही करणं (robial rervibe) ही आरोग्याची एक प्रेरक भावना. शिवाय समाजाचे आपण देणे लागतोच ते या माध्यमातून काही अंशी तरी परत करता येतो. आणि स्वयंशिस्तीशिवाय आयुष्यात प्रगती होत नाही.

**T- Time Management (वेळेचं नियोजन)**

ज्याला वेळेचं नियोजन करता आलं, तो आयुष्यात यशस्वी नक्कीच होतो. वेळेचं व्यवस्थापन म्हणजे तणावापासून संरक्षण सुद्धा.

**U- Underrtanding (समज), Uniry (एकात्मता)**

समजूतदारपणा म्हणजे संबंध टिकवण्याची गुरुकिल्ली. व्यक्तीचे आणि समाजाचे आरोग्य टिकून राहण्यासाठी आणि सुखी जीवनासाठी युनिटी म्हणजेच एकात्मता आवश्यक आहे. आरोग्य केवळ शरीराचं नसून सामाजिक व कौटुंबिक संबंधांचे आरोग्यही तितकंच महत्त्वाचं. ती एकात्मता जोपासता यायला हवी.

**V- Vabbination (लसीकरण), तर luer (मूल्यं)**

लस म्हणजे शरीराचं संरक्षण. ती विविध आजारांपासून आणि साथीच्या रोगांपासून शरीराला संरक्षण देते. तसंच जीवनमूल्यं म्हणजे मनाचं आणि जगण्याचं बळ. दोन्ही आपल्याला सुरक्षित करतात.

**W- Water (पाणी), Walking (चालणं)**

पिण्याचे शुद्ध पाणी, दररोज पायी चालणं हे आरोग्याचे मूलमंत्र आहेत.

**X- examination/ X-re (स्वत:चं निरीक्षण, वैद्यकीय तपासणी)**

नियमित आरोग्यतपासणी म्हणजे आजार होण्याआधीच त्याला थांबवणं. आत्मनिरीक्षण हेही एक प्रकारचं मनाचं एक्स-रे आहे.

**Y- Yoga (योग) आणि Yer Life**

योग हा मन, शरीर आणि आत्म्याचा संगम. आणि 'हो' म्हणणं- आयुष्याच्या प्रत्येक सुंदर संधीला स्वीकारणं- याचं आरोग्याशी नातं आहेच.

**Z - Zen (शांत, सजग जीवनपद्धती)**

झेन म्हणजे साक्षीभाव. सजगतेनं, शांतपणे, सजगपणे जीवन जगणं- यापेक्षा सुंदर आरोग्यसंस्कृती नाही.

ते न ही केवळ वर्णमाला नाही, तर आरोग्याचं एक प्रेरणादायी गीत आहे. प्रत्येक अक्षर एक आठवण करून देतं. की आरोग्य ही केवळ शरीराची गोष्ट नसून, ती मन, विचार, नाती, पर्यावरण, संयम आणि आनंद यांचा सुंदर संगम आहे.

ही सुखी जीवनासाठीची नवीन एबीसीडी आपण लक्षात ठेवण्याचा प्रयत्न करूया...

## शहाणपणा

सुटे ना कोणा, आयुष्याचा उखाणा ।।
तरी जाईना, मी पणा मी पणा ।।
कमी बोलण्यात, नसतो कमीपणा ।।
जागवा संवेदना, मिळेल मोठेपणा ।।
आयुष्याच्या चौथ्याप्रहरी, प्रत्येक जण केविलवाणा ।।
सहन करावे लागतात, प्रारब्धाचे घाव घणाघणा ।।
शेवटी सोबतीला प्रत्येकाच्या, केवळ एकटेपणा ।।
नका जोपासू हेकडपणा, साथ कोणाची मिळेना ।।
सूर ज्याला गवसला, जीवन त्याचे सोळा आणा ।।
शरण जो नारायणा, तोच खरा शहाणा ।।
जवळ करा अध्यात्मा, शांत करा चित्ता ।।

शिरीष मुंजे

## दगाबाज

विश्वास ठेवावा रक्तातल्या नात्यावर
दगाबाज सगळे विश्वासघात करून गेले !
हसवण्याचा ज्यांना आटोकाट प्रयत्न केला
बेईमान सगळे मला ढसाढसा रडवून गेले !
आयुष्यभर ज्यांच्यावर जिवापाड प्रेम केले
द्वेषात माझ्या तेच सगळे गद्दार ढवळून गेले !
फुलासारख्या भावना जरी जोपासत राहिलो
हळव्या भावनांना दगलबाज तुडवून गेले !
क्षणात गळणारे आसवांचे गळके डोळे माझे
क्रूरतेने धोकेबाज डोळे माझे फोडून गेले !
अगदी समजलो जवळचे मी ज्यांना
कुरुक्षेत्रावर महाभारत बेईमान घडवून गेले !
मृत्यू जरी अटळ असला तरीही
जिवंतपणी कावेबाज मला ठार मारून गेले !

सुनील घावट

## गृहलक्ष्मी

गृहिणी घरची! कामात असते!
कर्तव्य करते! सारं काही!!
सर्वांची काळजी! कार्यात तत्पर!
शाळेला दप्तर! मुला देते!!
कुटुंब सांभाळ! गळ्यातली माळ!
पतींचा सुकाळ! धागा बांधी!!
पहाटे जुपते! रात्रीही थकते!
पाठीत वाकते! कष्ट करी!!
दोन कुटुंबात! असते सलग्न!
कार्यात ती मग्न! सर्वांसाठी!
सरस्वती लक्ष्मी! तिच्यात भरली!
सौभाग्य नटली! पतींसाठी!!
अंगणी तुळस! सत्त्वात भासली!
तत्त्व जोपासली! घरासाठी!!
जीवन संगिनी! असे अर्धांगिनी!
प्रदीप ते जाणी! गृह लक्ष्मी!!

प्रदीप पाटील



कोणे एके काळी
स्वाती काळे (कोलारकर)

# रामायण-महाभारतातील पशु-पक्षी,



रामायण-महाभारतासारखे महान ग्रंथ वाचताना निसर्गाचा मनमोहक लपंडाव आपले लक्ष वेधून घेतो. या महाग्रंथांमधील पशुपक्षी माणसाच्या सुखात हसतात आणि दु:खात कोमेजतात. या दोन्ही महाग्रंथांमध्ये निसर्ग संवादक आहे. निबिड अरण्याचा मंद्र सप्तकातील तरल आत्मसंवाद म्हणजे व्यासमुनी रचित महाभारत. धीरगंभीर नदीचा खोल सनातनी संतत प्रवाह म्हणजे वाल्मीकि रचित रामायण. रामायण- महाभारत काळात पशुपक्ष्यांची भाषा मनुष्याला उमजायची. माणसाची सय प्राण्यांना समजायची.

पक्षी आकाशी झेप घेत प्रकाशाची भाषा बोलीत. हिमालयाच्या कुशीतून निघालेल्या सप्तनद्या एकमेकींच्या जिवलग सख्या होत्या. आरण्यके पशुपक्ष्यांच्या निर्भय चित्कारांनी आनंदविभोर होती. महाभारत म्हणजे पंचमहाभूतांनी मांडलेला संसाराचा डाव आणि रामायण म्हणजे निसर्गाशी एकरूपत्व पावलेले संसारातले ईश्वरीय अस्तित्व. महाभारतीय सूक्ते फळाफुलांनी डवरलेली आणि प्राण्यांनी गजबजलेली आरण्यके आहेत आणि श्रीरामायणाची रचनाच मुळी क्रौंच पक्ष्यांच्या प्रणयाने उत्फुल्ल आणि विरहाने व्याकुळ झालेली आहे. रामायण घडले ते अरण्यातच. वाल्मीकि ऋषी तमस नदीकाठी भारद्वाज ऋषींसह गेले असताना त्यांना प्रणयक्रीडेत रममाण असणाऱ्या क्रौंच पक्ष्यांची जोडी दिसली. तेवढ्यात अचानक तेथे एक निषाद आला आणि त्याने नरपक्ष्याचा वध केला. त्याची मादी हे दृश्य पाहून करुण आकांत करू लागली. वाल्मीकि ऋषींना हे दृश्य पहावेना. त्यांनी निषादाला शाप दिला,

**'मा निषाद प्रतिष्ठां त्वमगम:शाश्वती: सम:।'**

पणनंतर त्यांना वाईट वाटले. त्यानंतर प्रत्यक्ष ब्रह्मदेवाने वाल्मीकि ऋषींना अभय देऊन सांगितले की, हा अनुष्ठुभ छंदातील श्लोक म्हणजे माझे वरदान आहे. या छंदात संपूर्ण जगाचे कल्याण होईल, अशा रामायणाची रचना तू कर. रामायणाच्या निर्मितीत क्रौंच्याचा करुण विरह आणि उत्कट प्रेम आहे आणि त्यामुळेच रामसीतेच्या प्राक्तनातही करुण विरह आणि दिव्य प्रीतीचा संगम झाला आहे.

भावार्थ रामायणात संत एकनाथ महाराजांनी श्रावण बाळ आणि त्याच्या मातापित्यांच्या पूर्वजन्माची कथा सांगितलेली आहे. एका तलावाजवळ दोन पक्षी राहायचे. तलावाच्या आत असणारा मासा त्यांच्याशी गुजगोष्टी करायचा. सगळं छान सुरू होतं, पण अचानक प्रचंड उष्म्यामुळे तलाव आटू लागला. पक्ष्यांनी माश्याला चोचीत धरून दुसऱ्या तलावाकडे नेण्याचे ठरवले, पण वाटेतल्या एका वृक्षाचा धक्का लागून मासा जमिनीवर पडला. या घटनेमुळे पक्ष्यांना अतीव दु:ख झाले आणि त्यांनी प्राण सोडला.

एका विलक्षण ऋणानुबंधाने बांधल्या गेलेले हे तीन जीव पुढील जन्मीचे श्रावण बाळ आणि त्याचे वृद्ध माता-पिता झाले. मनुष्यजन्मात त्यांनी अखेरीस रामाचा जप केला आणि त्यांना मोक्ष प्राप्त झाला. 'तू ही पुत्रशोकाने मरशील.' या शापामुळे खरं तर दशरथाला आनंद झाला. कारण या शापातच पुत्रजन्माचे वरदान होते. दोन पक्षी आणि एक मासा या तिघांच्या अतूट प्रेमबंधनातून रामाचा जन्म झाला, असे म्हणावे लागेल. रामायणात माणसांमधील प्रेम आहे, वैराची भावना आहे, सूडबुद्धीचे राजकारण आहे, त्यागाची परिसीमा आहे आणि पशुपक्ष्यांचे गूढरम्य गुजदेखील आहे; जे ऐकले तरच संपूर्ण रामायण उमगते.

त्रेतायुगात रामायण आणि द्वापार युगात महाभारत घडले असे म्हणतात. युगारंभी सृष्टीच्या सृजनासाठी अवतार पुरुषाचा जन्म होतो. रामायण काळातल्या माश्याप्रमाणे महाभारत काळात माश्याने सृदटी सृजनासाठी महत्त्वपूर्ण भूमिका निभावली आहे. महाभारतातील मनू आणि माश्याची गोष्ट माहितीच आहे. सिरीनी नदीत एका पायावर उभे राहून तपश्चर्या करीत असताना मनूजवळ एका छोट्या माश्याने आश्रय मागितला. सुरुवातीला माश्याला एका मातीच्या भांड्यात ठेवले. पण दिवसेंदिवस तो मोठा होत गेला. शेवटी मनूने त्याला समुद्रात सोडले तेव्हा तो म्हणाला, 'काही दिवसांनी प्रलय होणार आहे. तू एक बोट तयार कर आणि त्यात सप्तऋषी तसेच धान्याच्या सर्व बिया ठेव.' नंतर खरोखरीच प्रलय झाला. सृष्टी जलमय झाली, पण माश्याने त्यांना हिमालयाजवळ सुखरूप आणले. त्याने मनूला शेवटी सांगितले, 'मीच प्रजापती आहे.' त्याच्या आदेशाप्रमाणे मनूने नवीन सृष्टी निर्माण केली. रामायणातील राम आणि महाभारतातील कृष्ण दोघेही अश्वप्रेमी होते.

श्रीकृष्णाला अश्वहृदय कळायचे, असा महाभारतात उल्लेख आहे. युद्ध सुरू असताना त्याचे अश्व थकले तेव्हा त्याने पाण्याचा स्रोत निर्माण करून तहानलेल्या अश्वांना पाणी पाजले होते. श्रीकृष्णाजवळ पोपटी रंगाचा शैव्य, लाल रंगाचा सुग्रीव, सोनेरी ढगांप्रमाणे रंग असलेला मेघपुष्प आणि श्वेतवर्णीय वलाहक असे उच्च प्रतीचे घोडे होते. रामायणात सुमंत जेव्हा रामाला वनवासात सोडायला निघाले तेव्हा अश्वांच्या डोळ्यात पाणी आले आणि त्यांनी रथ पुढे नेण्यास नकार दिला. श्रीरामाच्या वियोगाच्या कल्पनेमुळे पांढरेशुभ्र अश्व काळेठिक्कर पडले. श्रीरामाने त्यांना कुरवाळत प्रत्येकाची समजूत काढली. रामायण आणि महाभारतात दोन्ही ग्रंथांमध्ये हरणाला विशेष महत्त्व आहे. दशरथाचा पुत्रकामेष्टी यज्ञ ज्यांच्यामुळे सफल झाला ते ऋष्यश्रृंग ऋषी हरणीच्या पोटातून जन्माला आले होते. मारीच राक्षसाने मायामृगाचे सुंदर रूप धारण करूनच सीतेला मोहात पाडले. म्हणजेच बलाढ्य अशा रावणवधासाठी एक चपळ बुजरे हरीण कारणीभूत ठरले. पांडव द्वैतवनात असताना युधिष्ठिराच्या स्वप्नात एक देखणे हरिण आले. ते दु:खाने म्हणते, 'हे राजन! आमचे भविष्य ते काय! या वनात फारच थोडे आम्ही शिल्लक राहिलो आहोत.' युधिष्ठिराच्या हृदयात हा सल खोलवर रुजतो आणि एक वर्षे आठ महिने द्वैतवनात घालविल्यानंतर पांडव त्रिणबिंदू सरोवराजवळील काम्यक वनात जातात.

युधिष्ठिराने हरणाचे स्वप्नातील बोलणेही मनावर घेतले आणि आपल्यामुळे निसर्गाचा तोल ढळू नये म्हणून ताबडतोब द्वैत वनातून स्थलांतर केले. महाभारत असो अथवा रामायण, त्यामधील महत्त्वपूर्ण घटनाक्रम पुढे सरकण्यासाठी प्राणीच कारणीभूत ठरले आहेत. कावळे, गिधाडे, घारी या सर्व पक्ष्यांना रामायण-महाभारताने महान स्थान दिले आहे. सदसुव नावाच्या गंधर्वाने सीतेबद्दल अभिलाषा बाळगली आणि त्याने कावळ्याचे रूप धारण केले. त्याच्या चोचीने सीतामाई जखमी झाली. हे पाहून श्रीराम संतापले आणि इषिका मंत्राने दर्भाची काडी मंत्रून कावळ्याकडे फेकली. कावळा तिन्ही लोकी फिरला, पण या शक्तीपासून बचाव करू शकला नाही आणि त्यामुळे श्रीरामांना शरण गेला. श्रीरामांनी कावळ्याचे मरणभय नष्ट केले. अयोध्येमध्ये लोमष ऋषींच्या शापामुळे एका ऋषितुल्य व्यक्तीला कावळा व्हावे लागले, पण रामभक्तीमुळे कावळ्याच्या रूपात राहूनही त्यांनी सर्वोच्च स्थान प्राप्त केले. या काकभुशुंडी ऋषींचे वास्तव्य हिमालयाजवळ निलाचर पर्वतावर आहे. रामायणात काकभुशुंडी आणि गरुड यांचा संवाद आहे. काकभुशुंडीने गरुडाला रामकथा सांगितली आहे. महाभारतात कावळ्यांचे दर्शन वेगळ्या संदर्भात होते. रात्री वटवृक्षाच्या पायथ्याशी पितृवधाने शोकाकुल आणि दुर्योधन वधाने अत्यंत संतप्त असा अश्वत्थामा बसला आहे. तेवढ्यात त्याला झाडावर घुबड झेपावताना दिसते आणि तिथे असलेल्या घरट्यातील सर्व कावळ्यांना धारदार चोचीने प्रहार करून ते मारून टाकते.

'उलुकम घोरदर्शनम...' महाभारतात या प्रसंगाचे सुंदर वर्णन केले आहे. घुबड आणि कावळ्यांच्या या प्रसंगामुळे महाभारतातील युद्धोत्तर संहाराला प्रचंड गती मिळाली आहे. सीतेच्या रक्षणासाठी जटायू पक्ष्याने रावणाशी युद्ध केले. गृध्र म्हणजेच गिधाड प्रजातीतला जटायू दशरथाचा मित्र होता.

अन्त्यसमयी त्याचे डोके आपल्या मांडीवर ठेवून श्रीरामांनी त्याला सारूप्यमुक्ती दिली. जटायूचा भाऊ संपातीसुद्धा दूरदृष्टीने सीता लंकेमध्ये नेमकी कुठे आहे, हे वानरांना सांगतो. रामायणात कावळे-गिधाडांची बहीण घारीची भूमिकासुद्धा महत्त्वाची आहे.

सुवर्चसा नावाच्या अप्सरेकडून अपराध घडल्याने ब्रह्मदेवाने तिला शाप दिला की, तू घार होऊन आकाशात भिरभिरशील आणि उ:शाप दिला की, राजा दशरथाच्या पुत्रकामेष्टी यज्ञात पुरोडाशाचा एक भाग सेवन करताना तू मुक्त होशील. कैकयीने पायसदानाचा अव्हेर केला त्या क्षणी घार हातावरचा प्रसाद घेऊन उडून गेली. हा प्रसाद तिने अंजनीच्या ओटीत टाकला आणि अंजनीच्या पोटी हनुमानाचा जन्म झाला. रामायणात खारीसारख्या चिमुकल्या प्राण्याचे प्रचंड महत्त्व आहे तर महाभारतात महाकाय अशा हत्तीचे महायुद्धामध्ये प्राबल्य दिसते. खारीच्या सत्कर्माची खूण म्हणून श्रीरामाची तीन बोटे तिच्या पाठीवर उमटली.

महाभारतात हत्ती म्हणजे राजाचे वैभव, परंतु धर्माच्या स्थिरतेचे प्रतीकही हत्तीच आहे. 'नरो वा कुंजरो वा' प्रसंगात जेव्हा धर्मराज द्रोणाचार्यांना त्यांचा पुत्र अश्वत्थाम्याच्या मृत्यूची चाहूल देतो आणि खरे तर अश्वत्थामा नावाचा हत्ती मरण पावलेला असतो तेव्हा द्वापार युगात काळाच्या आवश्यकतेनुसार बदललेल्या धर्माच्या व्याख्येची ग्वाही देण्यासाठी हत्तीच्या रूपकाचा चतुराईने वापर केलेला आहे. द्वापार युगात धर्माच्या प्रतिष्ठापनेसाठी प्रतिपक्षाची फसगत केली तरी चालते, हा संदेश धर्मस्थिरतेचे प्रतीकात्मक हत्तीरूप वापरूनच दिलेला आहे.

श्रीरामायणाचा मुख्य प्राण हनुमान कपिराज आहे. हनुमंत विजयाची देवता आहे. महाभारतात अग्निदेवाने खांडववन पर्वात अर्जुनाला रथ आणि ध्वजपताका दिली होती. त्या पताकेवर असणाऱ्या हनुमानाने अर्जुनाचे संरक्षण केले. महाभारत झाल्यानंतर अर्जुन रथातून खाली उतरला आणि काही क्षणातच ध्वजावरील हनुमानाने आकाशात झेप घेतली. कारण त्याच्या पृथ्वीतलावरील अस्तित्वाचा उद्देश आता संपला होता. महाभारतात भीमाच्या गर्वहरणाची एक सुंदर गोष्ट आहे. त्याला हनुमानाची शेपटीही उचलता आली नाही. तेव्हा डोळे किलकिले करून हनुमानाने धर्माबद्दल वक्तव्य केले आहे. तो म्हणतो, 'धर्म म्हणजे पशुपक्ष्यांवर केलेली माया. झाडांवर केलेले प्रेम. जर माणसाची बुद्धी इतर प्राण्यांवर अधिकार गाजवण्याच्या कामी येणार असेल तर तो अधर्म आहे. भीमा, तू वरुणपुत्र आहे, पण तुझी ताकत तू मुक्या प्राण्यांवर वापरू नको.' रामायण-महाभारताच्या प्राचीन ग्रंथांमधील सनातन धर्मविचार मुक्या प्राण्यांच्या सहज आचरणातून दिसतात आणि आपल्या मनात तेवढ्यात सहजपणे खोल तळाशी रुजतात.

ऋतूरंग.....


किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

# गारवा अजूनही आहेच हेमंताच्या अतरंगी....

खरे! तर हेमंत ऋतू हा वसंत किंवा शरद ऋतू सारखा फार विलोभनीय वैगेरे कधीच नसतो, कदाचित म्हणूनच महाकवी कालिदासाच्या ऋतुसंहार मधील चौथ्या सर्गात हेमंत ऋतुबाबत बोलत असतांना विशेष श्लोक त्यात नाहीत मात्र शृंगार वृत्तीच्या कालिदासाच्या नजरेतून हेमंत ऋतूतील प्रणय रम्यता अधिकच खुललेली दिसते. शृंगार हा हेमंत ऋतूचे महत्वपूर्ण अंग आहे हे कालिदासाने नेमकेपणाने हेरले. बोलीभाषेत 'उन्हाळा जोगी, पावसाळा रोगी आणि हिवाळा भोगी'. असे म्हटले जाते.

कालिदासाने हे हेरून हेमंतातील शृंगारवृत्ती टिपली आहे. प्रेमी प्रेमिकाच्या प्रणयधुंद क्षणाचा साक्षीदार असलेला हा हेमंत अनेकदा धुक्याच्या चादरीने वेढलेला असतो. शेतात जागलीवर पेटलेल्या शेकोट्या धुक्याची चादर आपल्या धूरामुळे आणखी दाट करण्यात हातभार लावत असतात. हिवाळ्यात काळ घोड्यावर बसून दौडत असला तरी कामाचा वेग कासवाच्या पाठीवर बसून चालत असतो. पावसाळ्यातली हिरवळ अजूनही हिरवी म्हणावी अशीच असते. पानातला ओलसर हिरवेपणा टिकवून ठेवलेला असल्यामुळे सृष्टी अजून तरी संपन्न असल्याची जाणीव होत असते. सृष्टीने अंगा खांद्यावर ओढून घेतलेली धुक्याची चादर सकाळच्या वेळी हिरव्या गवतावर अलवार उतरते आणि दवांचे मोती गवताच्या पात्यावर दाटेवाटीने बसलेले दिसतात. गवताच्या पात्या पेक्षाही बाभळीच्या काट्यावर अगदी टोकावर बसलेला दवाचा एक थेंब किती आकर्षक असतो याची जाणीव ते दृश्य प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय होत नाही. धुक्याच्या या चादरी आड अनेकदा सूर्य निस्तेज होऊन चंद्राचा मुखवटा घेऊन आपली रोजची भट्टी पेटवण्याचा प्रयत्न करत असतो आणि कधीतरी नऊ दहा नंतर त्याच्या त्या प्रयत्नाला यश येते. धुक्याची चादर विरुन जाते आणि सूर्याच्या भट्टीतून निघणारे हवेहवेसे उन्ह सृष्टीला सुखावत नेते. धुकं वितळत, दवांच्या मोत्याचे हारही पाणी पाणी होऊन जातात आणि इतका वेळ थंडीने गारठून गेलेल्या सृष्टीला पाय फुटून तिचे चलनवलन सुरू होते.

हेमंत सुरु झाला की, पानगळ सुरू होते. ह्या पानगळीच्या काळांत पानातील अन्नरस खोडात जमा करून वाळलेले पान गळते असं काहीसं मी शिकलो आहे. अर्थात झाडाच्या ह्या सवयी माणसाच्या संचयी वृत्ती इतक्या घातक नसल्या तरी ऐनवेळी घात नको म्हणून शिदोरी जपून ठेवण्याची वृत्ती वृक्षातही असते. पानगडीच्या काळात पान झडल्यावर पाखरांचे घरटे




उघडे पडते, गोठलेल्या कळ्या फुलांमध्ये परावर्तित होतात, कुठे केसरी देठांचे पांढरे प्राजक्त झाडाखाली सडा पडावा तसे टपटपतात, तर कुठे कुंदनकळ्याचा सडा टाकण्यासाठी कुंदाचे झाड अंगा खांद्यावर त्यांचा डोलारा घेऊन सज्ज असते.

पावसाळ्यात हिरवी झालेली सृष्टी आणि पिके, भाजीपाला हेमंताच्या ऋतूत परिपक्व होतात. या ऋतूत पाणी स्वच्छ, थंड आणि होते. सूर्य विसण घातलेल्या कोमट पाण्याप्रमाणे निवत घातल्यासारखा निमूटपणे माघार घेतलेल्या शिलेदारासारखा चेहरा पाडून बसतो. आषाढ श्रावणातल्या ढगानी ज्या सूर्याला निववले नाही त्या सूर्याला धुक्याची चादर शांत करते हा हेमंत ऋतूचा महिमा आहे.मंदिरातल्या काकड आरतीचे स्वर कानावर आदळावे एवढी निरव शांतता आजच्या काळात नसली तरी एखाद्या पहाटे लहानपणीच्या आठवणी जागवत एखाद्या मंदिरातील घंटारव कानावर येतो. अंगावर रंगीबेरंगी स्वेटर घालून या थंडीत जड झालेली वाट पावलांचा आवाज न करता तुडवत जाऊन मंदिरातल्या गार शांततेत बसण्याची सवड आजच्या काळात कुणाला मिळते ते सांगणे कठीणच, मात्र तो अनुभव अद्भुत असतो हे नक्की. कारण वेळ नाही नाही म्हणता कधी एखादी वेळी वेळ मिळाला आणि पहाटेची ही मंद निरव अद्भुत शांतता अनुभवले की माणूस या कामासाठी रोजच वेळ काढू लागतो.

हेमंत ऋतू पक्ष्याना स्थलांतर करताना पाहणारा ऋतू असतो. स्थलांतर करणे पक्ष्याचा स्थायी गुण आहे. एका ठिकाणाची आपली रसद संपली की ती मिळवण्यासाठी दुसर्या ठिकाणी जाण्याचे काम हे पक्षी करत असतात.

पक्ष्याचा हा गुण पुढे मानवाने स्वीकाराला आणि या पक्षातून त्या पक्षात स्थलांतरापुरते खेळ तो खेळू लागला. पक्षी गारठलेल्या रात्री आपल्याच पंखात चोच खूपसून निपचित पडून राहतात. तर कुत्र्यासारखे प्राणी आपल्या नखांनी माती उकरून जमिनीतली उब शोधून आपले नाक थंडीपासून वाचवत हेमंतातल्या गारव्याशी समतोल साधत असतात. संपूर्ण सृष्टी जिथ या थंडीशी समायोजन साधत असते तिथे शाळेत जात असताना अंगावर धावणारी थंडी, प्रसंगी शिक्षकांनी वर्ग खोल्यातून बाहेर काढत पहाटच्या उन्हात बसवलेले वर्ग, फळ्या विना भरलेल्या त्या वर्गात वाचनावर दिलेला भर आणि थंडीमुळे शब्द शब्द गोठुन वाचताना होणार्या गमती या सर्व आठवणी अजूनही मनात ताज्या असतात. शाळेत कचरा जमा करून तो पेटवून रंगलेल्या गप्पा,त्या मैफिली विसरणे केवळ अशक्य.

हेमंताची थंडी बोरीच्या काटेरी झुडुपात आंबट गोड बोर पिकवण्यात मोलाची भूमिका पार पाडते. ह्याशिवाय चिंचा, कवठ अश्या रानफळांचा हा मौसम असतो. आमच्या शाळेसमोर पाच सहा बोर विकणाऱ्या म्हाताऱ्या बसत असतं. अजूनही त्या शाळे समोरून जाताना बोर विकणाऱ्या म्हाताऱ्या कुठे आढळतात का? हे माझी नजर शोधत असते, पण अनेक आंबट गोड आठवणी जशा आपल्या जीवनातून हद्दपार झाल्या तशा शाळेसमोर बसणाऱ्या बोर विकणाऱ्या म्हाताऱ्या आहेत शाळेसमोरून हद्दपार झालेल्या दिसतात. गावखेड्यातून रविवारी बाजार करायला येणाऱ्या पाहूण्याच्या हातात तुरीच्या शेंगा आणि पिकलेली लालबुंद बोर ह्यांनी भरलेली थैली असण्याचा तो काळ होता. माझ्या वडिलांचे मामा प्रामुख्याने त्यात अग्रेसर असत. पुढे वडिलांचे मामा वारले, बाबाही वारले, आधुनिक काळात घरी येणाऱ्या पाहुण्यांचा ओघ कमी झाला, त्यांच्यासोबत घरी येणाऱ्या रानमेव्याचा सुगंधही विरून गेला. संकरीत वाणं असलेले चवहीन बोर पोट भरल्याची जाणीव करून देत असले तरी जिभेवर आंबट गोड बोरांची उरणाऱ्या चवीची बरोबरी करू शकत नाहीत.

आईने किंवा मावशीने दोन पांढऱ्या लांब सुया घेऊन लोकरचे उंडे विणत तयार केलेल्या स्वेटर मफलर ह्यापेक्षा नेपाळी लोकांनी आणलेले जर्किन आकर्षक आणि जास्त उबदार असले तरी आई आणि मावशीच्या किंवा आत्याच्या हातातली उब त्यात शोधूनही सापडत नाही.

हेमंत ऋतूच्या काळात शाळांच्या निघणाऱ्या सहली अजूनही निघत असल्या तरी सहलीला जाणाऱ्या मुलांना अंताक्षरी किंवा भेंड्या किंवा कोडे घालत प्रवास केल्यापेक्षा मोबाईलवर स्क्रोलिंग करत प्रवास करणे सोयीचे वाटावे इतकी यांत्रिकता आजच्या काळात आली आहे. ऋतूतील निसर्ग कायम आहे, झाडांचे आणि प्राण्यांचे वर्तन कायम आहे, थंडी कायम आहे, गारवा कायम आहे, धुक्याच्या चादरीत किंचित प्रमाणात रासायनिक बाष्प वाढलेही असेल कदाचित, पण धुक्याची वृत्तीही कायमच आहे.

मग बदलले ते काय? फक्त मानवी वर्तन होय ना? कदाचित म्हणूनच हेमंतातली थंडी अजूनही हवीहवीशी वाटणाऱ्या माणसाला ऋतूबदलापेक्षाही बदलत जाणारी मानवी वृत्ती जास्त बोचरी वाटत असावी. बाकी हेमंत आपल्या अंतरंगात आपला गारवा अजूनही जपून आहे हे हिवाळ्यात घराबाहेर पडलं की जाणवतच. नाही का?

पान १ वरून

## विकासनीतीचा विजय

पक्षाची विनंती त्यांनी आढ्यतापूर्वक फेटाळली. पण, ओवेसी यांच्या पक्षाने एकांडी निवडणूक लढवून तब्बल पाच जागी विजय मिळवून या महागठबंधनाच्या कानशिलावर जाळ काढला आहे. राजद या पक्षाचे प्रमुख तेजस्वी यादव यांनी स्वत:ला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार म्हणून घोषित करवून घेतले होते आणि आपण दि. १८ नोव्हेंबर रोजी शपथ घेऊ, अशीही वल्गना केली होती. शपथ सोडाच, तेजस्वी निवडून तरी येतील का, अशी परिस्थिती मतमोजणीदरम्यान निर्माण झाली होती. या आघाडीचे उपमुख्यमंत्री म्हणून जाहीर करण्यात आलेल्या सैनी यांच्या व्हीआयपी पक्षाला एकाही जागेवर विजय मिळविता आलेला नाही. अशी या महागठबंधनाची दारुण अवस्था झाली आहे. या निवडणुकीत सर्वांत लाजिरवाणा पराभव हा अर्थातच काँग्रेसच्या वाट्याला आला. बिहारमधील मोठा पक्ष मानला जाणार्या राजदकडे काँग्रेसने ७०-८० जागांचा हट्ट केला आणि पहिल्या टप्प्यातील मतदानाच्या दिवसापर्यंत या दोन पक्षांतील जागावाटप संपले नव्हते. शेवटी काँग्रेसने ६० जागा लढविल्या. पण, मतमोजणीच्या दिवसअखेर या पक्षाला कसाबसा सहा जागांवर विजय मिळविता आला आहे. तामिळनाडू, उत्तर प्रदेश, बिहार, प. बंगाल या राज्यांमध्ये काँग्रेस पक्षाची संघटनाच शिल्लक राहिलेली नाही. या राज्यांतील जे प्रमुख पक्ष आहेत (द्रमुक, राजद, समाजवादी पार्टी वगैरे) त्यांच्याशी युती करून त्या पक्षांच्या पाठीराख्यांच्या मतांवरच काँग्रेसचे उमेदवार निवडून येत असतात. तरीही बिहारमध्ये काँग्रेसला ६० जागाही कमी वाटत होत्या, हा विनोदच म्हणावा लागेल.

काँग्रेसने आपल्याबरोबरच आपल्या सहकारी पक्षांचीही केविलवाणी अवस्था करून टाकली आहे. काँग्रेस हा मते मिळवून देणारा पक्ष राहिलेला नाही, हे वास्तव समाजवादी पार्टी, राजद वगैरे पक्ष कधी स्वीकारणार आहेत? या पक्षाचे जोखड फेकून दिल्यास त्यांच्या पक्षाची अवस्था जरा तरी सुधारेल. आता या निकालाचा परिणाम आगामी प. बंगाल आणि उत्तर प्रदेशातील विधानसभा निवडणुकांवरही होणार आहे. आगामी उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला बरोबर घ्यायचे की नाही, याचा कठोर निर्णय समाजवादी पक्षाला करावा लागेल, हे निश्चित!

### पंतप्रधान मोदींची आता या राज्यांवर नजर

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिहारमधील विजयानंतर कार्यकर्ते आणि जनतेला संबोधित करताना म्हटले की, 'आजच्या विजयाने भाजप कार्यकर्त्यांना केरळ, तामिळनाडू, पाँडेचरी आणि पश्चिम बंगाल ओरिसात ही नव्या ऊर्जेने भारावून टाकलं आहे. गंगाही इथूनच जाते आणि बंगालला जाते. बिहारने बंगालमध्ये भाजपच्या विजयाचा मार्ग मोकळा केला आहे. मी बंगालच्या नागरिकांनाही सांगतो आता भाजप तुमच्या सोबत मिळून पश्चिम बंगालमधूनही जंगलराज उखडून फेकेल.' याचाच अर्थ नरेंद्र मोदी यांचे पुढील लक्ष्य हे या राज्यांमध्ये सत्ता मिळवणे हे आहे.

### किती राज्यांमध्ये भाजपची सत्ता?

बिहार विधानसभा निवडणुकीत भाजप्रणित एनडीए आघाडीने शानदार विजय मिळवला आहे. या निवडणूकीत भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. तर नितीश कुमार यांच्या जेडीयू पक्ष दुसर्या क्रमांकावर आहे. या निवडणुकीत काँग्रेससह इतर पक्षांना मोठा फटका बसला आहे. बिहार निवडणूकीतील विजयासह भाजपचा भगवा आता देशातील प्रमुख राज्यांमध्ये फडकताना दिसत आहे. बिहार निवडणुकीतील यशानंतर भाजप आणि एनडीए आता १८ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये सत्तेत आहे. यात उत्तर प्रदेश, उत्तराखंड, बिहार, हरियाणा, दिल्ली, राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र, गुजरात, गोवा, ओडिशा, आंध्र प्रदेश आणि ईशान्येकडील आसाम, अरुणाचल प्रदेश, नागालँड, त्रिपुरा आणि मेघालय या राज्यांमध्ये भाजप आणि एनडीएची सत्ता आहे. यातून हे स्पष्ट होते की देशातील महत्त्वाची राज्ये ही भाजपच्या ताब्यात आहेत.

## अमेरिकी 'शटडाऊन'चा जगाला धडा

त्याशिवाय, अमेरिकेत शासकीय प्रकल्प थांबले की, खासगी कंपन्या आऊटसोर्सिंगवर भर देतात. भारतीय आयटी कंपन्यांना याचा मोठा लाभ मिळू शकतो. जागतिक गुंतवणूकदार सुरक्षित आणि स्थिर बाजारपेठेच्या शोधात असतात. अशा वेळी, उच्च वाढ, डिजिटल अर्थव्यवस्था, बँकिंग स्थिरता, उत्पादनवाढ ही भारताची जमेची बाजू ठरत आहे. सिनेटने मंजूर केलेले तात्पुरते विधेयक हा केवळ तात्पुरता दिलासा आहे.

अमेरिकेतील ध्रुवीकरण इतके टोकाचे आहे की पुढील काही महिन्यांत पुन्हा अशाच परिस्थिती निर्माण होऊ शकते. राजकीय अस्थिरता ही अमेरिकी अर्थव्यवस्थेची सर्वांत चिंतेची बाब होत चालली आहे. 'शटडाऊन'मधून ती किती सावरते, हे काँग्रेसमधील सहकार्यावर अवलंबून आहे. अमेरिका जगातील सर्वांत मोठी अर्थव्यवस्था असली, तरी तीही राजकीय अराजकतेमुळे ठप्प होऊ शकते, हे या ४० दिवसांत दिसून आले आहे. स्थिर लोकशाही, सुसंगत धोरणे आणि सततचा सार्वजनिक खर्च यांची गरज यातून अधोरेखित झाली आहे. भारताने गेल्या काही वर्षांत हे सिद्ध केले आहे की संकटांमध्येही विकासाची गती कायम ठेवता येते. अमेरिकेतील 'शटडाऊन'ने भारतासाठी एक मोलाचा धडा दिला आहे. ज्या देशाची अर्थव्यवस्था स्वावलंबी, बहुविध आणि मजबूत असते, ती जागतिक अस्थिरतेतही स्थिर राहते, हेच यातून स्पष्ट झाले आहे. भारतीय अर्थव्यवस्थेची हीच खरी ताकद असून, 'शटडाऊन'ने जगभरात ताणतणाव निर्माण होत असताना, जग आता भारताकडे नव्या आशेने पाहात आहे, हे पुन्हा एकदा दिसून आले.

## समाजवादी की दहशतवादी?

मुस्लीम वाटत नाही, यापेक्षा हास्यास्पद ते दुसरे काय? पण, आपल्या धर्मबंधूंची पाठराखण करुनच हे मंत्रिमहोदय शांत बसले नाहीत, तर त्यांनी या स्फोटाच्या 'टायमिंग'वरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

दिल्लीतील बॉम्बस्फोट बिहार निवडणुकीच्या दुसर्या टप्प्यातील मतदानाच्या पूर्वसंध्येलाच कसा झाला, असे म्हणत या मंत्रिमहोदयांनी घटनेलाही राजकीय रंग दिला. पण, या बॉम्बस्फोटापूवची तपास यंत्रणांची ठिकठिकाणची अटकसत्रे आणि फरिदाबादमध्ये जप्त केलेली २९०० किलोंची स्फोटके, यांचा खान महाशयांना सपशेल विसर पडलेला दिसतो.

तसे होणे म्हणा स्वाभाविकच. देशप्रेमापेक्षा धर्मवेडेपणाची पट्टी डोळ्यांवर बांधलेली असेल, तिथे ढळढळीत सत्य दिसत असूनही नसल्यासारखेच! पण, यानिमित्ताने पुन्हा एकदा 'काँग्रेसचा हात दहशतवाद्यांच्या समर्थनात' हेच सिद्ध झाले!

**दिल्लीच्या तीन बाजूने हरियाणा आहे आणि चौथ्या बाजूने उत्तर प्रदेश. आज या तिन्ही राज्यांत भाजप सरकार सत्तेवर आहे. दिल्लीत बसलेले केंद्र सरकार पण भाजपचे आहे. म्हणूनच, दिल्ली व एनसीआर (नॅशनल कॅपिटल रिजन) आज सुरक्षित आहे!!**

वेध

वेद कुमार

केंद्रीय गृहमंत्रालयाच्या इंटेल इनपुटच्या आधारे आणि चार वेगवेगळ्या पोलीसदलांच्या समन्वयाने एक मोठी कारवाई झाली आहे. श्रीनगर शहरात जैश-ए- मोहम्मद या दहशतवादी संघटनेच्या प्रचारासाठी भिंतींवर चिकटवलेल्या काही पोस्टर्सच्या तपासातून एक भयंकर मोठे षडयंत्र उघड झाले आणि या चार राज्यांच्या पोलिसांनी ते उध्वस्त केले. या पोस्टर्सवरून श्रीनगर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे एक काश्मिरी डॉ. अदिल अहमद राथरला उत्तर प्रदेश पोलिसांच्या सहकार्याने सहारनपूर येथे अटक केली. राथरने श्रीनगरच्या विविध भागांत हे पोस्टर्स चिकटवल्याचे उघड झाले होते. अटकेनंतर राथरच्या अनंतनाग येथील सरकारी वैद्यकीय महाविद्यालयातील लॉकरमधून एके-४७ रायफल आणि त्यासोबतची गोळाबारूद जप्त करण्यात आले.

## भयंकर षडयंत्राचा पर्दाफाश

ऑपरेशन सिंदूरनंतर जैशने उच्चशिक्षित मुसलमानांच्या माध्यमातून भारतावर कुरघोडी करायची योजना बनवली होती, त्या योजनेचा हा डॉक्टर एक भाग होता. तपासादरम्यान राथरच्या चौकशीतून आणखी एक धक्कादायक माहिती समोर आली, ज्यामुळे जम्मू-काश्मीर पोलिसांनी हरियाणा पोलिसांसोबत एक वेगळी संयुक्त कारवाई करत फरीदाबाद येथे छापा टाकला. या छाप्यानंतर जैशचे षडयंत्र किती मोठे होते याची खरी कल्पना येऊ लागली आहे. या छाप्यात तब्बल ३०० किलो आरडीएक्स, आणखी एक एके-४७ रायफल आणि भरपूर गोळाबारूद जप्त करण्यात आले. ही स्फोटके आणि शस्त्रे दुसऱ्या डॉक्टर मुजाहिल शकीलने लपवली होती. फरीदाबाद हे दिल्लीला लागून असल्याने ही स्फोटके राष्ट्रीय राजधानी परिसरात दहशत माजवण्यासाठी होती हे वेगळं सांगायची गरज नाही. या कारवाईमुळे दहशतवाद्यांच्या दिल्ली परिसरातील हल्ल्याच्या योजनांना मोठा धक्का बसला असून, स्फोटकांची वाहतूक कशी आणि कोणत्या मार्गाने झाली याचा सखोल तपास सुरू आहे.

_ साधारण ३०० किलो आरडीएक्स स्फोटकाची विध्वंसक क्षमता अत्यंत भयावह असते, कारण ते मिलिटरी-ग्रेड टीएनटीच्या तुलनेत १.६ पट असते! यामुळे उघड्या जागेत १०० मीटर बाय १०० मीटर क्षेत्रात तर अतिशय गंभीर नुकसान होऊ शकते, ज्यात इमारती कोसळणे, काचेचे तुकडे उडणे आणि ब्लास्ट वेव्हमुळे या भागातील लोकांची फुप्फुसांसारखी अवयव फाटणे अशा भयंकर घटना घडतात, तर शेकडो मीटरपर्यंतच्या परिसरात लोक जखमी होण्याची शक्यता असते. गजबजलेल्या वस्तीत किंवा एखाद्या प्रार्थनास्थळी, सणवाराच्या गर्दीच्या वेळी हे स्फोट झाल्यास परिस्थिती कित्येक पट भयानक होऊ शकते, कारण शहरी वातावरणात इमारतींमुळे ब्लास्ट वेव्ह रिफ्लेक्ट होऊन दबाव ३०-३५% ने वाढतो, चॅनेलिंग इफेक्टमुळे गर्दीच्या रस्त्यांवर दबाव दीर्घकाळ टिकतो, ज्यामुळे हजारो लोकांचा तात्काळ मृत्यू, त्याहून जास्त जखमी होणे, इमारती कोसळून दबून मृत्यू होऊ शकतो. अशा स्थितीत बचावकार्यही आव्हानात्मक ठरते, एकूण जीवितहानी मोठी होते आणि आर्थिक नुकसान अब्जावधींमध्ये जाऊ शकते. अशा धोक्यापासून देशाला वाचवण्यासाठी जम्मू- काश्मीर पोलिस, हरियाणा पोलिस, दिल्ली पोलिस, उत्तर प्रदेश पोलिस आणि विविध गुप्तचर यंत्रणांचे भरभरून कौतुक केलेच पाहिजे. त्यांची सतर्कता, समन्वयित कारवाई आणि तत्परतेमुळेच एक खूप मोठा कट उध्वस्त केला गेलाय. या यशस्वी मोहिमेसाठी भारतमातेच्या खाकी वर्दीतील निष्ठावान सेवकांसाठी एक लव रिऍक्ट तर बनतोच!





# देहीचा विटाळ देहीच जन्मला, सोवळा तो जाला कवण धर्म

संत
प्रकाश एदलाबादकर

शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी लिहिलेले शिवचरित्र वाचले नाही, अशी व्यक्ती या महाराष्ट्रात तरी सापडणे कठीण! शिवशाहिरांनी या चरित्रगायनाच्या प्रारंभी एक बाब प्रकर्षाने नोंदविली आहे. त्यांचे ते प्रेरक शब्द आज आत्ता-जसेच्या तसे आठवत नाहीत. परंतु त्यातील मथितार्थ प्रत्येकाने समजून घ्यावा. शिवशाहीर लिहितात, 'दाट अगदी घनदाट अरण्य होते ते. दंडकारण्य. दिवसाही अंधार. महाभयंकर. भयप्रद. अगदी निर्मनुष्य. किर्रर हिरवी झाडांची दाटी आणि रानवेलींची दाटी. हिंस्र पशूंचा वावर. राक्षसी रानवेली आपल्या जटा पसरून हेलकावतात आहेत...' असे भयप्रद वर्णन करून बाबासाहेब पुढे लिहितात,... आणि एके दिवशी नवल घडले.

दंडकारण्यातील पाचोळा मानवी पावलांखाली चुरला गेला. अयोध्येचे राज्य सोडून प्रभू राम वनवासाला निघाले होते. प्रभू दंडकारण्यात आले. निर्मनुष्य अशा या प्रदेशात प्रथमच सहा मानवी पाऊले पडली. त्यातील दोन पावले होती प्रभू श्रीरामचंद्रांची, दोन पावले होती भगवती सीतामाईची आणि दोन पावले होती बंधुवर लक्ष्मणाची. प्रभू रामचंद्रांच्या दोन पावलांच्या रूपाने या मातीत संस्कृती अवतरली. भगवती सीतामाईच्या दोन पावलांच्या रूपाने या मातीत वात्सल्य अवतरले आणि लक्ष्मणाच्या दोन पावलांच्या रूपाने या मातीत बंधुभाव अवतरला. दंडकारण्यात मानवता अवतरली. आज मनात प्रश्न असा निर्माण होतो की, ती संस्कृती, ते वात्सल्य आणि तो बंधुभाव महाराष्ट्राच्या मातीत कितीसा शिल्लक आहे? त्रेतायुगानंतरच्या काळात महाराष्ट्राच्या मातीत हे तीनही गुण रुजविण्याची, संवर्धित करण्याची आणि लोकांच्या मनीमानसी रुजविण्याची पराकाष्ठा जर कुणी केली असेल, तर ती निःसंशयपणे संतांनी आणि सत्पुरुषांनी! केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण भारतवर्षात या गुणांचा परिपोष जर कुणी केला असेल तर तो अशाच संत-माहात्म्यांनी. यासाठी त्यांनी अतोनात परिश्रम केले. आपली लेखणी, वाणी आणि करणी त्यासाठी झिजविली. अठरापगड जातीतील हा समाज एकरस आणि समरस झाला पाहिजे यासाठी अतोनात परिश्रम केले. जातिविहीन समाज निर्माण करण्याचे स्वप्न त्यांनी उराशी बाळगले. भागवत धर्माचा पाया या विचारातूनच घातला गेला. या धर्माच्या ध्वजाखाली तत्कालीन महाराष्ट्रातील सर्व जातिपंथातील लोक एकत्र आले.

११ व्या- १२ व्या शतकातील संतांनी केलेली ही क्रांतीच म्हटली पाहिजे. या क्रांतीचे बीज ज्ञानदेवांनी रोवले. ब्राह्मण कुळात जन्माला येऊनदेखील या चारही भावंडांना समाजाने वाळीत टाकले होते. शोषणाचे आणि वंचिततेचे दुःख काय असते, याचा प्रत्यक्ष अनुभव या चारही भावंडांनी घेतला होता. आपल्या समोर असलेल्या अज्ञ आणि प्रापंचिक दुःखाने गांजलेल्या समाजाला ज्ञानदेवांनी, ज्ञानेश्वरीच्या रूपाने आध्यात्मिक आधार दिला. कुणा एका विशिष्ट समाजाची मक्तेदारी असलेले ज्ञानाचे भांडार त्यांनी समाजासाठी खुले केले. ही क्रांतीच होती. या दृष्टीने ज्ञानदेव हे आध्यात्मिक लोकशाहीचे प्रणेते ठरतात. त्यांच्या पासून प्रेरणा घेऊन बहुजन समाज आणि दलित-वंचित समाज यातही संतसत्पुरुषांची मालिका निर्माण झाली. त्यांनीही भगवद्गीतेचे आकाश विस्तारित केले. तत्कालीन लोकजीवनात चातुर्वर्ण्य आणि जातिपातीची बंधने अत्यंत तीव्रतेने पाळली जात. ती तोडून टाकण्याचा निकराचा प्रयत्न या संतांनी केला. आज मात्र याच्या अगदी उलट चित्र समाजात दिसते आहे. आपल्याला लाज वाटावी अशी बाब म्हणजे, ज्या संतांनी समाजातील जातिभेद उखडून फेकण्याचा प्रयत्न केला, त्याच संतांची आपण जाती-जातीत वाटणी केली आहे. हा संत अमक्या जातीचा, तो संत तमक्या जातीचा असा प्रचार सुरू आहे. संतांनी निर्माण केलेल्या सामाजिक समरसतेलाच सुरुंग लावण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या ठिकाणी आठवण येते ती संत चोखामेळा यांची. तत्कालीन अस्पृश्य समाजात जन्म झालेल्या चोखामेळा यांनी विठ्ठलाची भक्ती समर्पण भावनेने केली. माणूस वरच्या रुपाला भुलून जातो, ही व्यथा सांगताना चोखामेळा म्हणतात...

**'ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा। काय भुललासी वरलिया रंगा।।**
**कमान डोंगी परी तीर नव्हे डोंगा। काय भुललासी वरलीया रंगा।।**

वरील शब्दांमध्ये चोखोबांनी संपूर्ण अध्यात्म आणि तत्त्वज्ञान मांडलेले आहे. आपण अस्पृश्य म्हणून जन्माला आलो, याची खंत त्यांच्या मनात काही ठिकाणी दिसून येते. आपला समाज जातिपातींमध्ये विभागाला गेला आहे, याची चोखोबा आणि सोयराबाई या दोघांनाही जाणीव होती. सोयराबाईंच्या अभंगात मात्र अस्पृश्य म्हणून जन्माला आलो, याची खंत नाही. देह जरी अशुद्ध असला, तरी आत्मा नेहमीच शुद्ध असतो, यावर सोयराबाईंचा विश्वास आहे. त्या म्हणतात...

**'देहीचा विटाळ देहीच जन्मला। सोवळा तो जाला कवण धर्म।**
**विटाळा वाचोनि उत्पत्तीचे स्थान। कोण देह निर्माण नाही जगी।**
**म्हणून पांडुरंग वानीतसे थोरी। विटाळ देहांतरी वसतसे ।**
**देहाचा विटाळ देहीच निर्धारी। म्हणतसे महारी चोखियाची।'**

कोणत्याही समाजाचे प्रबोधन मूलतः सांस्कृतिक असते. याच प्रबोधनातून मांडलेली नवीन मूल्ये समाजाने स्वीकारावी अशी अपेक्षा असते. इतिहास पाहू जाता, असे दिसते की, समाजव्यवस्थेमधील जातिभेद आणि जन्मनिष्ठ उच्चनीचपणा या गर्तेतून समाजाला बाहेर काढण्यासाठी संतांना बरेच प्रयत्न करावे लागले. जगण्यासाठीची उच्च जीवनमूल्ये आणि प्रत्यक्ष व्यवहार कधीच एकत्र येऊ शकले नाहीत. हा समाज कित्येक शतके एकत्र नांदला हे जरी खरे असले, तरी तो समरस झाला नाही. आजही या घडीला जातिपातीचे साखळदंड तुटलेले नाहीत; उलट ते दिवसेंदिवस घट्ट होताना दिसत आहेत.

आपण आज भौतिक प्रगतीची परिसीमा गाठली आहे, तरी सामाजिक समरसतेच्या संबंधाने आपण आजही शतकानुशतके मागासलेले आहोत. हिंदू संस्कृतीची पताका परदेशात फडकावून मायदेशी आल्यानंतर स्वामी विवेकानंदांनी अत्यंत मौलिक विचार मांडले. आपल्या धर्मातील जे हीण असेल ते, काढून टाकले पाहिजे आणि कालानुरूप बदल केला पाहिजे, असे त्यांनी ठासून सांगितले होते. ते म्हणाले होते, 'शंकराचार्यांची सूक्ष्म बुद्धी आणि भगवान गौतम बुद्धाची असीम करुणा या दोहोंचा समन्वय आपल्या धर्म व्यवहारात झाला पाहिजे.'

**केवढे मोठे स्वप्न स्वामीजींनी बघितले होते! 'जे जे भेटे भूत। तया मानिजे भगवंत'** असे जे माउलीने सांगितले होते, ते ऐकण्यास सोपे आहे; परंतु आचरणात आणण्यास कठीण आहे. अस्पृश्य मानल्या गेलेल्या समाजापर्यंतही ज्ञानदेवांची करुणा पोहोचली आहे. ज्ञानदेवांनी सांगितलेली परमार्थाच्या क्षेत्रातील भक्ती आपण स्वीकारली, परंतु ऐहिकातील समता- एकरसता- समरसता मात्र आजही स्वीकारलेली नाही. पंढरीच्या वारीत सर्वच जाती- जमातींच्या दिंड्या निघतात. परंतु त्या समरस होतात असे म्हणणे धाडसाचे ठरेल. इथे ज्ञानदेवांचीही पुण्याई कमी पडते. नव्या युगाची विद्या आली. राहणीमान बदलले. विज्ञानाने प्रचंड झेप घेतली. जुनी मूल्ये निकालात निघाली. जगण्याची आधुनिक मूल्ये प्रस्थापित झाली. परंतु जातिपातींमधील भिंती आजही कोसळल्या नाहीत, ही आजच्या अतिआधुनिक समाजाची शोकांतिका आहे. आपल्याच वर्तनातील ही विसंगती आपण पत्करली आणि ती निष्ठेने चालवीत आहोत. असे वागत असताना, ज्या पुण्यवंत सत्पुरुषांच्या पायावर आपण डोके ठेवतो, त्यांच्या कर्तृत्वाला आपल्यामुळे उणेपणा येतो, याचेही भान आपणास राहात नाही.

# हस्त्यायुर्वेद अर्थात हत्तीचा आयुर्वेद

प्रबंधांची बीजे
श्रीरंग हिर्लेकर

'नाणेशासाठी नवीन मस्तक बसवायची वेळ आली तर निवड झाली हत्तीची. वैकुंठाधिपती याच्याच उद्धारासाठी पृथ्वीवर अवतरले. कोणाचीही पर्वा न करता आपल्याच धुंदीत चालणारा प्राणी कोण तर हत्ती; हत्तीप्रमाणे संस्कृत नायिकेचे चालणे म्हणून ती गजगामिनी, माणसाच्या खालोखाल सर्व प्राण्यांत बुद्धिमत्तेत क्रम हत्तीचाच. रणांगणावरची सेना असो की बुद्धिबळाच्या पटावरील प्यादा, उंट, घोडा यापेक्षाही जास्त महत्त्व हत्तीचेच. राजा अथवा विद्वानाच्या मानाच्या मिरवणुकीला सोन्याच्या पालखीपेक्षा हत्तीवरील अंबारीच हवी.



हस्तिदंताच्या तस्करीसाठी वीरप्पनने एकेकाळी सर्व सुरक्षा यंत्रणेला कित्येक वर्षे जेरीस आणले... हत्तीचे असे महत्त्व ओळखून त्याच्या स्वास्थ्याच्या दृष्टीने 'हस्त्यायुर्वेद' नावाचा एक महान ग्रंथ १५०० वर्षांपूर्वी पालकाप्यमुनींनी संस्कृतात रचला. विविध ठिकाणांहून उपलब्ध झालेल्या चार हस्तलिखितांवरून १८९४ मध्ये पं. शिवराम दधीच यांनी त्यातल्या त्यात एक अधिकृत प्रत तयार करून प्रसिद्ध केली. मात्र, अद्यापही काही अध्याय संशोधकांच्या प्रतीक्षेत आहेत. आवश्यकता: आज हत्तीचा वापर कमी असला, तरी या ग्रंथाचे अगत्य आहे. कारण गजवैद्यांसोबत यातील काही विषय पशुवैद्यकात उंट, गाढव, बैल व खेचर यांच्या उपचारांकरिताही मार्गदर्शन करतात. इतकेच नव्हे, तर हत्ती आणि मनुष्याच्या शरीररचनेत भेद असूनही हस्त्यायुर्वेदामागे मानवी आयुर्वेदाचीच तत्त्वे आणि विचारपद्धती आढळतात. वैदिक काळातील अग्निवेश महर्षींच्या आयुर्वेदसंहितेवरच चरकाचार्यांची कायचिकित्सा, सुश्रुताचार्यांनी सांगितलेले धन्वंतरी पद्धतीचे शल्यतंत्र आणि वाग्भटाचार्यांचे अष्टांगहृदय व अष्टांगसंहिता आहेत. म्हणून आयुर्वेद विद्यार्थ्यांना याही ग्रंथाच्या अध्ययनाची आवश्यकता आहे. याशिवाय या विषयावर आपल्या पूर्वजांनी किती सूक्ष्म, सखोल आणि अभ्यासपूर्ण विचार केले आहेत तेही समजते.

**'अंगोहि राजा चंपायां**
**पालकाप्यं स्म पृच्छति ।**
**इत्यब्रवीत् पालकाभ्यो राज्ञाङ्गेन प्रचोदितः ।।'**

**उपनिषदात्मक पद्धत:** अंगदेशराज रोमपादाची गजशाळा समृद्ध असून तिची जबाबदारी पालकाप्यावर होती. चंपानगरीतील राजाचे जिज्ञासायुक्त प्रश्न आणि ज्ञानसमृद्ध पालकाप्याची सविस्तर उत्तरे असे या ग्रंथाचे स्वरूप आहे.

**गजायुर्वेद किंवा हस्त्यायुर्वेद:** उपलब्ध ग्रंथातील उल्लेखान्वये पालकाप्य म्हणजे मतंग ऋषी आणि शापामुळे हत्तीण झालेली ब्रह्मदेवाची कन्या रुचिरा यांचा पुत्र. हा बालपणापासून हत्तींच्या कळपात वावरत असे. ब्रह्मदेवानेच त्याला गजायुर्वेद शिकवला. त्याचीच ही संहिता. पुढे हेच ज्ञान नवीन रचनाकाराने पालकाप्याचे मूळ नाव कृतज्ञतापूर्वक वापरून लिहून काढले. या नवीन ग्रंथावर चरक, सुश्रुत वाग्भट यांच्या मनुष्यायुर्वेदातील त्रिदोष विज्ञान, द्रव्यगुण विज्ञान, पंचभूत विज्ञान, रोगनिदान, शारीर विज्ञान, चिकित्सा पद्धती या सर्वांचा प्रभाव स्पष्टपणे आढळतो. मूळ ग्रंथांचे एक दुर्मिळ ऐतिहासिक हस्तलिखित मी बघितले असून कर्नाटक जिंजीच्या संग्रहालयात पण एक प्रत आहे, असे समजते. तमिळमध्ये लिहिलेले दुसऱ्या विषयावरील असेच एक दुर्मिळ हस्तलिखित ३० वर्षांपूर्वी दोन व्यक्तींनी दाखवायला आणले होते.

**तुलना :** फक्त हत्तीसंबंधित आढळणारे विशेष म्हणजे कानातील कृमीदोष, मृत्तिकास्नान, त्याची मदावस्था, गजसंभव, जलहस्तीलक्षण, गजशांती इ. विषय सोडले तर अनेक ठिकाणी मनुष्यायुर्वेदाच्या अभ्यासाला हा विषय पूरकच आहे. हत्तीच्या दातदुखीवरील उपायाने मनुष्याचीही दातदुखी बरी होते. तो उपाय म्हणजे पितळी समईतील तेल त्याच तेलवातीसह कानात घालणे. त्रिदोष बिघडल्यावर होणारा संन्निपात आणि हत्तीचा पाकल आजार व त्यावरील उपाय सारखेच. मनुष्याला पायाच्या रक्तवाहिन्यातील बिघाडांमुळे होणाऱ्या आजारातील भेद हस्त्यायुर्वेदाच्या अभ्यासाने स्पष्ट होतात. पहिल्या पावसानंतर आसमंत स्वच्छ होते. त्यानंतरच्या पाण्याचा उपयोग दोनही आयुर्वेदात सारखाच सांगितला आहे. दोघांचीही मृत्युसूचक लक्षणे व अंदाजे काळ सारखीच सांगितली आहेत. काही विशिष्ट तिथीवर झालेला स्फोटक म्हणजे फोड दोघांनाही खात्रीने मृत्यू आणतो. दोघांचीही उर:क्षतामुळे होणारी श्रमलक्षणे व उपाय सारखेच, मात्र शरीररचनासापेक्ष भिन्न आहेत. जठराग्नी आणि गोमूत्रोपचार यावरही दोघात भिन्नता आढळते.

राजयक्ष्मा आजार मनुष्याप्रमाणे हत्तीलाही होतो. दोघांचीही कारणे अर्थातच समान आहेत. कोणत्या व्याधीवरील औषधे कोणत्या नक्षत्रावर तयार करावीत, त्यासाठी वनस्पती कधी व कशा तोडाव्यात हे मनुष्यायुर्वेदात सांगितले आहे, तसेच येथेही आहे. उदा. दोघांच्याही ग्रहणी व्याधीवरील औषधे पुष्य अर्थात पोषक नक्षत्रावर तयार करावयाची. वात-पित्त- कफ यांच्यातील असंतुलन जरी आजारांना कारक असले, तरी दोनही आयुर्वेदात वातविकृतीलाच प्राधान्य दिले आहे. दोघांतही एक साम्य आढळते आणि ते म्हणजे औषधी द्रव्यांचे ऋतुपरत्वे प्रमाण, आजाराची तीव्रता, रुग्णाचे वय, सत्त्व, रज, तम प्रकृतीचा व त्याच्या अनुवांशिकतेचा विचार इ. करण्याचे महत्त्व. दोघांचीही अन्नावरची इच्छा जाणे, अग्निमांद्य होणे व त्यावरील उपाय सारखेच सांगितले आहेत. आयुर्वेदात मानवी शरीरावयांची बारीकसारीक माहिती आहे; किंबहुना काही ठिकाणी तर अधिक विस्तृतता हस्त्यायुर्वेदात आढळते. दोघांच्याही आयुर्वेदात शरीरावरील प्राणघातक मर्मस्थानांची यादी दिलेली आहे. मनुष्याच्या मूळव्याधीच्या कोंबावर क्षारसूत्र वापरतात. हत्तीचा किडलेला दात अलगद काढण्यासाठी असाच उपाय सांगितला आहे. मनुष्याप्रमाणे हत्तीची दृष्ट काढणे, निरांजनाने ओवाळणे, मंत्रोपचार हे सर्व उपाय हस्त्यायुर्वेदात पण सांगितले आहेत. हस्त्यायुर्वेदांतील चार प्रमुख विभाग म्हणजे महारोगस्थान, क्षुद्ररोगस्थान, शल्यस्थान व उत्तरस्थान हे आहेत. शिवाय त्यांची उपस्थाने सांगितली आहेत ती निराळीच. ग्रंथातील अध्यायाची संख्या त्यातील व्यापक आणि सखोल माहितीची साक्ष देते. स्थान विभागांची अध्याय संख्या अनुक्रमे १८, ७२, ३४ आणि ३६ अशी आहे. प्रत्येकाची नावे व त्यातील विषय येथे सांगणे अशक्य आहे. हत्तीला होणारे वातरोगांचे ७२ प्रकार, पित्तज २७, कफामुळे ३२, १५ रक्तज, तीनही दोष बिघडून होणारे २२, वात आणि पित्त एकाच वेळेस बिघडल्यास १४, वात कफ बिघाडातून होणारे १६, वातरक्त ७, संकर रोग, आध्यात्मिक रोग, आगंतु रोग, सर्वांची नावे, लक्षणे, उपाय इतकेच नव्हे तर साध्य, कष्टसाध्य आणि असाध्य असे वर्गीकरण वाचायला मिळते. पथ्यापथ्य हे सर्वच हत्तीलाही केल्या जातात. रक्तमोक्षणासाठी मनुष्याप्रमाणेच १२ प्रकारच्या जलौका आणि प्राण्याचे शिंग वापरतात. मनोव्यापार आणि मन:शांतीसाठी मानसोपचार पण सांगितले आहेत. हत्तीची व्यवस्था कशी ठेवावी, त्यांना बघणारे कर्मचारी कसे निवडावेत, किती असावेत, त्यांचे प्रशिक्षण कसे करावे ही माहिती पण उद्बोधक आहे. या ग्रंथातील ज्ञानाचा उपयोग हत्ती पकडणे, त्याचे प्रजनन, त्यांच्या जाती, पाळणे, वाढवणे, शिकवणे, योग्य कामासाठी उपयोग करवून घेणे, त्यांचा आहार, दिनचर्या सांभाळून त्यांना स्वस्थ ठेवणे यासाठी महत्त्वाचा तर आहेच.

**कृतज्ञता :** वरील लेख लिहिताना मला दोन तपांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या मूळ हस्त्यायुर्वेदाच्या प्राचार्य डॉ. अ. पा. देशपांडे आणि आयुर्विद्या पारंगत डॉ. गोगटे यांनी केलेल्या चिकित्सापूर्ण मराठी भाषांतराचा फार उपयोग झाला. त्यांच्या या महत्कार्यात तज्ज्ञ सल्लागार होते माझे वडील आयुर्वेदाचार्य पंडितराव हिर्लेकर.

# वंदन 'वंदे मातरम्'ला

निमीत्त
अजय तिवारी

**जागतिकीकरणाचे ब्रीद सहज साध्य करणाऱ्या भारताला आज अनेक परदेशी शक्ती पाण्यात पाहात आहेत. आपणही आपल्या कपड्यांमध्ये, अन्नामध्ये आणि संस्कृतीमध्ये दोष शोधत इतर संस्कृतींशी निराधार तुलना करतो. अशा वेळी 'वंदे मातरम्'ची संकल्पना प्रासंगिक बनते. ती आपल्याला आपल्या संस्कृतीवर विश्वास ठेवण्यास प्रवृत्त करते. भारताच्या या हे राष्ट्रीय गीत या महिन्यात १५० वा वर्धापन दिन साजरा करीत आहे. त्या निमित्ताने...**



आपण जागतिकीकरणाच्या शिखरावर असलो, तरी अनेक परदेशी शक्ती हे वाढते जागतिक स्थान कमकुवत करण्याचा प्रयत्न करीत आहेत. आपण पाश्चात्यीकरण आणि अमेरिकीकरणाचे अंधानुकरण करीत आहोत. आपण आपल्या कपड्यांमध्ये, अन्नामध्ये आणि संस्कृतीमध्ये दोष शोधू लागलो आहोत आणि इतर संस्कृतींशी निराधार तुलना करीत आहोत. अशा वेळी 'वंदे मातरम्' ही संकल्पना आपल्या समाजासाठी खूप प्रासंगिक बनते. ती आपल्याला या नकारात्मक विचारांपासून मुक्त करू शकते आणि आपल्या संस्कृतीवर विश्वास ठेवण्यास आणि आपल्या उदात्त क्षमता जागृत करण्यास शिकवू शकते. 'जन गण मन' हे आपले राष्ट्रगीत असले, तरी 'वंदेरम्' हे भारताचे राष्ट्रीय गीत आहे. ते नोव्हेंबर १८७६ मध्ये बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी लिहिले. १८८२ मध्ये त्यांनी 'आनंद मठ' या कादंबरीत हे गाणे अंतर्भूत केले. हे गाणे भावानंद नावाच्या एका भिक्षूने गायले. त्यात तपस्वी बंडाचे चित्रण आहे.

या गाण्याला या महिन्यात १५० वा वर्धापन दिन पूर्ण झाले आहेत. जागतिक सर्वेक्षणात 'वंदे मातरम्' हे जगातील सर्वाधिक लोकप्रिय १० गाण्यांमध्ये दुसऱ्या क्रमांकावर होते. 'वंदे मातरम्'ला त्याच्या सांस्कृतिक आणि प्रेरणादायी शक्तीसाठी व्यापक प्रशंसा मिळाली. त्यामुळे ते भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचे आणि राष्ट्रीय भावनेचे प्रतीक बनले. भारतात सध्या मोठ्या आणि शक्तिशाली शैक्षणिक संस्था आहेत. या संस्थांमध्ये प्रशिक्षित झालेले आपले तरुण मोठ्या संख्येने परदेशात सेवा करण्यासाठी जातात. आपल्याला या सर्व तरुणांचा अभिमान आहे. ते जागतिक स्तरावर प्रसिद्ध संस्थांचे नेतृत्व करतात. आपले तरुण परदेशात कुशल डॉक्टर, अभियंते आणि राजकारणी म्हणूनही नाव कमावत आहेत. अशा वेळी 'वंदे मातरम्'मध्ये अपार शक्ती जाणवते. या गाण्यातील भावनेचा सकारात्मक वापर तरुणांमध्ये देशभक्ती जागृत करू शकते. आपण लक्षात ठेवले पाहिजे की, स्वावलंबनाचा मार्ग केवळ त्याग, देशभक्ती आणि समर्पणाद्वारेच साध्य होऊ शकतो.

आपण हे तत्त्व स्वदेशी चळवळ आणि 'व्होकल फॉर लोकल'शीही जोडू शकतो. लक्षात ठेवावे की, इतरांचे अनुकरण करून आपण कधीही स्वावलंबी होऊ शकत नाही. आपण आपली स्वतःची ताकद आणि वेगळेपण ओळखले पाहिजे तरच इतरांवरील अवलंबित्व संपेल आणि आपण स्वतःच्या पायावर उभे राहू शकू. स्वामी विवेकानंद आणि त्यांच्या पाश्चात्त्य शिष्या निवेदिता म्हणाल्या होत्या की, पश्चिमेचे कमकुवत अनुकरण करू नका, तर भारताची खरी प्रतिमा बना.

आपली संस्कृती आपल्या आत्म्यामध्ये आहे, ती पाश्चात्त्य अनुकरणाने बदलता येणार नाही. आपण आपली संस्कृती समजून घेतली पाहिजे आणि आत्मसात केली पाहिजे. तरुणांनी त्यांच्या सर्जनशीलता आणि नवोपक्रमाद्वारे उद्योग, विज्ञान, तंत्रज्ञान आणि शेतीमध्ये नवीन पाया रचला पाहिजे. 'वंदे मातरम्'चा संदेश आत्मनिर्भरतेच्या या भावनेला प्रोत्साहन देतो. 'वंदे मातरम्' हे भारताच्या संस्कृतीचे, एकतेचे आणि परंपरेचे प्रतीक आहे. आपण या गाण्याचा प्रत्येक शब्द काळजीपूर्वक समजून घेतल्यास ते भारतीयत्वाच्या मूळ भावनेचे प्रतिबिंब आहे, हे जाणवते. त्याची पहिली ओळ आहे. 'वंदे मातरम्! सुजलाम् सुफलाम् मलयज शीतलम, शस्य यामलम् मातरम्.' मलयज शीतलम म्हणजे 'चंदनाच्या पर्वतावरून किंवा चंदनाच्या झाडावरून वाहणारा सौम्य, थंड वारा.' अशी भावना फक्त भारतातच कल्पना करता येते. त्यातील प्रत्येक गोष्ट परिचित वाटते.

अलिकडे अशी परिस्थिती निर्माण होत आहे, जिथे काही लोक, राजकीय फायद्यासाठी किंवा स्वतःच्या फायद्यासाठी भारताचे विभाजन करण्याचा प्रयत्न करताना दिसतात; मग ते काश्मीर असो वा पंजाब. आपल्या चालीरीती, विधी, कपडे, भाषा आणि अन्न वेगळे असू शकते; परंतु आपण सर्व भारतमातेची मुले आहोत. आपल्या पूर्वजांनी या भूमीचे रक्षण करण्यासाठी सर्वस्व अर्पण केले. त्यामुळे त्याच्या एकता आणि अखंडतेशी कधीही तडजोड होणार नाही याची खात्री करणे ही आपली जबाबदारी आहे. आपण जगाला 'विविधतेत एकता'चा धडा शिकवला पाहिजे आणि एकत्र पुढे गेले पाहिजे. हे सर्व 'वंदे मातरम्'द्वारे शक्य आहे. या घोषणेमध्ये भारतीयत्वाची अफाट शक्ती आहे. ती सर्वात कठीण हृदयांनाही वितळवू शकते. त्याचप्रमाणे भारतातील तरुण त्याद्वारे आपला सांस्कृतिक अभिमान समजून घेऊ शकतात आणि भारताची विविधता आणि समृद्धता जगासमोर सादर करू शकतात. भारत सध्या हवामान बदल आणि पर्यावरणीय समस्यांना तोंड देत आहे. अशा वेळी 'वंदे मातरम्'ची ही भावना तरुणांना पर्यावरण संरक्षणाला प्राधान्य देण्यास आणि नैसर्गिक संसाधनांच्या विवेकपूर्ण वापरावर लक्ष केंद्रित करण्यास प्रेरित करते. 'वंदे मातरम्'मध्ये मातृभूमीचे वर्णन 'सुजलाम् सुफलाम्' असे केले आहे, जी शुद्ध पाणी आणि शुद्ध फळांनी समृद्ध आहे आणि अशा अनेक ओळी आहेत, ज्या भारतमातेच्या पवित्र भूमीचे वर्णन स्वच्छ, सुंदर आणि शुद्ध असे करतात. निसर्ग आणि पर्यावरणाबद्दल आदराची भावना जागृत होते. 'वंदे मातरम्' म्हणजे मातेला वंदन. या गीताच्या संदेशाने पुरुषांनाच नाही, तर महिलांनाही प्रेरणा दिली.

स्वातंत्र्यलढ्यादरम्यान महिलांनी या गाण्याला आपला आवाज बनवला. सुचेता कृपलानी यांनी १९४७ मध्ये संविधान सभेत 'वंदे मातरम्' गायले. सरोजिनी नायडूंसारख्या महिला क्रांतिकारकांनी त्याचा शस्त्र म्हणून वापर केला. 'वंदे मातरम्' ही मातृशक्तीला श्रद्धांजली आहे, जी आपल्याला प्रत्येक क्षणी आठवण करून देते की, उपासनेच्या शक्तीशिवाय आपण यशस्वी होऊ शकत नाही. महात्मा गांधी म्हणाले होते की, 'वंदे मातरम्' हे भारतातील लोकांच्या भावनांचे प्रतीक आहे. हे गाणे भारताचा आत्मा आणि स्वातंत्र्यासाठीची तळमळ व्यक्त करते. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी लिहिले की, 'वंदे मातरम्' हे केवळ एक गाणे नाही, ते संघर्षासाठीचे आवाहन आहे. ते आपल्याला कर्तव्य आणि बलिदानाची आठवण करून देते. लोकमान्य टिळकांना 'वंदे मातरम्'बद्दल इतका आदर होता की, त्यांनी ते शिवाजी महाराजांच्या समाधिस्थळाच्या कमानीवर कोरले. ते म्हणतात की, 'वंदे मातरम्' हा मंत्र आहे. त्याने लाखो भारतीयांना स्वातंत्र्यलढ्यामध्ये सहभागी होण्यास प्रेरित केले. ते आपल्या राष्ट्रीय अस्मितेचे प्रतीक आहे. लाला लजपत राय आपल्या 'द स्टोरी ऑफ माय एक्झाईल' या पुस्तकात लिहितात, 'जेव्हा जेव्हा मी वंदे मातरम् ऐकतो, तेव्हा माझ्या ठायी मातृभूमीसाठी अपार प्रेम आणि त्यागाची भावना जागृत होते.' स्वातंत्र्यलढ्यादरम्यान 'वंदे मातरम्' हे गाणे आणि त्याचा घोषवाक्य म्हणून झालेला वापर यामुळे शूर स्वातंत्र्य सैनिकांचे रक्त परिसंचरण वाढले. 'वंदे मातरम्'ला घाबरून ब्रिटिशांनीही बंदी घातली. तथापि, इतिहास दाखवून देतो की, जेव्हा जेव्हा कोणत्याही प्रशासनाचा जुलूम वाढतो, तेव्हा काही गाणी आणि घोषणा उदयास येतात. यात सत्तेच्या भिंती हादरवण्याची शक्ती असते. दुसऱ्या शब्दामध्ये सांगायचे, तर 'वंदे मातरम्'मध्ये अन्यायाविरुद्ध न्यायाची तुतारी वाजवण्याची शक्तीदेखील आहे.

आजही गरज पडल्यास त्याचा वापर केला जातो. 'वंदे मातरम्' म्हणजे 'हे मातृभूमी, मी तुझी पूजा करतो, मी तुला वंदन करतो. 'वंदे मातरम्' म्हणजे एक गर्जना आहे; जिने ब्रिटिश राजवटीला झोपेतून हादरवून टाकले. ती फक्त एक घोषणा नव्हती, तर स्वातंत्र्यप्रेमींच्या नसांमधून वाहणारे रक्त होते. त्यांच्या नसांमधून कंप पावणारा मंत्र होता.

आत्म्यांना जोडणारा पूल होता. बंकिमचंद्र चॅटर्जी यांच्या लेखणीतील हे गीत केवळ त्यांच्या कादंबरीचा भाग नव्हते. ते भारताच्या स्वातंत्र्याचे स्तोत्र बनले. आजही स्वातंत्र्याचे मूल्य स्पष्ट करण्यासाठी, हुतात्म्यांचे स्मरण करण्यासाठी आणि या हिरव्यागार भूमीला नमन करण्यासाठी सर्वात योग्य असे कोणते गाणे असेल, तर ते म्हणजे 'वंदे मातरम्!'

# ग्रहसंकेत

## (रविवार, १६ नोव्हेंबर ते शनिवार, २२ नोव्हेंबर २०२५

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर

ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, १६ नोव्हेंबर-** देवी माऊली जत्रोत्सव शिरोडा (जि. सिंधुदुर्ग), तिर्थवासर ९:१० पर्यंत, रवि वृश्चिकेत ✻ **सोमवार, १७ नोव्हेंबर-** संत श्री ज्ञानेश्वर माऊली संजीवन समाधी सोहळा आळंदी, सोम प्रदोष, सीताराम महाराज पुण्यतिथी मंगळवेढा, दास गणू महाराज पुण्यतिथी पंढरपूर, कार्तिक काला यात्रा आपेगाव (ता. पैठण), जागतिक विद्यार्थी दिन ✻ **मंगळवार, १८ नोव्हेंबर-** शिवरात्री✻ **बुधवार, १९ नोव्हेंबर-** दर्श अमावस्या, राणी लक्ष्मीबाई जयंती झांशी, इंदिरा गांधी जयंती, दानम्मादेवी यात्रा गुड्डापूर (ता. जत), ज्येष्ठ नागरिक दिन ✻ **गुरुवार, २० नोव्हेंबर-** अन्वाधान, वेताळदेव यात्रा इचलकरंजी व कोल्हापूर, सिध्दनाथ यात्रा पानीव (ता. माळशिरस), कात्यायनी देवी महाप्रसाद कोल्हापूर, श्री देव लिंग खळनाथ वार्षिकोत्सव करंजे (कणकवली) ✻ **शुक्रवार, २१ नोव्हेंबर-** देवदीपावली, मार्तंडभैरव षड्रोत्सवारंभ, श्रीविष्णुपद उत्सव प्रारंभ, मार्गशीर्ष मासारंभ, शावरसिध्द व सिलिसिध्ददेव यात्रा आचेगाव (ता.द. सोलापूर), रामरथ यात्रा फलटण, वीरभद्र जयंती नाझरे (ता. सांगोला) ✻ **शनिवार, २२ नोव्हेंबर-** धनुरयन सकाळी ७.०५, भारतीय अग्रहायण, गुरुभंडारा धारेश्वर (ता.पाटण), चंद्रदर्शन (१९/३२ पर्यंत)

**मुहूर्तः-✻ साखरपुडा-** १६ नोव्हेंबर ✻ **डोहाळ जेवण-** २१ नोव्हेंबर (१४ पर्यंत) ✻ **बारसे-** १६ नोव्हेंबर ✻ **जावळ-** १६ नोव्हेंबर ✻ **गृहप्रवेश-** १६नोव्हेंबर, २१ नोव्हेंबर (१४ पर्यंत)

### मेष :- सौख्याच्या घटना

गुरुवारी अष्टमात रवि- बुधाची युती होत आहे. जुने येणे वसूल करू घ्या. स्थावर प्रश्न मार्गी लागतील. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. खर्च वाढले तरी प्राप्तीही तशीच चांगली होत जाईल. नव्या संधी लाभतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. पुरुषांनी शनिवारी पिंपळ पूजन संध्याकाळी करावे. मुंजाचा दोष दूर करावा. शुभ ता. २१

### वृषभ:- चिंता दूर होईल

गुरुवारी सप्तमात रवि- बुधाची युती होत आहे. एखादे महत्त्वाचे काम ओळखीतून यशस्वी होईल. चिकाटीने केलेली वाटचाल मनासारखी फळे देणारी ठरेल. नव्या कामांना गती मिळेल. नव्या विचारांना चालना मिळेल. गृहनिर्माण, कारखानदारी, विधी अशा क्षेत्रात अपेक्षित प्रगती होईल. दैनंदिन कामात अधिक लक्ष घालावे. चिंता दूर होईल. शुभ ता. १६, २१

### मिथुन:- अपेक्षित प्रगती

राशी स्वामी बुधाची षष्ठात होणारी रविशी युती लाभदायक ठरणार आहे. ज्या घटना घडाव्यात असे वाटते, त्या घटना आता मनासारख्या घडतील. पैशा अभावी रेंगाळलेली कामे आता मार्गी लागतील. अडचणीतून मार्ग निघाल्याने समाधान वाटेल. बँक, विमा, ज्ञानदान अशा क्षेत्रात अपेक्षित प्रगती साधता येईल. शुभ ता. १६, २२

### कर्क:- आनंददायी घटना

पंचमात होणारी रवि- बुधाची युती शिक्षण क्षेत्रात अपेक्षित फलप्राप्ती करून देणारी ठरेल. स्थावर, वाहन सौख्य लाभेल. गुरुकृपेने आपल्या व्यक्तिमत्त्वा भोवती नवे वलय निर्माण होईल. आनंददायी घटना घडतील. नव्या संधीचे स्वागत करावे. यांत्रिक, प्रशासन सेवेत अनुकूलता राहील. जनसंपर्क कार्यामध्येही कार्यसिद्धी होणार आहे. शुभ ता. २१, २२

### सिंह:- वात विकारापासून त्रास

सुखस्थानी होणारी रवि- बुधाची युती सौख्यदायी ठरेल. वैद्यकीय, प्रशासन सेवेत मनासारख्या घटना घडतील. उपजत कलागुणांचा विकास होत जाईल. अडचणीतून मार्ग निघाल्याने समाधान वाटेल. कौटुंबिक जीवनात विलंबाने पण चांगल्या घटना घडतील. वात- विकारापासून त्रास होण्याची शक्यता आहे, काळजी घ्यावी. शुभ ता. २१

### कन्या:- नव्या कामांना यश

पराक्रम स्थानी होणारी रवि- बुधाची युती कार्यक्षेत्रात अपेक्षित प्रगती करणारी आहे. नव्या कामाला गती मिळेल. गायन वादनादि कलेतून अर्थाजन घडेल. संतती बाबतची एखादी चिंता दूर होईल. उत्साहवर्धक घटना घडतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. नव्या कामांना यश मिळेल. शुभ ता. १६, २२

### तुला:- आव्हाने स्वीकारून शकाल

धनस्थानी होणारी रवि- बुधाची युती सरकारी येणे वसूल करून देणारी ठरेल. राशी स्वामी शुक्र राशीत आहे. त्यामुळे सौख्य समाधान वाटेल. कर्मस्थ गुरुमुळे क्षेत्रात नवी आव्हाने स्वीकारू शकाल. नव्या विचारांना चालना मिळेल. अपेक्षित संधी लाभतील. स्पर्धांमध्ये यश मिळवता येईल. सुखाच्या घटना घडतील. शुभ ता. २२

### वृश्चिक:- भाग्योदयकारक घटना

गुरुवारी राशीतच रवि- बुधाची युती होत आहे. अंगीकृत कार्यात समाधानकारक प्रगती साधता येईल. उत्सावर्धक घटना घडतील. भाग्योदयकारक घटना घडतील. नव्या विचारांना चालना मिळेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. स्वमताग्रह टाळावा. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नका. शुभ ता. २१

### धनु:- मित्र पारखून घ्यावेत

व्ययात रवि- मंगळ, बुध समवेत आहे. कार्यक्षेत्र विविध आव्हानांना सामोरे जावे लागेल. छोटी साडेसाती चालू असल्याने विचाराने रह-ावे. राजकारणापासून दूर रहावे. नुकसान संभवते. मित्र पारखून घ्यावेत. अडचणीत येण्याची शक्यता आहे. लाभातील शुक्रामुळे आर्थिक बाबतीत समाधान वाटेल. डोळ्यांच्या तक्रारीची वेळीच दखल घ्यावी. शुभ ता. २२

### मकर:- चिंता कमी होईल

लाभस्थानी गुरुवारी रवि- बुधाची युती होत आहे. आर्थिक कामे मनासारखी झाल्याने व्यवसायातील चिंता कमी होईल. गृहसजावट, खाद्य पदार्थ अशा व्यवसायात प्रगतीच्या घटना घडतील. नव्या संधीचे स्वागत करावे. अडचणीतून मार्ग निघेल. चिंता नको. विवाह विषयक कार्य यशस्वी होतील. अनुकूलता वाढेल. शुभ ता. १६

### कुंभ:- कार्यक्षेत्रात प्रगती


कर्मस्थानी होणारी रवि- बुधाची युती कार्यक्षेत्रात प्रगती करणारी आहे. कार्यसिद्धीसाठी अधिक परिश्रमाची गरज आहे. गृहनिर्माण, विधी अशा क्षेत्रात अपेक्षित प्रगती होईल. गुंतवणूक विचाराने करावी. भाग्यवृध्दिंगत करणार्या घटना घडतील. नव्या विचारांना चालना मिळेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. शुभ ता. २१

### मीन:- आर्थिक स्थितीत सुधारणा

भाग्यस्थानी रवि- बुधाची होणारी युती लाभदायक ठरेल. रेंगाळलेली कामे होतील. आर्थिक स्थितीत सुधारणा होणार असल्याने समाधान लाभेल. प्रगतीचा नवा टप्पा गाठू शकाल. स्पर्धांमध्ये यश मिळेल. जुने येणे वसूल होईल. फार चिंता करू नका. सर्वकाही मनासारखे घडत जाईल. गुंतवणूक विचाराने करावी. शुभ ता. २२

!! शुभ भवतु !!

# अंकाई-टंकाई



दुर्ग जिज्ञासा
प्राची पालकर

नाशिकजवळील मनमाड परिसरात सलग डोंगररांग नसली, तरी मनमाडच्या दक्षिणेकडील डोंगरावर वसलेले अंकाई- टंकाई किल्ले, गिर्यारोहकांचे आवडते गिरीदुर्ग आहेत. सातमाळ डोंगररांगेत वसलेल्या अंकाई- टंकाई या जोडकिल्ल्यांपैकी अंकाई हा नाशिक खानदेश परिसरातील अत्यंत मजबूत असा किल्ला आहे. हे दोन्ही किल्ले दोन स्वतंत्र डोंगरावर बांधलेले असून एका चिंचोळ्या खिंडीने एकमेकांशी जोडले आहेत.

अंकाई गावातून दोन्ही किल्ले दृष्टीस पडतात, त्यातील डाव्या बाजूचा उंच अंकाई किल्ला आणि उजव्या बाजूचा सपाट माथा असलेला टंकाई किल्ला होय. अंकाई किल्ल्याची उंची ३१५० फूट तर टंकाई किल्ल्याची उंची २८०० फूट आहे. किल्ल्यावर जाण्यासाठी आपण मनमाडवरून शिर्डीकडे जाणाऱ्या रस्त्यावर अंकाई स्टेशनपर्यंत पोहोचावे. अंकाई स्टेशन हे मनमाड- दौंड लोहमार्गावरील स्टेशन आहे. येथून किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या अंकाई गावाकडे जाताना वाटेत एक मठ आहे. तेथून अवघ्या १० मिनिटात आपण गावात पोहोचतो. गावातून किल्ल्यांच्या दिशेने निघाल्यावर आपण प्रथम दोन्ही किल्ल्याच्या मधील खिंड गाठावी. या खिंडीतून दोन्ही किल्ल्यावर जाण्यासाठी स्वतंत्र रस्ते आहेत. पुरातत्त्व विभागाने येथे पायऱ्या बांधल्या असून थोड्या चढाईनंतर टंकाई किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या लेणी दृष्टीस पडतात. या लेणी टंकाई किल्ल्याच्या पायथ्याशी आहेत, त्यांना 'अंकाई लेणी' असे म्हणतात. येथे १० व्या- १२व्या शतकातील जैन आणि ब्राह्मण लेणी आहेत. किल्ल्याच्या पायथ्याशी एकूण १० लेणी असून काही लेणी दुमजली आहेत. येथे गजारूढ इंद्र आणि इंद्राणी, भगवान पार्श्वनाथ, शांतिनाथ, पद्मासनातील दिगंबर जैन मूर्ती, कमळपुष्प तसेच येथील खांबावर काही शिलालेख कोरलेले आहेत. लेणी पाहून झाल्यावर किल्ला चढायला सुरुवात करावी. थोडं चढून गडाच्या पूर्वाभिमुख दरवाजातून आपला आत प्रवेश होतो. दरवाजाच्या दोन्ही बाजूला बुरूज आहेत. आत गेल्यावर अजून एक दरवाजा आहे, ज्याचे मुख दक्षिणेकडे आहे. दोन्ही दरवाजे भक्कम असून या दोन्ही दरवाजे पार केल्यावर आपण अंकाई-टंकाई किल्ल्यांच्या मधल्या खिंडीत पोहोचतो. किल्ल्यांच्या संरक्षणासाठी चहुबाजूंनी भक्कम कातळ कडे असल्याने किल्ल्याला तटबंदी बांधलेली नाही; मात्र खिंड तटबंदी बांधून सुरक्षित केली आहे.


प्रथम अंकाई किल्ल्यावर चढण्यास सुरुवात केली तर वाटेत कातळातील तीन लेणी आहेत. यातील दोन गुहा सुस्थितीत असून तिसरी गुहा बुजलेली आहे. पुढे चढून गेल्यावर किल्ल्याच्या दोन्ही बाजूला भक्कम बुरूज असलेल्या उत्तराभिमुख दरवाज्यातून आत जावे. येथेही दोन दरवाजे असून पहिल्या दरवाज्याच्या दोन्ही बाजूला पहारेकऱ्यांच्या देवड्या आहेत. त्याच्या आतील दरवाज्याच्या पुढे कातळकोरीव लेणी आहेत. समोरील मोकळी जागा आणि गर्भगृह अशी लेणीची रचना असून भिंतीवर दोन द्वारपाल कोरलेले आहे. इतिहासतज्ज्ञांचे मते हे शैव लेणे असून यातील एक शिल्प गंगेचे आहे. गाभाऱ्यात सदाशिवाचे शिल्प आहे. या लेणीही नवव्या-दहाव्या शतकातील असाव्यात, असे अभ्यासकांचे मत आहे. पुढे गडाच्या तीव्र उतारावर असलेला दुसरा पूर्वाभिमुख दरवाजा आहे. येथेही दोन कमान असलेल्या दरवाज्यांचे संकुल आहे. दरवाजा पार केल्यावर खड्या कातळकोरीव पायऱ्या आहेत. पायऱ्या चढून पुढे गेल्यावर एक दरवाजा आहे, ज्याच्या आत दोन्ही बाजूला ओटे बांधले असून येथे थोडी विश्रांती घेता येते. गडाला अनेक भक्कम दरवाजे बांधून किल्ला मजबूत केला आहे. पुढे कातळात कोरलेल्या मार्गाने चढून गेल्यावर भक्कम बांधणीच्या आणि गडाच्या सर्वात वरच्या टोकाला असलेल्या दरवाजातून आपला गडमाचीवर प्रवेश होतो. गडमाचीवरील सपाट भागावर पाण्याची दोन टाकी आहेत. माचीचा विस्तार मोठा असून पठारावर एक टेकडी आहे. माचीवर तीन घुमट असलेली एक वास्तू आहे. त्याच्या मागच्या बाजूला पाण्याचे टाके आहे. पुढे गेल्यावर दोन लेणी आहेत, त्यांना 'सीता गुंफा' असे म्हणतात. बालेकिल्ल्याच्या टेकडीच्या पोटात लेणी आहेत; त्यातील एका लेणीत अगस्त्य ऋषींचे मंदिर आहे. रामायण काळात अगस्त्य ऋषी अंकाई किल्ल्यावर वास्तव्यास होते, अशी आख्यायिका आहे. महर्षी अगस्त्य सप्तर्षीमधील महत्त्वाचे नाव असून ते महर्षी वसिष्ठ यांचे वडीलबंधू होते. समुद्रात लपलेल्या कालकेय राक्षसांच्या नाशासाठी त्यांनी समुद्रप्राशन केल्याची कथा आपणा सर्वांना माहिती आहेच. त्यांनीच उत्तरेकडून दक्षिण भारतात जाण्याच्या मार्गातील विंध्य पर्वताला नमविले; त्यामुळे उत्तरदक्षिण दळणवळण सुरू झाले. अगस्त्य ऋषींची पत्नी लोपामुद्रा तत्त्वज्ञानी स्त्री म्हणून आपल्याला सुपरिचित आहे.

ऋग्वेदात अगस्त्य लोपामुद्रा संवाददेखील आहे. दक्षिण भारतात अगस्त्य ऋषींचे विशेष माहात्म्य असून त्यांना तामिळ भाषेचा जनक मानतात. महर्षी अगस्त्य यांचे दर्शन घेऊन आजूबाजूचा परिसर पाहण्यास निघावे. मंदिराच्या जवळ असलेल्या टाक्यात १२ महिने पिण्यास योग्य पाणी असते. अंकाई किल्ल्याच्या विस्तृत अशा पठारावर पाण्याचा एक छोटा तलाव आहे आणि तलावाच्या मध्यभागी एक वास्तू आहे. ही वास्तू अगस्त्य ऋषींची समाधी आहे अशी मान्यता असून यास काशितळे म्हणतात.

अंकाई किल्ल्यावर तीन तलाव आहेत. किल्ल्यावरील पाणी व्यवस्थापन काळजीपूर्वक पाहावे. किल्ल्यावरील खडकात खोदलेली टाकी, तलाव यामुळे त्याकाळी इतक्या उंचीवरदेखील पाण्याची व्यवस्थित व्यवस्था होती. त्यामुळे उंचावर सुरक्षित वस्ती करणे सोयीचे होत असे. गडाच्या पश्चिमेकडे वाड्याचे अवशेष आहेत. हा वाडा मोठा असून आता पडक्या भिंती, दरवाजे फक्त वाड्याचे अस्तित्व दाखवतात. वाड्याच्या मध्यभागी एक चौकोनी हौद आहे. त्याकाळी हा किल्लेदाराचा वाडा असावा. गडमाचीवर जी बालेकिल्ल्याची टेकडी आहे. त्यावर बांधकामाचे कुठलेही अवशेष नाही. गडाच्या माथ्यावरून गोरखगड, कात्रा किल्ला तसेच हडबीची शेंडी असा आजूबाजूच्या परिसराचे विहंगम दृश्य मनाला भुरळ घालते.

टंकाई किल्ला पाहण्यासाठी आपल्याला अंकाई किल्ला उतरून दोन्ही किल्ल्याच्या मधल्या खिंडीत परत यावे लागते. मनमाडच्या दिशेला टंकाई किल्ल्याचा उत्तराभिमुख दरवाजा आहे. दरवाजा भक्कम आहे आणि बाजूचा बुरूज बुलंद उभा आहे. किल्ला चढायला सुरुवात केल्यावर कातळात कोरलेल्या पायऱ्या आहेत. आजूबाजूला पाण्याची टाकी आहे. वर चढून गेलात की किल्ल्याच्या पश्चिमाभिमुख दरवाज्यातून आपला गडप्रवेश होतो. पुरातत्त्व विभागाने दरवाजा दुरुस्त केला असून आजूबाजूची तटबंदी मात्र सुस्थितीत नाही. टंकाई किल्ल्याला माथ्यावर विस्तृत असे पठार आहे. पठारावर एक तलाव आणि बरीच पाण्याची टाकी आहेत. टंकाई किल्ल्यावर शिवमंदिर असून मंदिराला भिंती आहे, पण छत नाही. गडावर काही इमारतींचे अवशेष आहेत तसेच गड मजबूत करण्यासाठी सर्व दिशेला बुरूज बांधलेले आहेत.

अंकाई- टंकाई हे जोडकिल्ले देवगिरी किल्ल्याच्या आधीचे असावे, असे अभ्यासकांचे मत आहे. मात्र, किल्ल्यांचा इतिहास यादवकाळापासून ज्ञात आहे. यादव काळात याला एककाई दुर्ग असे म्हणत. यादवांच्या नंतर किल्ले निजामशाहीच्या ताब्यात गेले. त्यानंतर मोगल बादशाह शाहजहानच्या काळात हे किल्ले सुभेदार खानेखानान याने जिंकले. मोगल काळात सामानाच्या साठवणुकीसाठी या किल्ल्यांच्या उपयोग होत असे. पूर्वी सुरत-औरंगाबाद व्यापारी मार्गावरील महत्त्वाचे किल्ले म्हणून या किल्ल्यांना खूप महत्त्व होते. पुढे पेशवेकाळात झालेल्या भालकीच्या तहात हे किल्ले स्वराज्यात सामील झाले. इंग्रज काळात त्यांनी किल्ल्यांवर तोफा डागल्या; किल्ल्यांचे खूप नुकसान केले. पारतंत्र्याच्या काळात आपल्या ऐतिहासिक वास्तू, मंदिरे, गडकिल्ले यांचे अतोनात नुकसान झाले. शत्रूंनी आपल्या वैभवशाली संस्कृतीचे प्रतीक असलेल्या या वास्तू एकतर नष्ट केल्या किंवा त्यांना मुलामा चढवून कलंकित केले. ऐतिहासिक ठिकाणे फिरताना तेथील इतिहास, घडलेल्या घटनांची माहिती असली तर भटकंती अभ्यासपूर्ण होते. महाराष्ट्राच्या इतिहासात विशेष महत्त्व असलेले हे गडकिल्ले आपली प्रेरणास्थळे आहेत.



पान २ वरून

# कार्पोरेट

उदा. घनता समजावून सांगताना एक लोखंडी व एक प्लॅस्टिकचा चेंडू तीन मजली इमारतीहून टाकला तर लोखंडी चेंडू प्लॅस्टिकच्या चेंडूपेक्षा लवकर पडेल व त्यावरून त्याची घनता जास्त आहे, हा प्रयोग समजावून सांगायचा. सामान्य मुलांना हे कळणे सहज शक्य आहे, परंतु अंध मुलांना तिसरा मजला किंवा उंची हे काहीच ठाऊक नाही. कारण उंची किंवा खोली त्यांनी बघितलेलीच नाही.

मग हे उदाहरण कसे समजावून सांगायचे. बुद्धिमान इंजिनीअर्सच ते. परफॉर्म करणे त्यांना चांगले येत होते. त्यांनी मग चेंडूऐवजी लोखंडी व प्लॅस्टिकच्या खुळखुळ्याचा वापर केला व तिसऱ्या मजल्यावरूरुन पडताना त्यांच्या लवकर व उशिरा येणाऱ्या आवाजाच्या आधारे लोखंडाच्या व प्लॅस्टिकच्या घनतेतील फरक समजावून सांगितला. अशा प्रकारे संपूर्ण अभ्यासक्रमाचे रेकॉर्डिंग करून व अंध मुलांना समजेल या पद्धतीने त्याचे स्पष्टीकरण देऊन तीन वर्षांचा संपूर्ण अभ्यासक्रम सुटीच्या दिवसांचा सदुपयोग करून या सर्व कॉर्पोरेट जगतातील लोकांनी बनवून दिला.

सामजिक संवेदना यापेक्षा वेगळी काय असू शकते; आणखी कोणत्या चांगल्या प्रकारे ती प्रकटीत होऊ शकते? कॉर्पोरेट जगतात अशा प्रकारे कार्य करणारे खूप लोक आहेत. मुळात क्षेत्र कोणतेही असो, सामाजिक संवेदना जागृत ठेवून समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो या भावनेतून काहीना काही करणारा माणूस महत्त्वाचा. त्याला क्षेत्राची चौकट नसते.

जसे ५ तास कार्यालयात थांबण्याचे बंधन आहे तर महिन्यातून २२ दिवस बायोमेट्रिक्स मशीनमध्ये ५ तास २ सेकंद अशी उपस्थिती नोंदविणारे व्यावहारिक कर्मचारीदेखील सार्वजनिक क्षेत्रात सापडतात; केवळ पैशयाचा विचार करीत पॅकेज ते पॅकेज यामध्यच वावरणारे कर्मचारी कॉर्पोरेट जगतातही सापडतात तसेच महाविद्यालयाची वेळ संपल्यानंतरही विद्यार्थिनी सुरक्षित घरी जाईपर्यंत आपल्या घरी न जाणारे कर्मचारीदेखील सार्वजनिक क्षेत्रात आढळतात व अंध मुलांसाठी अभ्यासक्रम बनविणारे कर्मचारीही कॉर्पोरेट जगतात आढळतात. सामाजिक दृष्टीने संवेदनशीलता माणसामाणसावरच अवलंबून आहे हेच खरे... क्षेत्र कोणतेही असो!

## स्वप्निल अभिसार...

चांदणरातीचा एक स्वप्निल अभिसार
नि प्रेमाने गोंदला कायमचा हुंकार
तिच्यातली बहरली अभिसारिका
तसाच द्वाड सखा त्याच्यातला
मग ती पार जपतही खळखळली
कारण तो पाऊस झाला दोघातला
आता स्पंदने दोघांचीही गातात मल्हार
नि प्रेमाने गोंदला कायमचा हुंकार
तिचा उत्साह, तिचा विसावा
साऱ्याला कारण त्याचा वावर
त्याला घेरते सावलीची चिंता
तिचा मात्र ग्रीष्मातही मोहर
गुंतागुंतीच्या ओढीचा अनामिक शहार
नि प्रेमाने गोंदला कायमचा हुंकार
त्याला सुखसोयींची असोशी
तिला हवीशी त्याची सोबत
जपणुकीत तो घोळे काळजी
ती झुरत बसे विश्वास शोधत
त्यातच लपलेला एकमेकांचा गोंजार
नि प्रेमाने गोंदला कायमचा हुंकार
हा त्याचा तिचा पाहिजे नकोचा
सतत भरती-ओहोटीचा लपंडाव
कधी निवडीचा सवडीने घेतलेला
मागोवा, धांदल नि मग ठेहराव
कधी फसला, हुकला, गवसला आधार
नि प्रेमाने गोंदला कायमचा हुंकार

धनश्री धारकर

# गरुड भरारी

पुस्तक परिक्षण
नरेंद्र गुंडेली
भ्र. ९८२३६४८७६५

ज्येष्ठ कविवर्य माधव पवार यांचा पहिला काव्यसंग्रह हे शुभ शकुनाचे पक्षी प्रकाशित झाल्यानंतर तब्बल सोळा वर्षांनंतर गरुड भरारी काव्यसंग्रह ९ एप्रिल २०२५ रोजी प्रकाशित झाला. माधव पवार यांना पहिल्यांदा जेव्हा किडनी निकामी झाल्यामुळे रुग्णालयात दाखल झाले. त्यावेळेस डॉक्टरांनी त्यांच्या घरच्यांना नातेवाईकांना बोलावून घ्या, असे सांगण्यात आले. त्यावेळेस त्यांनी आयसीयूमध्ये ही रचना लिहिली

**ही गरुडभरारी माझी**
**कुणी रोखू नका हो आता**
**मी वीज होऊन जाईल**
**या दुनियेतून जाता जाता**

त्यांच्या जीवनात त्यांनी अनेक रोगांची समर्थपणे मुकाबला करून जीवन जगत आहेत. त्यांचे हृदयाचे एन्जोप्लास्टी झालेले आहे , किडनी स्टोन ऑपरेशन झालेला आहे अशा विविध रोगांशी मुकाबला करत असताना ते म्हणतात

**सरणाचे कौतुक मजला**
**मरणाची नाही भीती**
**या सरणा-मरणामध्ये**
**ही अमर पणाची नाती**

ते मरण जवळ घेऊन फिरत असतात व जगत असतात अशा वेळी ते म्हणतात

**आला आजार देहाला**
**झाली वेदना वादळ**
**येता कवी प्रियकर**
**तिला भरला हो चळ**



ते स्वतः राहणाऱ्या घराचे सुंदर असे वर्णन करताना असे म्हणतात

**तुझ्या स्वर्गाहून मला**
**माझी झोपडीच बरी**
**तिच्या काळजात नांदे**
**गाथा आणि ज्ञानेश्वरी**

त्यांना मिळणाऱ्या वेदनेचे ते मुक्तपणे स्वागत करताना लिहितात

**पाहण्या मला शेवटचे**
**ती वळणावरती वळली**
**आयुष्य घालवून नको**

ती सरणावरती चळली

त्यांचे वडील कवी रा.ना. पवार यांनी दिलेला प्रामाणिकपणाचा वसा त्यांनी जीवन भर पाळला त्यांच्या प्रेमापोटी ते रचना करतात

**मरताना माझा बाप सांगून गेला मला**
**उद्या काशीला जाण्यापेक्षा**
**आज पाप करू नकोस बाळा**




**मरताना बाप माझा...**

जेव्हा त्यांना वेदनेने जीवाची लाही लाही होते तेव्हा ते असे म्हणतात

**मी व्याकुळ होतो तेव्हा**
**जाऊन स्मशानी येतो**
**मस्तकी लावून राख**
**मी शांत होऊनी येतो**

संतांच्या विचारांचे मंथन करून त्यांनी आपल्या जीवनात समर्थपणे आचरण केलेले आहे त्यांच्याविषयी तेव्हा असे लिहितात

**केले आत्म्याचे मंथन**
**झाले संतांचे दर्शन**
**संत अध्यात्माची शिडी**
**लावी ईश्वराची गोडी**

मरणाचे त्यांना यत्किंचितही भय वाटत नाही उलट ते मरणाचे स्वागत करत असे म्हणतात

**मी स्मशान गाणे गातो**
**पाहून जरा मरणाला**
**निर्माल्य व्हावया माझे**
**मी हाक दिली मरणाला**

संतांच्या महती विषयी त्यांनी अत्यंत आस्था बाळगून त्यांचे आदर्श त्यांच्या जीवनात पाळलेले आहे त्याविषयी ते म्हणतात

**मी जाऊन तिथेही आलो**
**घेऊन तुकोबांची गाथा**
**ती अजूनही ओली आहे**
**बोलला पंढरीचा नाथा**

त्यांचे वडील रा.ना. पवार प्रसिद्ध कविवर्य होते. त्यामुळे बरेच जण त्यांना त्याविषयी बोलतात तेव्हा ते असे म्हणतात


**बाप माझा कवी होता**
**हा दोष का माझा आहे**
**कविता रक्तातून आली**
**अभिमान मला याचा आहे**

माधव पवार यांची गीते टी-सिरीजला आहेत.एवढ्या मोठ्या यशोशिखरावर असताना सुद्धा त्यांचे पाय जमिनीवर आहेत. नवोदित कवींना ते आपुलकीने मार्ग दर्शन करतात. अशाप्रकारे हा काव्यसंग्रह गरुडभरारी ८४ कवितांचा संग्रह आहे. यामध्ये वेदना, मरण, संतांची महती, गीत, चारोळी, शृंगार कविता, प्रेम या सर्वांचे संमिश्रण आहे. वाचकांना एक अनोखी भेट आहे.

गरुड भरारी(काव्यसंग्रह)
**कवी माधव पवार**
शिवप्रज्ञा प्रकाशन, सोलापूर
**पृष्ठ संख्या** ११२
**मूल्य** रु.२००

सकारात्मकतेचे तत्त्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

# अवयवांच्या परिवारातील समन्वय




आपलं शरीर आपल्याला विनासायास मिळालेलं आहे, म्हणून आपण ते कसंही वापरतो. प्रत्येक अवयव काय कार्य करतो हे आपल्याला माहित असते, पण त्या कार्याचे बाजारपेठेत मूल्यमापन करायचे असेल तर?

**वानगीदाखल काही उदाहरणे घेऊ या...**

(१) आपले डोळे दिवसाला लाखो प्रतिमा त्याही रंगीत आणि विविध आकारांमध्ये काढत असतात. बाजारात पोस्टकार्ड साईझ रंगीत फोटो पन्नास रुपयांना मिळतो. मग डोळ्यांनी दिवसभरात काढलेल्या लाखो फोटोंचे बाजारमूल्य काय? आणि असे फोटो आपले डोळे आयुष्यभर काढत असतात. संशोधन सांगते की आपल्याला जन्मजात दोन मूत्रपिंड असतात पण त्यापैकी एक अष्टमांश असले तरी आपले भागते. म्हणजे आठपट अधिक तरतूद आधीच करून ठेवलेली आहे. म्हणूनच माणसे एक मूत्रपिंड दान करूनही त्यानंतर काही वर्षे सुखेनैव जगतात. आपले हृदय हा मुठीत मावेल इतका छोटासा पंप आहे आणि तो आपण जिवंत आहोत तोपर्यंत अहोरात्र काम करीत असतो. बाजारातील पंपाची किंमत आपल्याला माहित आहे, त्याच्या तुलनेत हृदय नामक पंपाची किंमत किती असेल? थोडक्यात आपल्या शरीराचे (अवयवांच्या भाषेत) किती मूल्य आहे?

मानवी शरीर प्रामुख्याने हाडामासाचे बनलेलं असते हे आपण मागील भागात पाहिले. पण अजूनही बरंच काही आपल्या शरीरात असते. ही आकडेवारी स्पष्ट आहे- हाडांची संख्या -२०६ (त्यापैकी दंडात- ६, पायांमध्ये- २६, मनगटात- ८, चेहेऱ्यावर- १४, हातात- २७, छातीत- २५, मेंदूत-२२) मणके-३३, सांधे- ३६०, स्नायू- ६००, मूत्रपिंडे- २, दुधाचे दात- २०, याउप्पर रक्तवाहिन्या, रक्तपेशी यांची मोजदाद अवघड आहे.हे सगळं संयंत्र जन्मापासून मृत्यूपर्यंत सुरळीत चालणे हे महदाश्चर्य आहे. आपण व्यक्तिमत्व हा शब्द सर्रास वापरतो. पण आपल्याला एक मन, एक व्यक्तिमत्व असते. आणि हे एकमेव असलेलं चुकीचं असलं तर?

रिचर्ड स्वचॉर्टझ (२०२१)यांच्या मते शरीरातील अंतर्गत कुटुंबप्रणाली आपण एकाच जन्मात अनेकदा जन्म जन्म घेतो, त्यावेळी त्याचे उपघटक एकमेकांशी संपर्कात असतो. म्हणून तर मनात हे कर आणि असं धाडस करू नकोस असं द्वंद्व सतत सुरु असतं.

या उपचारपद्धतीचा पायाच मुळी मन किंवा स्व ही एक स्वतंत्र धारणा नसून ते अनेक छोट्या-मोठ्या घटकांचे बनलेलं असतं. असा आहे. म्हणूनच रिचर्ड मानतात की विचार म्हणजेच अवयवांचा आपापसातील संवाद (सेल्फ टॉक) असतो. त्या चर्चेतून आपण काय करायला हवे आणि सगळ्यात भला मार्ग कोणता यावरही शरीरात चर्वितचर्वण सुरु असते. प्रत्येक अवयवाची स्वतंत्र यंत्रणा असते. त्यांत आस्था, संवेदना, अंगीभूत पण स्वायत्त वैशिष्ट्ये असतात. आणि एकूण यंत्रणेत स्वतःची अशी भूमिकाही असते.

**स्वीझी आणि झीस्कीड यांनी २०१३ साली या यंत्रणेचे तीन गट सुचविले**

**(अ ) व्यवस्थापक-**

संपूर्ण शरीर यंत्रणेचं संचालन करणे, समन्वय साधणे हे यांचे प्रमुख काम. हा संरक्षक भाग दैनंदिन व्यवहार सुरळीत चालावेत म्हणून अहर्निश कार्यरत असतो. उदा. हृदय, मूत्रपिंडे इ. आपलं कार्य करीत असताना स्वतःच्या व्यक्तिगत आयुर्मानाप्रमाणे त्यांची स्वाभाविक झीज होत असते आणि म्हणूनच त्यांच्यावरील वैद्यकीय उपचार खर्चिक असतात. त्यांची योजना परिपूर्णतेसाठी असल्याने, त्यांना किंचितही इजा/दुखापत झाली तर टोकाचे परिणाम होऊ शकतात.

**(ब) निर्वासित-**

संपूर्ण शरीर जरी आपण शंभर वर्षे अनुमानाचे धरले तरी या जुळणीतील प्रत्येक अवयवाचे व्यक्तिगत जीवन भिन्न असते. डोळ्यांना चष्मा लावून आपण त्याची कार्यशक्ती वाढवू शकतो, कानांना श्रवणयंत्र लावून ऐकण्याची क्षमता सुधारू शकतो. हातात काठी धरून चालणे सांभाळू शकतो. विविध अवयवांवर शस्त्रक्रिया करून त्यांचेही आयुर्मान वाढवू शकतो. पण आघात जगणारे आपले भाग जखमी झाल्याने त्यांना पूर्वपदावर येणे जमतेच असे नाही. उलट कालौघात त्यांच्यामुळे आलेलं अपंगत्व ( शारीरिक, मानसिक तत्कालीन वा दीर्घकालीन) आपले व्यक्तिमत्व, ओळख बनून जाते आणि त्याचा परिणाम व्यवस्थापकांवर होतो.

**(क) अग्निशामक -**

हा गट सुद्धा संरक्षक मानला जातो कारण भावनिक स्फोट कोणत्याही किंमतीवर व्यक्त झालाच पाहिजे, अशी त्यांच्यावर जबाबदारी असते. मग त्यांतून व्यसने, खाण्याचे विकार, घातक वर्तनाला प्रेरणा असे अनेक प्रादुर्भाव संभवतात. जपानचे वैज्ञानिक योशिनोरी ओसुमी यांनी एक आश्चर्यकारक शोध लावलाय, ज्यासाठी त्यांना नोबेल पुरस्कार बहाल झालाय. त्यांचे म्हणणे आहे. आपलं शरीर जेव्हा उपाशी राहतं, तेव्हा ते स्वतःच्या खराब झालेल्या पेशी खाऊन स्वतःला वाचवते. या प्रक्रियेला ऑटोफॅगी म्हणतात. आणि हिच्या मदतीने शरीर आजारांशी लढते. मूलभूत कार्यप्रवणता प्रसंगोपात्त कमी होणे एकवेळ समजू शकते, पण चक्कर येणे (व्हर्टिगो), अलर्जी असे त्रास अवयवांमधील समन्वयाचा अभाव दर्शवितात. एकमेकांना सांभाळून न घेता, उलट सूड उगविण्यासारखी त्यांची कृती असते. तिथे तोल जातो. परस्परांमधील संवाद मंदावतात. एकमेकांचे आधार नाकारले जातात. ज्ञानेंद्रिये क्षीण होत जातात. कुटुंबातील व्यक्ती जशा पुढेमागे जन्मतात, मृत्यू पावतात, तसे शरीर प्रणालीचे होते. अपघातात पाय किंवा हात कापावा लागतो.

एखाद्या अवयवावरील शल्यकर्म त्याची क्षमता शून्य करून टाकते. कितीही प्रयत्न केले तरी दिसत नाही, ऐकू येत नाही, कवळी बसविली तरी चर्वण होत नाही. कुटुंबाची अशी कणाकणाने वाताहत होत जाते. मग इतर सिद्धांत सुचवितात तसे भय, स्वतःविषयी नावड विकसित व्हायला सुरुवात होते. नियमन कमी होत जाते आणि त्याबरोबर आत्मविश्वास खच्ची होत जातो. एक मार्ग म्हणजे मनातील अतार्किक आस्थांना तिलांजली देणे, मूठमाती देणे. मानवी अहं एकप्रकारे माणसाचे संरक्षण करतो.

या गृहितकावर स्वचॉर्टझ ची उपचारपद्धती चार उद्दिष्टांवर काम करते.

(१) ज्या अवयवांवर काही कामे लादली गेलेली आहेत, त्यांच्यावरील ओझं कमी करणे आणि त्यांना मूळ काम करू देणे

(२) स्वतःवरील भरवसा पुनर्जीवित करणे

(३) अंतर्गत यंत्रणेत नव्याने संवाद स्थापन करणे

(४) जगाशी भिडताना स्वतः पुढाकार घेणे

ही उपचारपद्धती तुलनेत नवीन आहे, किचकट आहे पण प्रभावी आहे.

स्वतःला समजून घेण्यासाठी आणि शरीरांतर्गत असणाऱ्या असंख्य यंत्रणा समजून घेण्यासाठी (विशेषतः त्यामधील अनाकलनीय बिघाड, त्यांची लक्षणे, उपाय व परिणाम) काही उपक्रम आहेत.

**(१) स्वागत-**

स्वचॉर्टझ च्या विचारसरणीत अँडरसनने २०१७ साली काही बदल सुचविले त्यातील हा पहिला आणि सोप्पा उपाय- स्वतःच्या सर्व अवयवांशी संवाद साधणे, त्यांच्याकडे लक्ष देणे

**अ)** अंतर्मनावर लक्ष एकाग्र करणे आणि मोठ्याने म्हणणे- ज्यांना मदतीची गरज आहे, त्या सर्वांना मदत करण्यास मी सज्ज आहे. सर्वप्रथम मला तुम्हा सर्वांना समजून घ्यायला आवडेल.

**ब**) यानंतर स्वतःशी हितगुज करीत अवयवांना दटवावे- जर कां तुम्ही माझ्यावर आरूढ व्हायचा प्रयत्न केलात तर मात्र मी काही मदत करणार नाही.

**क)** नंतरचा टप्पा विनंतीचा- माझ्यासमवेत असा. माझ्यावर स्वर होऊ नका. तुमची तयारी झाल्यावर मला सुचवा.

**ड) नोंद**- विचार, भावना आणि इंद्रियज्ञानाची जाणीव.

**२) सहा एफ -**

या उपचारपद्धतीचा महत्वाचा घटक म्हणजे- शोध घ्या, एकाग्र होत त्यावर लक्ष केंद्रित करा आणि सविस्तर माहिती गोळा करा. विशेषतः संरक्षक हिस्स्यांवर भर देत भावनांची सरमिसळ करावी आणि नकारात्मक भावनांना दूर सारावे म्हणजे भयादी भावनांचा उलगडा होऊ शकतो. एकदा संरक्षक गट स्व पासून विभक्त करता आला की पुढची जोडणी सुलभ होते.

**अ) लक्ष्य शोधून काढणे (फाईंड)-** नक्की कोणत्या अवयवाला माझी मदत हवी आहे?

**ब)** त्या अवयवावर ध्यान देणे (फोकस)

**क) तपशीलवार नोंदी ( फ्लेश आउट)-** काय अनुभवाला येतंय?

**ड) काय वाटतंय? ( फील)-** काय आढळतंय

**इ) दोस्ती (फ्रेंड)-** ज्या अवयवावर लक्ष्य केंद्रित केलंय त्याच्याशी मैत्री करणे

**ई) भय (फिअर)-** या अवयवाला कशाचे भय वाटत असेल? त्याची स्व कडून आता काय अपेक्षा असेल?

नकारार्थी शब्द सकारात्मक कौतुकाच्या शब्दांपेक्षा अधिक काळ रेंगाळत असतात. नकारात्मक स्मृती/ अनुभव साठवून ठेवण्याची मेंदूकडे अफाट शक्ती आहे. संशोधन सांगते की टीका, अपमान साधारण वीस वर्षे स्मृतिमंजुषेत सुखेनैव राहतात पण कौतुक, सकारात्मक अभिप्राय तीस दिवसांनंतर विसरले जातात. हा विषम प्रकार आपल्या उत्क्रांत जीवशास्त्रात खोलवर रुजलाय. कारण एकच धोके आणि इजा पोहोचवू शकेल अशी माहिती समोर आली की तग धरून राहण्यासाठी मेंदू त्यांना अग्रक्रम देतो. टीका अथवा अपमान यांचा सामना करते वेळी मेंदूचे भावना केंद्र (अमिग्डला) जागृत होते आणि अशा घटनांना दीर्घकालीन स्मृतीत नेते.

भविष्य काळात असे प्रसंग टाळता यावेत म्हणून हा खटाटोप असतो. सकारात्मक अनुभव त्यामानाने क्षीण न्यूरल उद्दीपित करतात आणि मग स्वाभाविक विस्मरण होते. याचे मानसिक स्वास्थ्यावर आणि नातेबंधांवर लक्षणीय परिणाम संभवतात. स्व-प्रतिमा, तणावांची पातळी आणि भावनिक भरभराट या सर्वांवर नकारार्थी अभिप्रायांचा परिणाम होतो. याउलट सातत्याने पुनरावृत्ती केल्याशिवाय सकारात्मक अनुभव दीर्घकाळ स्मरणात राहात नाहीत.

हा साचा समजला की नकारात्मकतेला हुसकावून लावणे व्यक्तींना आणि संस्थांना सहज जमते. रोजनिशी लेखन, कौतुकाची पुनरावृत्ती, मनानुभूती अशा उपक्रमांमधून चांगले प्रसंग जास्त काळासाठी साठवून ठेवता येतात. याचे आकलन झाले की कृतज्ञता, स्थितिस्थापकत्व आणि स्व-करुणा यांवर एकाग्र होता येते.

**३) अवयवाशी आपले नाते जाणून घेणे -**

एकदा ओळख पटली की सदर अवयव आपले काम चोख करतोय की नाही याचाही शोध घेणे गरजेचे असते. खालील

**प्रश्न यासाठी मार्गदर्शन करू शकतात-**

१) त्या अवयवाची भूमिका काय आणि तो आपले दैनंदिन जीवन कसे सुलभ करतो?

२) त्याची इतरांशी वागणूक कशी असते?

३) स्व साठी त्याच्याकडे काय सकारात्मक भावभावना आहेत?

४) सदर अवयव आपल्या संरक्षणाचे कार्य कसे करतो?

५) कशापासून संरक्षण करणे त्याला अभिप्रेत असते?

६) हे काम तो अवयव मनापासून करत असतो का? त्याला त्यात आनंद मिळतो का? दुसरं काही करायला त्याला आवडेल? अशा शोधातून, अभ्यासातून आपले स्वतःच्या अवयवांशी असलेलं नातं अधिक दृगोच्चर होत जाते.

**४) चित्रकलेतून अभिव्यक्ती-**

सगळे अवयव सहजी समजतात, जाणवतात असे नाही. अशावेळी त्यातील काहींचे चित्र काढून नातेबंध शोधणे, त्यांच्यात समन्वय साधणे कदाचित सुसह्य असते.

**पहिला टप्पा-** एक कागद घेऊन त्यावर मोठा चौकोन काढावा. फार कलाकुसरीच्या फंदात न पडता चित्र सुरु करावे. स्वतःचे दृश्य भाग, घटक टिपावे- उदा.- पालक, कामसू, विनोदी इ.

**दुसरा टप्पा-** त्यांच्यातील तुमच्या मते महत्वाचे जोड दाखवावेत. एखादे कोळ्याचे जाळे कदाचित यातून उद्भवेल, पण असो.

**तिसरा टप्पा -**रंग अथवा आकार यांचा वापर करून भेद ठळक करावेत- काही टीकाकार असू शकतात, काही सहृदय.

**चौथा टप्पा-** तयार झालेल्या चित्राचे पुनरावलोकन करावे. आता प्रत्यके घटकाबद्दल काय वाटते याचे वर्णन करावे. ते चांगले आहेत की वाईट आणि कां ?

**पाचवा टप्पा-** कोणत्या अवयवांशी संघर्ष करीत त्यांना अंती सामावून घ्यावे लागेल आणि त्यानंतर स्व शी त्यांचे एकात्मरूप कसे असेल?

अशा चित्रातून अवयव-परिवाराबद्दल अधिक सुस्पष्ट मत तयार होईल आणि त्यांचे स्वतःशी असलेलं नातं अधिक दृढ व्हायलाही मदत होईल.

**या उपचारपद्धतीमधील स्व कसा ओळखावा-**

स्व-ऊर्जा आणि स्व-नेतृत्व यांचा मागोवा घेतल्यास प्रत्येकामधील खालील आठ गुणवैशिष्ट्ये आढळतात-

(१) कुतूहल
(२) संयम
(३) आत्मविश्वास
(४) करुणा
(५) नवसर्जन
(६) सुस्पष्टता
(७) धैर्य
(८) बंध

अंतर्गत कुटुंबप्रणाली मनाकडे एक घटक म्हणून न बघता त्यामध्ये अनेक छोटे मोठे कप्पे असतात असे मानते आणि सर्वजण मिळून मानवाच्या सुरक्षिततेसाठी एकत्रित प्रयास करीत असतात. व्यक्तिमत्वाचे गाडले गेलेले तुकडे फक्त स्व-करुणेच्या मार्गानेच मुक्त होतात. स्मृतींना अवकाश देण्याची संकल्पना इथे आहे.

बंधनात अडकलेल्या, अडकवून ठेवलेल्या भावनांना, आस्थांना मोकळे होण्याचे स्वातंत्र्य देणे येथे अभिप्रेत आहे. मग आघातांचे ओझे कमी होते, स्व-ऊर्जेचा शोध लागतो आणि स्वतःशी /इतरांशी घट्ट नाते प्रस्थापित होते. माणसांमधील स्व आणि त्याचे दुखापत झालेले, इजा झालेले अवयव यांच्यात नवे बंध तयार करण्याचे काम ही उपचारपद्धती करते. समन्वय आणि आंतरिक शांतता यांच्या संयोगातून स्वतःवर ताबा मिळविणे म्हणूनच संभवते.

पर्यावरण
मिलिंद बेंडाळे

# हवामान बदलाचा नवा टप्पा




जागतिक हवामान बदल हा आता केवळ पर्यावरण या परिघापुरता सीमित प्रश्न नाही, तर मानवी अस्तित्व, अर्थव्यवस्था आणि आंतरराष्ट्रीय संबंधांवर थेट परिणाम करणारी एक धोक्याची घंटा बनली आहे. जागतिक हवामान संघटनेने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार २०२४ हे पृथ्वीवरील सर्वाधिक तापमानाचे वर्ष ठरले आहे. मागील काही दशकांपासून तापमान सातत्याने वाढत आहे आणि या वाढीचे परिणाम आता प्रत्येक खंडावर स्पष्ट दिसत आहेत. बर्फ वितळण्याचा वेग, समुद्रपातळीतील वाढ आणि अतिवृष्टी दुष्काळासारख्या घटनांची वाढती वारंवारता हा केवळ नैसर्गिक चक्राचा भाग नसून पर्यावरणात होणारा मानवी हस्तक्षेप आणि औद्योगिक विकासाच्या परिणामांचे जिवंत उदाहरण आहे.

गेल्या वर्षभरात जगभरात १५० हून अधिक 'अभूतपूर्व' हवामानविषयक आपत्ती घडल्या, असे संयुक्त राष्ट्रांच्या अहवालात नमूद केले गेले आहे. या आपत्तींमध्ये वादळे, पूर, दुष्काळ, उष्णतेच्या लाटा आणि जंगलातील आगी यांचा समावेश होता. युरोपपासून आफ्रिका, आशिया आणि दक्षिण अमेरिका यापैकी कोणताही खंड या आपत्तींपासून वाचलेला नाही. अमेरिकेतील काही भागांमध्ये उन्हाळ्याचे तापमान ५० अंश सेल्सिअसच्या वर गेले, तर चीन आणि भारतात पावसाचे स्वरूप पूर्णपणे विस्कळीत झाले. या घटनांमुळे लाखो लोक विस्थापित झाले, तर अब्जावधी डॉलर्सचे आर्थिक नुकसान झाले.

हवामानातील ही अस्थिरता आता एक नवीन सामान्य परिस्थिती बनली आहे, असे हवामान शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. भारत या बदलांचा सर्वाधिक फटका सहन करणाऱ्या देशांपैकी एक आहे. भारतीय उपखंडाचे भौगोलिक स्थान असे आहे की, येथे वातावरणातील बदलांना वेगाने आणि तीव्रतेने प्रतिसाद मिळतो. महाराष्ट्रातील मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर कर्नाटकमधील सीमावर्ती भागांमध्ये दुष्काळाचा चक्रव्यूह अधिक भयंकर होत चालला आहे. पिकांना पाणीपुरवठा कमी होत असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान वाढले आहे. दुसरीकडे कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात अतिवृष्टी आणि पुराचा धोका वाढत आहे. एका बाजूला पाणीटंचाई तर दुसऱ्या बाजूला पाण्याचा अतिरेक या दोन टोकांच्या परिस्थितीमुळे ग्रामीण अर्थव्यवस्था विस्कळीत होत आहे.

हवामान बदलाचा परिणाम केवळ शेतीपुरता मर्यादित नाही. तो आरोग्य, शिक्षण, स्थलांतर आणि सामाजिक स्थैर्यावरही खोलवर परिणाम करतो. वाढते तापमान आणि आर्द्रता यामुळे उष्णतेशी संबंधित आजार तसेच मलेरिया, डेंग्यू यांसारख्या रोगांचे प्रमाण वाढले आहे. किनारी भागातील समुद्रपातळी वाढल्याने हजारो कुटुंबांना आपली घरे सोडून सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे लागत आहे. यामुळे ग्रामीण-शहरी स्थलांतर वाढत आहे आणि त्याचा परिणाम शहरांतील गर्दी, पायाभूत सुविधांवरील ताण आणि वाढती बेरोजगारी या समस्यांमधून दिसत आहे. अशा परिस्थितीत, 'हवामान तणाव' ही संकल्पना उदयाला आली आहे. तणाव म्हणजे केवळ तापमानातील वाढ नव्हे, तर त्या वाढीमुळे निर्माण होणारे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय बदल. उदाहरणार्थ, पाण्याची कमतरता असलेल्या प्रदेशांमध्ये शेतीवरून होणारे वाद संघर्ष हे हवामान तणावाचेच उदाहरण आहे. संयुक्त राष्ट्रांच्या 'क्लायमेट रिस्क' अहवालानुसार, २०५० पर्यंत जगातील सुमारे २१६ दशलक्ष लोक हवामान बदलामुळे विस्थापित होतील. म्हणजेच हवामान संकट हे मानवजातीसमोर स्थलांतर संकट निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल. या बदलांचा आर्थिक परिमाणदेखील मोठा आहे. अनेक देशांचे सकल राष्ट्रीय उत्पादन थेट हवामानविषयक आपत्तींच्या परिणामांमुळे घटले आहे. उदाहरणार्थ आफ्रिकन देशांमध्ये दुष्काळामुळे उत्पादन क्षमता कमी झाली, तर युरोप आणि उत्तरअमेरिकेमध्ये पूर आणि आगीमुळे औद्योगिक क्षेत्रावर मोठा परिणाम झाला.

> **जागतिक हवामान बदल आता मानवी जीवन, अर्थव्यवस्था आणि पर्यावरणासाठी सर्वात मोठे आव्हान बनले आहे. वाढते तापमान, पूरदुष्काळ आणि संसाधनांवरील दबाव यामुळे जगभरात तणाव निर्माण होत आहे. विज्ञान, धोरण आणि मानवी जबाबदारी यांचा समन्वयच या संकटावर मात करण्यासाठी भक्कम उपाय देऊ शकतो. मात्र त्या दिशेने जगभरातून ठोस पावले उचलली जाण्याची गरज आहे.**

जागतिक बँकेच्या अहवालानुसार, सध्याचा उत्सर्जनाचा वेग असाच राहिला, तर शतकाच्या अखेरीस जागतिक अर्थव्यवस्थेचे एकूण नुकसान जगाच्या १८ टक्क्यांपर्यंत पोहोचू शकते. यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेक प्रयत्न सुरू आहेत. पॅरिस करारानंतर जगातील बहुतेक देशांनी कार्बन उत्सर्जन कमी करण्याचे उद्दिष्ट जाहीर केले आहे; प्रत्यक्षात हे उद्दिष्ट साध्य करणे अत्यंत कठीण ठरत आहे. विकसित देशांमध्ये अजूनही अनेक उद्योग कोळसा, तेल आणि नैसर्गिक वायू यांसारख्या इंधनांवर अवलंबून आहेत, तर विकसनशील देशांकडे नूतनीकरणक्षम ऊर्जासाधने विकसित करण्यासाठी आवश्यक निधी आणि तंत्रज्ञानाची कमतरता आहे. त्यामुळे हवामान न्याय ही संकल्पना आता जागतिक चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे. विकसित देशांनी अधिक उत्सर्जन केले, पण त्याचे परिणाम गरीब देशांना भोगावे लागत आहेत. हा अन्याय दूर करणे हे आता सर्वात मोठे आव्हान बनले आहे. भारताने गेल्या काही वर्षांमध्ये या दिशेने काही महत्त्वाची पावले उचलली आहेत.

सौर ऊर्जा आणि पवन ऊर्जेच्या प्रकल्पांचा विस्तार झाला आहे, हरित हायड्रोजन धोरण आखले गेले आहे आणि इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी अनेक योजना राबविल्या जात आहेत. मात्र ही सुरुवात आहे. यात अजून बरीच प्रगती बाकी आहे. हवामान बदलाशी लढा देण्यासाठी केवळ सरकारी उपाय पुरेसे नाहीत; नागरिकांचा सहभाग, शिक्षण आणि स्थानिक पातळीवरील निर्णय प्रक्रियेत बदल ही तितकीच आवश्यक बाब आहे.

हवामान तज्ज्ञांच्या मते पुढील दशकात जागतिक कार्बन उत्सर्जन अर्ध्यावर आणले नाही, तर तापमान वाढ दोन अंश सेल्सिअसपर्यंत जाण्याची शक्यता निश्चित आहे. ही मर्यादा ओलांडल्यास, पृथ्वीवरील अनेक परिसंस्था अपरिवर्तनीय बदलांना सामोरे जातील. हिमनद्या वितळत राहतील, समुद्रकिनारे मागे सरतील आणि अनेक प्रजातींचा नामशेष होण्याचा वेग वाढेल. या सर्व गोष्टींमुळे जागतिक तणाव वाढण्याची शक्यता आहे. मुख्यत्वे आर्थिक, सामाजिक आणि राजकीय पातळीवर. माणूस आणि निसर्ग यांच्यातील संतुलन हेच या संकटाचे उत्तर आहे. विकास आणि पर्यावरण या दोन्ही परस्परविरोधी बाबी नाहीत, तर त्यांना एकत्र आणण्याची गरज आहे. हवामान बदल थांबवणे हे केवळ शास्त्रीय किंवा तांत्रिक आव्हान नाही, तर नैतिक जबाबदारीही आहे. आपण आज जगत असलेली पृथ्वी पुढील पिढ्यांसाठीही तितकीच राहावी यासाठी आपल्याला आत्ताच निर्णायक पावले उचलावी लागतील. जगभरातील तापमानवाढीमुळे निर्माण झालेला हा 'हवामान तणाव' आता मानवी सभ्यतेच्या इतिहासातील एक निर्णायक टप्पा ठरू शकतो.

पुढील दशक हे ठरवेल की मानवजातीने या संकटातून शहाणपणाने मार्ग काढला की स्वतःच्याच विकासाच्या आहारी जाऊन पृथ्वीला कधीही भरून न निघणारी हानी पोहोचवली. विज्ञान, राजकारण, अर्थव्यवस्था आणि समाज या क्षेत्रांना एकत्र आणणारा समन्वित दृष्टिकोनच या समस्येचे खरे समाधान ठरू शकतो. पर्यावरणाचे संवर्धन हा आता केवळ आवडीचा किंवा निवडीपुरता विषय राहिलेला नाही तर आपल्या अस्तित्वाचा संघर्ष बनणार आहे. हवामान बदलाशी संबंधित 'ग्रीन इकॉनॉमी' ही संकल्पना आता केंद्रस्थानी येत आहे, तिथे टिकाऊ उद्योग, पर्यावरणपूरक वाहतूक आणि हरित रोजगार निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. तसेच आता कृत्रिम बुद्धिमत्तेचा उपयोग हवामान अंदाज आणि आपत्तीपूर्व चेतावणीसाठी केला जात आहे. कार्बन कॅप्चर आणि साठवण तंत्रज्ञानावर संशोधन वाढत आहे.

हवामान बदलामुळे विकसनशील देशांसमोर 'क्लायमेट फायनान्स' म्हणजेच हवामानविषयक निधीचे पुनर्वितरण हे नवे आव्हान बनणार आहे. या सर्व अडचणींवर मात करण्यासाठी तसेच सकारात्मक पर्यावरणीय बदल घडवण्यासाठी हवामान शिक्षण आणि जनजागृतीही आता अनेक देशातील सरकारी धोरणांचा अविभाज्य भाग बनत आहे. कारण बदलाची सुरुवात नागरिकांच्या जाणिवेतूनच होते. (लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)

# नरेंद्र मोदी : कार्यकर्ता आणि राष्ट्रनेता

विशेष

विजय चौथाईवाले

कार्यकर्ताभाव निर्माण होण्यामागे मोदींच्या व्यक्तित्वावर आधी रामकृष्ण मिशन आणि नंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. त्यांच्या राम कृष्ण मिशनच्या वास्तव्याबद्दल फार काही माहिती उपलब्ध नाही. तदनंतर संघप्रचारकाच्या भूमिकेत असताना त्याकाळी संघात ज्येष्ठ-श्रेष्ठ कार्यकर्त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन त्यांनी स्वतःची जडणघडण केली. या संघ संस्कारांचे ऋण त्यांनी लिहिलेल्या 'ज्योतिपुंज' या पुस्तकात प्रकट होते. गुजरातचे मुख्यमंत्री असताना लिहिलेल्या या पुस्तकामध्ये त्यांनी आपल्या जीवनावर प्रभाव टाकणाऱ्या काही ज्येष्ठ संघ कार्यकर्त्यांच्या जीवनाचे रेखांकन केले आहे. या पुस्तकाचे प्रकाशन २००८ मध्ये मोहनजी भागवत यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. पुस्तकाच्या प्रस्तावनेत मोदींनी स्वतःच्या संघ प्रवासाला 'संस्कार साधना' असे संबोधित केले आहे. या पुस्तकात ते स्वतः कुठेही नाहीत. त्यानंतर अनेक वर्षांनी यावर्षी पुन्हा मोहनजी भागवतांच्या उपस्थितीतच नागपुरात माधव नेत्रालयाच्या शिलान्यास समारंभात संघ कार्याचे वर्णन करताना मोदींनी 'सेवा साधना' असा उल्लेख केला. संघ हा अंतःदृष्टी आणि बाह्यदृष्टी या दोन्हीसाठी काम करणारा संस्कार यज्ञ आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यकर्त्याच्या जडणघडणीत संघ संस्कारांचा फार मोठा हात भाग आहे. आपल्या मातृभूमीबद्दल नितांत श्रद्धा भाव, आपल्या सांस्कृतिक परंपरेचा सार्थ अभिमान, आपली शाश्वत मूल्य जतन करण्यासाठी आवश्यक ते सर्व कार्य यशस्वीपणे पार पाडणे, नित्य सिद्धता, अचूक आणि परिपूर्ण काम करण्याची पद्धती, उच्च ध्येयावर केंद्रित असतानाच सूक्ष्म तपशिलावर लक्ष ठेवण्याची अद्वितीय क्षमता, सहृदयता, कार्यकर्त्यांची काळजी अशा अनेक पैलूंचा उगम संघ संस्कारात सापडतो. मोदींच्या जीवन चित्रात कार्यकर्ता आणि राष्ट्रनेता या दोन्हींचे एकाच वेळी दर्शन होते. इंग्रजी कवी विल्यम वर्ड्सवर्थने 'टू द स्कायलार्क' या प्रसिद्ध कवितेत असे म्हटले आहे.

"Type of the wise who soar, but never roam; True to the kindred points of Heaven and Home!" कवीच्या दृष्टीने स्कायलार्क पक्षी म्हणजे 'स्वर्ग (अत्युच्च शिखर) आणि घर' या दोहोंचे परिपूर्ण एकत्व आहे. तो उंच भरारी घेतो, पण आपल्या मूळापासून कधीही तुटत नाही. त्याचप्रमाणे मोदींच्या हृदयात कार्यकर्ताभाव आणि राष्ट्रीय नेतृत्व या दोघांचा संगम झाला आहे, असे मला वाटते. मोदींच्या संघ प्रचारक काळातील अनेक उदाहरणे त्यांचे गुण वैशिष्ट्ये प्रकट करतात. विभाग प्रचारक असताना नवीन स्वयंसेवकाच्या घरी जेवायला जाताना त्याच्या घरातील प्रत्येक व्यक्तीची माहिती ते आपल्या डायरीमध्ये लिहीत असत. एवढेच नव्हे, तर त्या कुटुंबातील प्रमुख स्त्रीच्या माहेरची माहिती पण घेण्याचा त्यांचा प्रयत्न असे. नंतर अनेक वर्षांनी मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी काही प्रमुख महिला कार्यकर्त्यांना घरी जेवायला बोलावले. एका कार्यकर्तीने त्याचे कारण विचारले तर मोदी म्हणाले की, आपल्या प्रत्येक घरी मी प्रचारक असताना अनेक वेळा जेवायला गेलो आहे. त्या सर्वांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा कार्यक्रम आहे. अशी असंख्य उदाहरणे आहेत. त्यांच्या अलिकडच्या सिडनी भेटीपूर्वी आम्हाला एका वृद्ध महिलेचा शोध घेण्यास सांगण्यात आले; जी तिच्या मुलांसोबत राहण्यासाठी सिडनीला गेली होती. तिचे इतके सामान्य गुजराती नाव होते की खूप प्रयत्नांनंतर, स्थानिक लोक तिच्या कुटुंबीयांना शोधू शकले. दुर्दैवाने काही काळापूर्वीच त्या वृद्धेचे निधन झाले होते. मोदी त्यांच्या व्यस्त वेळापत्रकातून वेळ काढून तिच्या कुटुंबातील सदस्यांना भेटले. कारण काय तर आणिबाणीच्या काळात (१९७५-७७) जेव्हा मोदी भूमिगत होते, तेव्हा ते वडोदरा येथे या कुटुंबासोबत राहिले.

आपल्या सनातन संस्कृतीचे संरक्षण, पुनरुज्जीवन आणि प्रसार करणाऱ्या अहिल्याबाई होळकर यांच्यानंतर मोदी सरकार हे सर्वात भावी शासन आहे, असे म्हटले तर चूक होणार नाही. अयोध्येतील राम मंदिराचे निर्माण, काशी विश्वनाथ कॉरिडोर अशी उदाहरणे तर आहेतच; परंतु काशीतमिळ संगम, श्रीराम सर्किट, बुद्ध सर्किट अशा अनेक प्रकल्पांतून आपली परंपरा जतन करण्याचा आणि त्यातील दुवा मजबूत करण्याचा यशस्वी प्रयत्न म ोदीजींनी केला. संसदेच्या नव्या वास्तूमध्ये पवित्र तमिळ प्रतिमांनी सुशोभीत केलेला सेंगोल भारताच्या

> **या लेखाचे शीर्षक 'कार्यकर्ता आणि राष्ट्रनेता' आहे. 'कार्यकर्ता ते राष्ट्रनेता' असे नाही. कारण माझ्या दृष्टीने नरेंद्र मोदी राष्ट्रनेता झालेत तरी त्यांच्या हृदयातील कार्यकर्तापण अजूनही कायम आहे. एका दृष्टीने कार्यकर्ता ते राष्ट्रनेता हा प्रवास असला, तरी त्यांच्या मनातील कार्यकर्ता भाव अजूनही जागृत आहे. एखादा पट्टीचा गायक स्वरांचे उंच हिंदोळे घेत असला तरीही ही त्याचे कान तानपुऱ्यावर असतात. वैज्ञानिक प्रयोग करताना सर्वप्रथम उपकरणांची बेसलाईन ठीक आहे की नाही, याची परीक्षा करतात; तद्वतच मोदीजी राष्ट्रनेता झालेत तरी त्यांचा कार्यकर्ताभाव केवळ जागरूकच नव्हे, तर त्यांच्या प्रत्येक कृतीत याचे प्रतिबिंब दिसते.**



न्याय, समृद्धी आणि प्रगती या सांस्कृतिक मूल्यांचे प्रतीक आहे. मोदींनी केवळ भारतातीलच प्रमुख तीर्थक्षेत्रांचे दर्शन घेतले नाही तर नेपाळ, बांगलादेश, जपान, श्रीलंका, म्यानमार, मॉरिशस, ओमान, मंगोलिया, कॅनडा, इंडोनेशिया व युएई यासारख्या अनेक देशांमध्ये जतन झालेल्या वा स्थापित केलेल्या मंदिर, गुरुद्वारा, बौद्ध मठांचे त्यांनी दर्शन घेतले. २०१४ ते २०२५ या कालावधीत भारताने ६४२ प्राचीन वस्तू परत मिळविल्या, ज्या अवैध मार्गाने परदेशी पोहोचल्या होत्या. (१९५५ ते २०१४ या काळात केवळ १३ वस्तू परत आणण्यात आल्या होत्या.) देशांतर्गतच नव्हे, तर प्रदेशातही आलेल्या नैसर्गिक व मानवनिर्मित आपदांच्या आव्हानांना सामोरे जाताना मोदी सरकारने जी तत्परता दाखवली त्याला कुठेही तुलना नाही.

सरकारच्या नित्यसिद्धतेमुळेच हे शक्य झाले. केवळ संकटकाळीच नव्हे, परंतु अन्य कुठलीही सरकारी योजनांची अंमलबजावणी करताना प्रत्येक लहानसहान गोष्टीचा विचार करून मगच योजना राबवायची, हा स्पष्ट निर्देश असल्यामुळे अनेक मोठमोठ्या योजनांची अंमलबजावणी सुरळीत पार पडली. युक्रेन-रशिया युद्ध सुरू झाल्यानंतर हजारो विद्यार्थ्यांचे युक्रेनमधून स्थानांतरण करून पूर्व युरोपातील देशांमध्ये त्यांना आणण्यात आले आणि तेथून विमानाने भारतात आणण्याची व्यवस्था केली गेली. परंतु मोदींची सूक्ष्म नजर केवळ या स्थानांतरावरच नव्हती. दिवस हिवाळ्याचे होते आणि पूर्व युरोपातील देशांमधून विमानाने भारतात आणण्यास एक- दोन दिवसाचा विलंब लागण्याची शक्यता पण होती. अशा स्थितीत पंतप्रधानांना चिंता होती की, या विद्यार्थ्यांना ताजे आणि सात्त्विक जेवण कसे मिळेल? त्या काळात एकदा मध्यरात्रीनंतर त्यांचा फोन मला आला. त्यांनी ही चिंता व्यक्त केली आणि त्या देशांमध्ये सक्रिय असलेल्या सेवा इंटरनॅशनल, इस्कॉन, स्वामीनारायण, गुरुद्वारा, मंदिरे अशा सामाजिक आणि धार्मिक संस्थांशी संपर्क साधून या विद्यार्थ्यांना ताजे आणि सात्त्विक अन्न मिळावे यासाठी समन्वय साधण्याची सूचना केली. नंतर असे लक्षात आले की, त्या रात्री त्यांनी उशिरापर्यंत अनेक व्यक्तींना याच एका कारणासाठी दूरध्वनीवर संपर्क साधला होता. कार्यकर्त्यांच्या स्वास्थ्याची काळजी हा त्यांच्या अतिशय जिव्हाळ्याचा विषय आहे. प्रचारक असताना त्यांनी अनेक कार्यकर्त्यांना गुटखा, तंबाखूचे व्यसन सोडण्यास प्रवृत्त केले. आजही एखाद्याचे वजन वाढले आहे, असे लक्षात येताच त्याला जाहीरपणे त्याबद्दल सूचना करण्यातही ते मागे पाहत नाहीत. कोविडच्या काळात त्यांनी अगणित कार्यकर्त्यांना फोन करून त्यांच्या स्वास्थ्यासंबंधी चौकशी तर केलीच; परंतु रुग्णालयात भरती होण्यास अनुत्सुक असलेल्या अनेक कार्यकर्त्यांना रुग्णालयात दाखल होण्याचा अक्षरशः आदेश दिला. त्या काळात आम च्या कुटुंबातील आम्ही पाच सदस्य एकाच वेळी कोविड पॉझिटिव्ह झालो आणि रुग्णालयात भरती झालो. योग्य उपचारांमुळे आम्ही सर्व घरी परतलो. त्यानंतर एक-दोन दिवसानेच एका वेगळ्याच कामासाठी मोदींसोबत दूरध्वनीवर संवाद झाला. कामाची चर्चा झाल्यानंतर त्यांचा अचानक प्रश्न आला-'तो आप सभी लोग हॉस्पिटल से बहार आ गये?'

मोदी आजही हजारो कार्यकर्त्यांना त्यांच्या घरातील आनंदाच्या वा दुःखाच्या क्षणी व्यक्तिगत पत्र पाठवतात. ही पत्रे केवळ एक उपचार नसून ज्या व्यक्तीसाठी हे पत्र लिहिले आहे त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व या पत्रातून साकार होते, असा अनुभव माझ्यासहित अनेकांना आला आहे. वसंतराव चिपळूणकर हे गुजरातमधील एक वरिष्ठ संघ प्रचारक होते, जे त्यांच्या आनंदी आणि नेहमी हसऱ्या स्वभावासाठी प्रसिद्ध होते. २००७ मध्ये मोदींनी दुसऱ्यांदा मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली त्याच दिवशी त्यांचे निधन झाले.

मोदींनी गुजराती भाषेत वसंतरावांना भावपूर्ण लेख लिहिला, ज्याचे शीर्षक होते 'पानगळी शिवाय वसंत.' नंतर वसंतरावांच्या श्रद्धांजली सभेत अश्रू ढाळण्याऐवजी ते म्हणाले, 'वसंतरावांबद्दल हास्य आणि हास्याशिवाय बोलता येत नाही. त्यांच्या जाण्याबद्दल दुःखी होण्यापेक्षा त्यांचे जीवन आपण साजरे करूया.' यावेळी त्यांनी वसंतरावांशी केलेल्या वैयक्तिक संवादातील अनेक आनंददायी किस्से सांगितले. तळागाळातील कार्यकर्त्यांशी पहिल्यांदा भेटत असतानाही, त्यांचे सुरुवातीचे वाक्य ऐकून समोरच्या व्यक्तीला असे वाटेल की, ते एकमेकांना अनेक वर्षांपासून ओळखतात. स्वित्झर्लंडमधील एका उत्साही मराठी जोडप्याने स्विस आल्प्समधील अत्युच्च शिखरावर योग दिन साजरा केला. नंतर जेव्हा ते मोदींना भेटले तेव्हा त्याचे पहिले वाक्य होते. 'योग का लिए तो बहुत ही अच्छा काम किया आपने.' मोदींची सहृदयता केवळ भारतीयांच्यासाठी मर्यादितनाही तर विश्वबंधुत्वाचा उद्घोष करणाऱ्या मोदींनी जगभरातील कुठल्याही कोपऱ्यात अडचणीत असलेल्या मानवासाठी भारत मदतीला जाणारा एक मित्र आहे, हा संदेश आणि त्यासाठी आवश्यक असलेली कार्यवाही हे आपले एक कर्तव्य मानले आहे. 'व्हॅक्सिन मैत्री' हे राजनैतिक चर्चेच्या पलीकडे गरजू देशांना मदतीचा हात देण्याचे आणखी एक उदाहरण आहे. आश्चर्याची गोष्ट नाही की ब्राझीलच्या राष्ट्रपतींनी भारतीय लसींच्या पार्सलची तुलना लक्ष्मणाला वाचवण्यासाठी हनुमानाने आणलेल्या 'संजीवनी'शी केली.

मोदी जीवनाच्या सर्व स्तरातील व्यक्तींशी सहज संवाद साधू शकतात. कारण ते नेहमीच प्रामाणिक अभिप्राय, सूचना आणि नवीन कल्पना प्राप्त करण्यास उत्सुक असतात. व्यवस्थापन शास्त्रात याला 'सॉफ्ट सिग्नल' म्हणतात. शांतपणे ऐकण्याच्या त्यांच्या प्रचंड क्षमतेमुळे ते विविध स्रोतांमधून सहजपणे अनेक कल्पना उचलू शकतात, कधी कधी एकमेकांशी भिन्न आणि परस्परविरोधी सूचनांमधून 'समृद्ध चित्र' तयार करून एक सुसंगत व सूत्रबद्ध विचारशृंखला एकत्रित करू शकतात आणि काळजीपूर्वक अंमलात आणू शकतात. त्यांनी कोणत्याही कल्पनेच्या बारकाव्यांवर काम करण्याची कला आत्मसात केली आहे. गुजरातमध्ये प्रचारक असताना त्यांची कार्यशैली अनुभवलेले अनेक कार्यकर्ते याची साक्ष देतात.

कार्यकर्ता घडणीतील एक पैलू संघ संस्काराचा आहे तर दुसरा सेवाभावाचा. देशसेवेचे जे व्रत त्यांनी संघ कार्य करताना घेतले त्याच व्रताचे अनेकविध अंग-उपांग ते मुख्यमंत्री असताना आणि नंतर पंतप्रधान झाल्यावर प्रकट झाले. पंडित दीनदयालजींच्या अंत्योदय संकल्पनेत आपल्याला दिसतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्याविषयी केलेल्या वक्तव्यांना सरकारच्या अनेक प्रमुख धोरणांशी जोडले गेले आहे, जी 'एकात्म मानववाद' आणि 'अंत्योदय' या तत्त्वांवर आधारित आहेत. अंतिम व्यक्तीपर्यंत विकास पोहोचविणे हा उपाध्यायजींचा विचार मोदी सरकारने अनेक कल्याणकारी योजनांशी जोडला आहे.

स्वदेशी आणि स्वावलंबनचा विचार मोदी सरकारच्या 'आत्मनिर्भर भारत अभियान' (२०२०) मध्ये मूर्त स्वरूपात दिसतो. या अभियानाने देशांतर्गत उत्पादन, संरक्षण निर्मिती आणि लघुउद्योग बळकटीवर भर दिला; सोबतच्या मेक इन इंडिया- स्थानिक उत्पादनाला प्रोत्साहन, मुद्रा योजना आणि स्टँड-अप इंडिया- सूक्ष्म उद्योजक, महिला व दलित समाजासाठी कर्ज सहाय्य, पीएम विश्वकर्मा योजनापारंपरिक कारागिरांना आर्थिक मदत व प्रशिक्षण अशी अनेक उदाहरणे आहेत. मोदींनी उपाध्यायांच्या भारतीय जीवनदृष्टीला धोरणात्मक स्वरूप दिले.

**नवीन शिक्षण नीती (२०२०) :** भारतीय भाषा व ज्ञानपरंपरेवर भर. विकासही आणि वारसाही नीती : विकास व सांस्कृतिक संरक्षकतेचे संतुलन, न्यायव्यवस्थेत भारतीय दृष्टिकोनाचा समावेश असे धोरणात्मक बदल त्यांनी घडवून आणलेत. मोदी सरकारच्या सर्वसमावेशक विकास, आत्मनिर्भरता आणि सांस्कृतिक पुनर्जागरणाचे धोरण वैचारिक पायाशी थेट जोडलेले आहे, ज्याच्या केंद्रस्थानी अंतिम व्यक्तीपर्यंत विकास आणि राष्ट्राधारित स्वावलंबन ही भावना आहे.

२०१६ हे वर्ष दीनदयालजींचे जन्मशताब्दी वर्ष होते. मोदीजींनी हे वर्ष गरीब कल्याण वर्ष म्हणून घोषित केले आणि गरीब कल्याणाच्या अनेक योजना या वर्षात जाहीर झाल्यात. त्याच वर्षी 'समग्र दीनदयाल' या ग्रंथावलीच्या प्रकाशन समारंभात बोलताना मोदींनी विरोधी पक्षापासून वैकल्पिक पक्षापर्यंत या जनसंघ भाजपाच्या प्रवासात दीनदयालजींच्या महत्त्व-पूर्ण योगदानाची चर्चा केली आणि दीनदयालजींनी सांगितलेल्या 'सप्त जान्हवी'चा उल्लेख पण केला. देशाचे नेतृत्व करण्यासाठी आणि निवडणुका जिंकण्यासाठी मतदारांमध्ये नेत्याची लोकप्रियता अत्यंत आवश्यक आहे. प्रभावी नेतृत्वासाठी कठोर निर्णय घेणे आवश्यक आहे, जे अल्पकालीन अप्रियतेचे कारण ठरू शकते. परंतु दीर्घकाळात ते देशासाठी फायदेशीर ठरतील. जेव्हा एखादा देश गंभीर संकटात असतो तेव्हा असे निर्णय तुलनेने सहजतेने अंमलात आणता येतात. अशा परिस्थितीत लोक कधी कधी अनिच्छेने असे निर्णय स्वीकारतात. कारण खूप कमी पर्याय असतात. परंतु शांततेच्या काळात, जेव्हा लोक विशिष्ट प्रणाली किंवा धोरणाच्या सवयी आणि सोयीस्कर असतात आणि 'स्टेटस-को'वर समाधानी असतात तेव्हा असे निर्णय अंमलात आणणे कठीण असते.

पंतप्रधान मोदींच्या पहिल्या कार्यकाळातील असे दोन निर्णय नोटबंदी आणि जीएसटीची अंमलबजावणी या श्रेणीत येतात. पहिल्या निर्णयामुळे (नोटबंदी) निश्चितच लोकांची गैरसोय झाली. जीएसटी अंमलबजावणी व्यवसायांसाठी सुरुवातीला कठीण झाली असली, तरी जीएसटी कर प्रणालीचे फायदे आज सर्वांसमोर स्पष्ट आहेत. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्व शैलीचा एक सुसंगत पैलू म्हणजे देशातील सामान्य नागरिकांप्रति 'सहानुभूती.' अशा सहानुभूतीमुळे ते कोणत्याही निर्णय प्रक्रियेत विविध परिस्थिती विकसित करतात, असे निर्णय जवळजवळ निर्दोषपणे घेतात. त्याच वेळी मोदी त्यांच्या सभोवतालच्या सहानुभूती आणि भावनांच्या पुरामुळे त्यांची दृष्टी धूसर होऊ नये, याची पूर्णतः काळजी घेतात. त्यांच्या हृदयातील सहानुभूती आणि कणखरता एकमेकांना पूरक आहे; निर्णय अंमलात आणण्यासाठी, लक्ष केंद्रित करण्यासाठी आणि कृतीचा परिभाषित मार्ग निश्चित करण्यासाठी ते आवश्यक आहे. याला व्यवस्थापन तज्ज्ञांनी 'कठोर सहानुभूती' असे वर्णन केले आहे. गरजा आणि इच्छा यांच्यातील या फरकामुळे मोदींना अर्थव्यवस्थेवर जास्त भार न लादता समाजातील असुरक्षित घटकांना योग्य प्रकारची आर्थिक, अन्न आणि आरोग्य सुरक्षा प्रदान करणारी धोरणे आखण्यास मदत झाली. मोदी अनियंत्रित लोकप्रियतेच्या प्रवृत्तींना 'रेवडी संस्कृती' म्हणतात. कठोर सहानुभूतीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे हातात असलेले काम आणि व्यक्तीबद्दल आदर यातील संतुलन. मोदीजी सार्वजनिक आणि खाजगी दोन्ही ठिकाणी कठोर संदेश देण्यास मागेपुढे पाहत नाहीत. ज्यांनी त्याच्याशी वैयक्तिकरीत्या संवाद साधला तेही याची खात्री देतील. त्याच वेळी समस्येवर आधारित कठोर संदेश देणे आणि व्यक्तीला भावनिकरीत्या दुखावले जाऊ नये याची काळजी घेणे यात फरक करण्याची त्यांची क्षमता आहे. स्वतःच्या कृतीतून उदाहरण मांडणे हे त्यांच्या नेतृत्वशैलीचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. पुस्तक अनावरणाच्या एका सार्वजनिक कार्यक्रमात त्यांनी पुस्तक उघडले, पुस्तकाच्या आवरणासाठी वापरलेला कागद काळजीपूर्वक दुमडून खिशात ठेवला आणि नंतर प्रेक्षकांना पुस्तक दाखवले.

एकदा एका छोट्या बैठक स्थानी मोदीजी वेळेपूर्वीच पोहोचलेत आणि प्रत्येक खुर्ची समोर ठेवलेल्या पेनाची तो व्यवस्थित चालू आहे की नाही, याची चाचणी घेतली. अशा साध्या आणि सामान्य गोष्टी लोकांसमोर एक उदाहरण प्रस्तुत करतात. पक्षाच्या बैठकांमध्ये अनेक वेळा सत्र सुरू होण्याआधी ते त्यांच्या जागी इतर अनेकांच्या आधी येणारे पहिले व्यक्ती असतात. चार्ल्स डी गॉलच्या मते, नेतृत्वासाठी मोजावी लागणारी किंमत म्हणजे सतत स्वयं- शिस्त. डॅनियल गोलमन त्याचे वर्णन स्व-नियमन असे करतात. दत्तोपंत ठेंगडींच्या 'कार्यकर्ता' या पुस्तकात गीतेच्या १८ व्या अध्यायातील एक श्लोकाचा उल्लेख अनेक वेळा आला आहे... 'सामर्थ्य आहे चळवळीचे; जो जो करील तयाचे; परंतु तेथे भगवंताचे अधिष्ठान पाहिजे.' या समर्थांच्या उक्तीनुसार त्यांच्या या साधनेला ईश्वरी आशीर्वाद पण आहेत. मोदीजी त्यांच्या कठोर परिश्रमाने, कठीण परिस्थितीतून स्वतः ला बाहेर काढत आणि सतत शिकत आणि धडे आत्मसात करत हे साध्य करू शकले. ते कधीही त्याचे खरे स्वरूप, त्यांची निष्ठा, त्यांची श्रद्धा व्यक्त करण्यास मागे हटले नाहीत. गौरव आणि यशाच्या शिखरावर असताना, ते कधीही त्यांच्या मुळांपासून, त्यांच्या बालपणापासून, त्यांच्या प्रेरणास्थानांपासून आणि त्यांच्या संगोपनापासून अलिप्त राहिले नाहीत. मोदीजींच्या शब्दांतच सांगायचे झाले तर 'संघ की तपस्या विकसित भारत का अध्याय लिख रही है.' अमृत काळदरम्यान भारताला असा खरा नेता मिळाला हे आपले भाग्य आहे.

---

# पाकिस्तानच्या निर्मात्यांचे नंतर काय झाले ?

> **भाजपाचे जुने, जाणते, अभ्यासू, ज्येष्ठ प्रवक्ते माधव भांडारी यांचे अवघ्या काही आठवड्यांपूर्वी प्रकाशित झालेले पुस्तक म्हणजे पाकिस्तानच्या निर्मात्यांचे नंतर काय झाले?.**

पुस्तक परीक्षण

चन्द्रशेखर टिळक

पुस्तक म्हणून हे आत्ताच स्नेहल प्रकाशनने प्रसिद्ध केले असले तरी मुळात दोन वेगवेगळ्या वेळी दोन वेगवेगळ्या वेळी लिहिलेल्या दोन लेख मालिकांचे (वर्तमानपत्रीय स्तंभलेखन) हे संकलन आहे. त्यामुळे यातील प्रत्येक लेख (१५ विषयावर लेख आणि १६ वा समारोपात्मक लेख) अत्यंत आटोपशीर आणि मुद्देसूद आहे. आकाराने हे लेख आटोपशीर असले तरी ते आशय आणि अभिव्यक्ती यापैकी कशावरही अन्याय करत नाहीत.

सध्याचे राष्ट्रीय व जागतिक राजकारण, अर्थकारण, समाजकारण पाहू जाता भूतकाळाची अशी संगतवार, तर्कशुद्ध मांडणी अत्यावश्यक वाटावी असे हे लेख आहेत. प्रचलित राजकारणाची प्रत्यक्षदर्शी संगत आणि त्याचवेळी अभ्यासू मनाची बुद्धिसंपन्न तटस्थता यांचा अपूर्व संगम असे हे लेख आहेत.

आजपर्यंतच्या इतिहासाने हे वारंवार दाखवून दिले आहे की भल्या आणि बुऱ्या अशा कोणत्याही घटनांतून इतिहास बनत जातो. अशा कोणत्याही घटनांची सुरुवात एकतर तत्कालीन नागरिकशास्त्र (शासन व प्रशासन अशा अर्थाने) बदलण्यातून होते किंवा तत्कालीन भूगोल बदलण्यातून होते. पण असा बदलता घटनाक्रम पेलण्याची क्षमता, वकूब, उत्साह, सामर्थ्य जर तत्कालीन राज्यकर्त्यांकडे नसेल किंवा जाणीवपूर्वक ते त्याच्या अशा गुण व अवगुणांचा उपयोग करणार नसतील , करत नसतील , करू शकत नसतील तर असे बदलते नागरिकशास्त्र पुन्हा भूगोल बदलतो आणि त्यातून इतिहास पुन्हा नवीन वळण घेते. याचे दाहक उदाहरण म्हणजे पाकिस्तानची निर्मिती. त्याचे भले बुरे परिणाम पाकिस्तान ने तेंव्हाही भोगले आणि आजही भोगत आहे.

आपल्या हिंदुस्तानचे नशीब आणि नियती याबाबत तरी वेगळ्या दिशेची नाही... काश्मीर प्रश्न, दहशतवाद, जागतिक दबाव ही सारी त्याचीच फळे आहेत. यात असे साम्य दिसत असले तरी पाकिस्तान आणि हिंदुस्तान यांच्या तुलनेत फरकाचे महत्त्वाचे मुद्दे आहेत. कारण आणि परिणाम या दोन्ही बाबतीत आपला हिंदुस्तान याबाबतीत पाकिस्तानपेक्षा कितीतरी जास्त सकारात्मक आहे. गेल्या ७८ वर्षांची ही सलग सकारात्मकता केवळ नशिबाची देणगी नसून निर्णायक सामाजिक निर्णयशक्तीतून जन्माला आली आहे. याचे पुरेसे भान देणारे असे या पुस्तकातले पहिले ९ लेख आहेत.




या पहिल्या ९ लेखातून प्रकर्षाने जाणवणारी गोष्ट म्हणजे अखंड देशाची फाळणी होऊन एका दिवसाच्या/ रात्रीच्या अंतराने दोन देश दोन वेगवेगळे देश ब्रिटिश राजवटीतून स्वतंत्र झाले. दोन्ही देशांचे तत्कालीन नेतृत्व त्या निर्णयाचे साथीदारही होते आणि साक्षीदार सुद्धा होते. या निर्णयाचे स्वागत करणारे आणि विरोध करणारे असे दोन्ही प्रकाराचे लोक दोन्ही नवस्वतंत्र देशात होते. पण या दोन नवस्वतंत्र देशांनी ज्या पद्धतीने ही परिस्थिती हाताळली त्यात खूप मोठी तफावत आहे.

पाकिस्तानचा त्या काळातील राजकीय इतिहास हा त्यांनीच स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेतला असा आहे की तो निष्काळजीपणाचा परिपाक आहे की परिस्थितीच्या अपरिहार्य रेट्यापुढे ते नेतृत्व घरंगळत, घसपटत, घसरत गेले की या सगळ्याचे एकत्रीकरण म्हणजे बॅरिस्टर मोहम्मद अली जीना, जीना भगिनी फातिमा जीना, पाकिस्तान या संकल्पनेचे जनक रहमत अली, पाकिस्तानचा पहिला पंतप्रधान लियाकत अली खान, अल्पकालिक पंतप्रधान एच. एस. सुरहावर्दी, जोगेंद्रनाथ मंडल, पाकिस्तान मुस्लिम लीग, पाकिस्तान कम्युनिस्ट पक्ष यांची झालेली ससेहोलपट हे सारे चक्रावून टाकणारे आहे. आणि हे सारे या पुस्तकात वाचत असताना लक्षात येते की आजच्या अनेक घटकांचे आणि घटनांचे मूळ संदर्भ त्या ससेहोलपटी मधे आहेत. म्हणून हे पुस्तक वाचनीय आहे. या पुस्तकाच्या दुसऱ्या भागातले लेख हे पाकिस्तान आणि त्याचे निर्मात या परिघासच्या पूर्णपणे बाहेरचे आहेत. एकंदरीतच भारतीय इतिहासा बाबत जे मुद्दे वारंवार मांडले जातात आणि ज्यांच्या यथार्थते बाबत अनेक रास्त शंका असतात अशा काही प्रश्नांची दुसरी बाजू लेखक इथे मांडतात. या मांडणीत तटस्थ स्पष्टता आहे; अहंकारी अभिनिवेश नाही. त्यामुळे हाही भाग अवश्य आवर्जून वाचावा असाच आहे. एक मात्र आहे की या दुसऱ्या भागातील लेखांच्या विषयाचा या पुस्तकाच्या शीर्षकाशी असणारा नातेबंध हा बादरायण स्वरूपाचा आहे का असा प्रश्न माझ्या सारख्या अत्यंत सामान्य वाचकाला पडू शकतो. या पुस्तकातले लेख वाचत असताना सारखे वाटत राहते की एखाद्या गोष्टीचे तत्व, त्याबाबतची निष्ठा, अशा तत्व आणि निष्ठा यातले सातत्य, ते सातत्य वृद्धिंगत करणाऱ्या राजकीय व सामाजिक संस्था व संघटना, अशा संघटनांचे निष्ठावंत समर्थक यांना डावलून उपटसुंभ मंडळींचे महात्म्य अतोनात वाढायला लागले की एक समाज म्हणून, एक राष्ट्र म्हणून संबंधित व्यक्ती, संबंधित संस्था, संबंधित राष्ट्र यांची स्थिती तेल गेले, तूप गेले; हाती धुपाटणे आले अशी होते का? असल्यास पाकिस्तान निर्मात्यांचे काय झाले हे जाणून घेणे अत्यावश्यक वाटू लागते. अशावेळी आपल्या देशांतील विविध राजकीय व सामाजिक संस्थांचे स्थानिक पासून राष्ट्रीय पातळीवरचे वातावरण धडकी भरवते.

**पुस्तकाचे शीर्षक:** पाकिस्तानच्या निर्मात्यांचे नंतर काय झाले ?
**लेखक :** माधव भांडारी
**प्रकाशक :** स्नेहल प्रकाशन
**प्रथम आवृत्ती :** सप्टेंबर २०२५
**पाने :** १८८
**किंमत :**३०० रुपये